एप्रिल २०२६

# सुवार्ता

श्रद्धेच्या प्रकाशात
संपन्न जीवनासाठी




BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD.
ESTD. 1918
(SCHEDULED BANK)
"May Your Heart Be Lifted In Praise
And Filled With Joy This Easter!"
Happy Easter
BCCB
GURU GAURAV LOAN
Supporting Teachers Who Shape Our Future!
BCCB SAKHI LOAN
Specially Designed for Women:
Salaried, Professionals & Businesswomen
Unsecured Loan
Upto 5 Lakhs
Interest Rate.
9.50%p.a.*
Tenure up to
60 Months
Turn Your Dreams Into Reality
With Special Festive Loan Rates.
www.bccb.bank.in
Visit your Nearest BCCB Branch Today.
*T & C Apply
HO: Catholic Bank Building, Papdy Naka, Papdy,
Vasai West, Dist. Palghar - 401 207, Maharashtra.
Toll Free Number:
08069420000

# सुवार्ता ८४९

## एप्रिल २०२६

**वर्ष ७१ / अंक ९ / मूल्य रु. २०/-**

**संपादक : फा. (डॉ.) जोएल डिकुना**

**उपसंपादक : फा. रॉबर्ट गोन्साल्वीस**

**संपादक मंडळ :** फा. रॉबर्ट डिसोजा
फा. जॉन फर्गोज, फा. सॉलोमन रॉड्रिग्ज

**सहकार्य :** जॉन गोन्सालविस,
नाझरेथ अथाईत, संदीप राऊत

**मुखपृष्ठ रचना :** सुमित परेरा

**रेखाचित्रे :** रॉबर्ट परेरा

**अक्षरजुळणी :** रिटा डाबरे

**कार्यालयीन सहकार्य :** रेजीना अथाईत



**'सुवार्ता' कार्यालय**
जीवन दर्शन केंद्र, गिरीज,
वसई - ४०१ २०१.

**-: मोबाईल नंबर्स :-**

**'सुवार्ता' कार्यालय : 9702090231**

**जीवन दर्शन केंद्र : 9702090232**

**वेळ** : सकाळी ९.३० ते दुपारी १२.३०
दुपारी २.३० ते संध्या. ५.३०

**रविवार बंद.**

E-mail : suvartavasai@gmail.com
Web. : www.suvarta.org


## अंर्तनाद

**पोपमहोदयांचा एप्रिल महिन्यातील प्रार्थना हेतू**

जे धर्मगुरू ईश्वरी पाचारणासंबंधी अडचणी अनुभवत आहेत त्यांना त्यांच्या लोकांकडून आवश्यक साथ, सामंजस्य व आधार लाभावा म्हणून आपण प्रार्थना करू या.



# अ नु क्र म


| | | |
|---|---|---|
| • | : अंतर्नाद | ३ |
| • बिशप थॉमस डिसोजा | : अधिकृत : पुनरुत्थित ख्रिस्ताचे उत्साही साक्षीदार | ४ |
| • संपादक | : संपादकीय : पुनरुत्थानाचा अन्वयार्थ | ७ |
| • संकलन | : संपादकांस पत्रे | ८ |
| • महाराष्ट्रातील बिशप्स | : महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायदा (२०२६) | ९ |
| • फा. रॉबर्ट गोन्साल्वीस | : कळविण्यास आनंद होतो की... | १० |
| • **लेख :-** | | |
| फा. (डॉ.) रॉबर्ट बी. डिसोजा | : वेदनेतून वंदनाकडे | १२ |
| फा. जॉन मॅथ्यू फरोज | : पुनरुत्थित ख्रिस्त माणसाच्या शोधात... | १४ |
| डॉ. मॅकनोबल डिक्रुझ | : ऐतिहासिक येशू:क्रुसावरील मृत्यू ते रिकामी कबर | १६ |
| फा. व्हॅलेंटाईन पावकर | : ख्रिस्त आज विजयी झाला | १९ |
| फा. ओनिल फरोज | : पुनरुत्थानावरचा विश्वास | २० |
| विजया डिसा | : माझ्या देवा... माझ्या स्वामी | २२ |
| अनिल गोन्सालविस | : संत मेरी माग्दलेन : पुनरुत्थानाची साक्षीदार! | २३ |
| ब्रदर लिरॉन डिकुन्हा | : ईस्टरची चिन्हे | २५ |
| ॲड. बॅरी डाबरे | : येशू ख्रिस्त आणि पुनरुत्थानाचा संदेश | २७ |
| फा. किरण लोपीस | : डॉ. बाबासाहेब आंबेडकर... | २८ |
| जॉन कोलासो | : तुटू लागल्या लग्नाच्या गाठी...! | २९ |
| डॉ. ॲलिना गोन्सालविस | : फॉरवर्ड, व्हायरल आणि रिप्लायचा आगडोंब | ३१ |
| सि. स्टेव्हीना लोबो | : माध्यमांचा ताण आणि मानसिक आजार | ४७ |
| थॉमस ब्रिटो | : एम.आर.आय.मशीन | ४९ |
| रॉबर्ट लोबो | : युद्ध नको; शांती हवी | ५१ |
| पिटर फिलीप कर्नेल | : आंतर-राष्ट्रीय शांती | ५३ |
| फ्रँक मिरांडा, अर्सला मच्याडो, पीटर ब्रिटो, जेम्स लोपीस | : माझे मत | ६९ |
| मॅटिल्डा अँथनी डिसिल्वा | : ईस्टर गिफ्ट (बालमेवा) | ७३ |
| आशा / उषा | : आमचा उपवासकाळ | ७५ |
| डॉमिनिका डाबरे | : श्रद्धांजली : सि. ल्युसी डिसोजा | ७७ |
| जो. मा. पिठेकर, एस. जे. | : फा. हिलरी फर्नांडीस : एक अगम्य माणूस | ७९ |
| मारिया जोजप बॅप्टिस्टा | : तुझे उपकार मी कसे फेडू - फा. हिलरी | ८० |
| जेन मच्याडो, फ्रान्सिस गावद्या, फा. स्टीवन किका, मॅथ्यू परेरा, | : कविता | ८१ |
| डॉ. सिसिलिया कार्व्हालो | : पुरस्कार प्राप्त काव्य :वेदना समेवर आली आहे | ८२ |
| जॉन गोन्सालविस | : पुस्तक परिचय: रिचर्ड नुनीस लिखित 'तेतेलेस्ताय' | ८३ |
| संकलन | : वृत्तविशेष - सुवार्ता वितरक मेळावा.... | ८५ |
| झेविअर डिमेलो | : विशाल विश्वात | ८७ |
| संकलन | : वृत्तविहार | ८९ |
| अनिल घोन्साल्वीस | : सुवार्ता शब्दकोडे - ८ | ९६ |
| फा. जोएल डिकुना | : मनन-चिंतन-मंथन : धर्मांतर की परिवर्तन | ९७ |
| नाझरेथ अथाईत | : उपासना वर्ष दिनदर्शिका : एप्रिल २०२६ | ९८ |


## सिएनाची संत कॅथरिन (१३४७-१३८०), ख्रिस्तसभेची पंडिता: सुविचार

''देवाने तुम्हाला जसे घडवल आहे तसेच बना आणि तुम्ही जगभर क्रांती घडवाल.''

''बलवान बना आणि द्वेष व प्रेमाच्या तलवारीने स्वत:ला ठार करा, म्हणजे तुम्हाला चर्चचे शत्रू ह्यांचे अपमान आणि त्यांची शिवीगाळ ऐकू येणार नाही.''

''मासा समुद्रात व समुद्र माशात असतो तसा आत्मा देवामध्ये आहे व देव आत्म्यामध्ये आहे.''

'' हे उच्चतम सनातन पित्या, मी तुझ्यावर प्रीती केली नाही तरी तू माझ्यावर प्रीती करतोस.''



अधिकृत

# पुनरुत्थित ख्रिस्ताचे उत्साही साक्षीदार व्हा!

आजच्या जगाचा चेहरा अनेक प्रकारच्या संकटांनी व्यापलेला दिसतो. आजचा काळ मानवी इतिहासातील अत्यंत गुंतागुंतीचा आणि अस्थिर काळ मानला जातो. जगभरात चिंता, वेदना, मानसिक तणाव, सामाजिक विभाजन आणि युद्धाचे वातावरण वाढताना दिसते. अनेक कुटुंबे तुटत आहेत, समाजात मतभेद वाढत आहेत आणि राष्ट्रांमध्ये संघर्ष निर्माण होत आहेत. अनेक ठिकाणी लोक भीती, असुरक्षितता आणि निराशेच्या सावलीत जीवन जगत आहेत. अशा वातावरणात माणसाच्या मनात असहायता निर्माण होणे स्वाभाविक आहे. परंतु ख्रिस्ती विश्वास आपल्याला ह्याच अंधारात आशेचा दिवा दाखवतो. अशा परिस्थितीत ख्रिस्ती विश्वास आपल्याला एक अत्यंत शक्तिशाली आणि आशावादी संदेश देतो : पुनरुत्थित ख्रिस्ताचा संदेश. येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाची घटना आपल्याला सांगते की मृत्यू, दु:ख व अंधार कायमचा नसतो, दु:खाचा शेवट असतो व देवाचे प्रेम, जीवन आणि प्रकाश शेवटी विजय मिळवते.

### पुनरुत्थान : आशेचा विजय

पुनरुत्थित प्रभूचा संदेश हा आशेचा आणि नवीन जीवनाचा संदेश आहे. येशू जेव्हा क्रुसावर खिळला गेला तेव्हा त्याचे शिष्य पूर्णपणे निराश झाले होते. त्यांच्या मनात मोठी भीती होती. त्यांना वाटले की त्यांची स्वप्ने, त्यांची आशा आणि त्यांचे भविष्य सर्व काही संपले आहे. पण तिसऱ्या दिवशी येशू जेव्हा मृत्यूतून उठला, तेव्हा त्यांच्या जीवनात आशेचा नवा सूर्य उगवला. पुनरुत्थानाने त्यांच्या भीतीचे धैर्यात रूपांतर केले आणि निराशेचे आनंदात परिवर्तन केले. त्यांच्या जीवनात आशेचा नवीन उगम झाला. त्यामुळेच ते जगभर फिरून प्रभूच्या प्रेमाची आणि जीवनाची साक्ष देऊ लागले. ही घटना केवळ एक धार्मिक चमत्कार नव्हती; ती मानवी इतिहासातील आशेचा विजय होती.



महान धर्मतत्त्वज्ञ आणि आध्यात्मिक लेखक Henri Nouwen ह्यांनी म्हटले आहे : आशा म्हणजे केवळ चांगले घडेल अशी अपेक्षा नव्हे; तर प्रत्येक परिस्थितीत देवाचा अर्थ आणि उद्देश आहे ह्यावर विश्वास ठेवणे होय. "Hope is not optimism that things will get better, but the certainty that everything has meaning regardless of how it turns out." पुनरुत्थित प्रभू आपल्याला सांगतो की ''भिऊ नका.'' तो आपल्या सोबत आहे. तो आपल्या दु:खात, संघर्षात आणि अश्रूंमध्ये उपस्थित आहे. पुनरुत्थित प्रभूचा संदेश आपल्याला सांगतो की मृत्यू, दु:ख आणि निराशा हे शेवटचे शब्द नाहीत; तर देवाचे प्रेम आणि जीवन त्याहून अधिक शक्तिशाली आहे.

### चिंता आणि तणावाच्या काळात आशेची साक्ष

आजच्या आधुनिक जगात संगणक, तंत्रज्ञान आणि प्रगती असूनही लोकांच्या जीवनात मानसिक तणाव आणि चिंता वाढत आहे. भविष्याबद्दलची अनिश्चितता, अशांतता, आर्थिक संकटे, सामाजिक संघर्ष आणि पर्यावरणीय समस्या ह्यामुळे अनेक लोक निराश होतात. अशा परिस्थितीत ख्रिस्ती व्यक्तीने आशेचा आणि आनंदाचा स्रोत बनणे अत्यंत आवश्यक आहे. आनंदी साक्षीदार होणे म्हणजे केवळ शब्दांनी प्रभूची स्तुती करणे नव्हे; तर आपल्या जीवनातून त्याच्या प्रेमाची अनुभूती इतरांना देणे होय. पोप फ्रान्सिस म्हणतात : ''खऱ्या अर्थाने येशूला भेटलेला ख्रिस्ती व्यक्ती कायम आशेने आणि आनंदाने जगतो.'' "A Christian can never be sad; the joy of the Gospel fills the hearts of those who encounter Jesus." जेव्हा आपण संकटातही आशावादी राहतो, संघर्षातही विश्वास टिकवतो तेव्हा आपण पुनरुत्थित प्रभूचे साक्षीदार बनतो. जेव्हा आपण द्वेषाऐवजी प्रेम निवडतो, तेव्हा आपण त्याच्या संदेशाला जिवंत करतो. जेव्हा आपण विभाजनाऐवजी ऐक्य निर्माण करतो, तेव्हा आपण प्रभूच्या राज्याची चिन्हे जगात प्रकट करतो. आपल्या जीवनातील लहानलहान कृती - प्रार्थना, सेवा, सहानुभूती, मदत - ह्या सर्व गोष्टी आशेचे बीज पेरतात. लोकांना भविष्याची भीती वाटते. अशा वेळी ख्रिस्ती व्यक्तीने आशेचा स्रोत बनणे आवश्यक आहे. दु:खी व्यक्तीला आधार देणे, निराश व्यक्तीला प्रोत्साहन देणे किंवा गरजूंना मदत करणे, ही सर्व कार्ये प्रभूच्या पुनरुत्थानाची जिवंत साक्ष आहेत.

### वेदना आणि दु:खात देवाची उपस्थिती

मानवी जीवनात दु:ख आणि वेदना अपरिहार्य आहेत. आज अनेक लोक आजारपण, आर्थिक अडचणी, सामाजिक अन्याय, नैसर्गिक आपत्ती किंवा युद्धामुळे त्रस्त आहेत. काही लोक युद्धामुळे आपले घर, कुटुंब आणि भविष्य गमावत आहेत. बेघर होत आहेत, त्यांचे स्थलांतर होत आहे. पण ख्रिस्ती विश्वास सांगतो की देव आपल्याला दु:खाच्या क्षणीही सोडत नाही. प्रसिद्ध धर्मतत्त्वज्ञानी, कार्ल राहनर म्हणतात : "The Christian of the future will be a mystic or he will not exist at all." ह्याचा अर्थ जो देवाच्या उपस्थितीचा अनुभव आपल्या जीवनात खोलवर घेतो, तोच भविष्यातील ख्रिस्ती असेल. क्रुसानंतर पुनरुत्थान आले. विशेषत: दु:ख आणि संघर्षाच्या काळात, जेव्हा आपण दु:खी व्यक्तींच्या वेदनेत सहभागी होतो,

त्यांना सांत्वन देतो आणि त्यांच्यासाठी प्रार्थना करतो, तेव्हा आपण देवाच्या प्रेमाचे जिवंत साधन बनतो. आपण जेव्हा इतरांच्या वेदनेत सहभागी होतो आणि त्यांना सहानुभूती देतो, तेव्हा आपण प्रभूच्या प्रेमाचे प्रतिबिंब बनतो. करुणा, सहानुभूती आणि सेवा ह्या गुणांमुळे आपण जगात देवाचे कार्य पुढे नेत असतो.

### दुहीच्या काळात ऐक्याची हाक



आज समाजात अनेक प्रकारचे विभाजन वाढताना दिसते - धर्म, जात, भाषा, राजकीय विचारसरणी आणि सांस्कृतिक भेदांमुळे लोक एकमेकांपासून दूर जात आहेत. अशा परिस्थितीत पुनरुत्थित प्रभूचा संदेश आपल्याला ऐक्य आणि प्रेमाकडे बोलावतो. येशूने आपल्या शिष्यांना प्रेम करण्याची आणि एकमेकांची सेवा करण्याची शिकवण दिली. महान मानवाधिकार नेते मार्टिन ल्यूथर किंग Jr. ह्यांनी एकदा म्हटले होते : ''अंधाराने अंधार नाहीसा होत नाही, प्रकाशाने होतो. द्वेषाने द्वेष नष्ट होत नाही, मात्र प्रेमाने होतो.'' "Darkness cannot drive out darkness; only light can do that. Hate cannot drive out hate; only love can do that." हा संदेश ख्रिस्ताच्या शिकवणीशी पूर्णपणे जुळतो. जेव्हा आपण द्वेषाऐवजी प्रेम निवडतो, तेव्हा आपण प्रभूच्या राज्याची साक्ष देतो. ख्रिस्ती म्हणून आपण समाजात पूल बांधणारे लोक असायला हवे, भिंती उभ्या करणारे नव्हे. जेव्हा आपण शांततेचा मार्ग स्वीकारतो, तेव्हा आपण प्रभूच्या पुनरुत्थानाचा संदेश जगाला देत असतो.

### युद्धाच्या काळात शांततेचे दूत

जगातील अनेक भागांमध्ये आज युद्ध आणि हिंसा सुरू आहे. युद्धामुळे लाखो लोकांचे जीवन उद्‌ध्वस्त होते. घरे नष्ट होतात, कुटुंबे तुटतात आणि मानवतेवर खोल जखमा निर्माण होतात. अशा परिस्थितीत मानवतेला शांततेची अत्यंत गरज आहे. शांतता नेते नेल्सन मंडेला म्हणाले होते : ''तुम्हाला शांती हवी असेल तर शत्रुत्व नष्ट करा. आपल्या वैऱ्याशी दोस्ती करा.'' "If you want to make peace with your enemy, you have to work with your enemy. Then he becomes your partner." हा विचार ख्रिस्ती जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. पुनरुत्थित प्रभूने आपल्या शिष्यांना भेटताना प्रथम शब्द म्हटले : ''तुम्हाला शांती लाभो!'' येशूने आपल्या शिष्यांना शांततेचे दूत बनण्याचे आवाहन केले. लहान-लहान कृतींमधूनही आपण शांततेची बीजे पेरू शकतो - क्षमा करणे, संवाद साधणे, द्वेष टाळणे आणि न्यायासाठी उभे राहणे. ह्याद्वारे प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनात शांततेचा दूत बनू शकतो. ह्या कृतींमुळे जगात देवाच्या राज्याची झलक दिसू लागते. हा संदेश आजच्या जगासाठीही अत्यंत आवश्यक आहे.

### आशेचा आणि आनंदाचा मार्ग

पुनरुत्थानाचा आनंद हा केवळ एका सणापुरता मर्यादित नाही; पुनरुत्थित प्रभूचा आनंद केवळ एक धार्मिक अनुभव नाही; तो ख्रिस्ती जीवनाचा केंद्रबिंदू आहे. ती एक जीवनपद्धती आहे. प्रभू जिवंत आहे आणि तो आपल्या जीवनात कार्य करीत आहे. ख्रिस्ती म्हणून आपले ध्येय आहे की आपण आपल्या जीवनातून देवाचे प्रेम आणि आशा जगासमोर प्रकट करावी. मदर तेरेजा म्हणतात : सर्वत्र प्रेम पसरवा. लोकांच्या जीवनात आनंद निर्माण करा. "Spread love everywhere you go. Let no one ever come to you without leaving happier." त्यामुळे कितीही अंधार असला तरी आपण निराश होत नाही, कारण आपल्याला माहिती आहे की देवाचा प्रकाश शेवटी विजय मिळविल. हीच पुनरुत्थित प्रभूची साक्ष आहे. आपल्या भेटीनंतर लोक अधिक आशावादी, अधिक शांत व अधिक आनंदी होतात. आपल्या शब्दांमधून, कृतींमधून व जीवनशैलीमधून आपण हा संदेश देऊ शकतो की प्रेम द्वेषापेक्षा मोठे आहे, जीवन मृत्यूपेक्षा शक्तिशाली आहे आणि आशा निराशेपेक्षा उजळ आहे.

आजचे जग अनेक संकटांनी भरलेले असले तरी पुनरुत्थानाचा संदेश आपल्याला आशा देतो. पुनरुत्थित प्रभू आपल्याला नवीन दृष्टी देतो. येशू ख्रिस्त जिवंत आहे आणि त्याचे प्रेम आजही जगात कार्य करीत आहे. चिंता, वेदना, तणाव, विभाजन आणि युद्धाच्या काळात प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला एक विशेष मिशन दिले आहे - पुनरुत्थित ख्रिस्ताचे आनंदी साक्षीदार बना. भीतीऐवजी विश्वास, निराशेऐवजी आशा आणि द्वेषाऐवजी प्रेम निवडा. आपल्या विश्वासातून, सेवेतून, करुणेतून आणि शांततेच्या प्रयत्नांतून आपण जगाला दाखवू शकतो की देवाचे प्रेम अजूनही जिवंत आहे. डेझमंड टूटू ह्यांनी म्हटले आहे : ''आशा आपल्याला अंधारामध्ये प्रकाश शोधण्यास प्रवृत्त करते.'' "Hope is being able to see that there is light despite all of the darkness." म्हणून चला, आपण सर्वजण आशेचे दिवे बनूया आणि पुनरुत्थानाची साक्ष देऊया. सेवा, करुणा व शांततेच्या कृतींमधून पुनरुत्थित प्रभूच्या आनंदाचा प्रकाश जगभर पसरवूया. प्रभू खरोखरच जिवंत आहे, हे जगाला दाखविण्यास पुनरुत्थित ख्रिस्ताचे उत्साही साक्षीदार बनूया!

**+ बिशप थॉमस डिसोजा**

# DIVINE MERCY SHRINE

# डिवाईन मर्सी श्राईन, उमरगाम, गुजरात



दर शुक्रवारी दैवी दयेची भक्ती : संध्या. ६.३० वाजता.

महिन्याच्या प्रथम शुक्रवारी दैवी दयेची भक्ती : दुपारी ३.०० वाजता.

दुखणेइतांना व आजाऱ्यांना विशेष आशीर्वाद (संपूर्ण दिवस)

**वसई धर्मप्रांताचे रेव्ह. बिशप थॉमस डिसोजा, सणाची मिस्सा अर्पण करतील.**

**सणाची मिस्सा : रविवार दिनांक १२ एप्रिल २०२६, सकाळी १०.३० वाजता.**

सर्व भाविकांना प्रेमाचे आमंत्रण!

**फा. कांती वसावा** — **Mob. : 9904655688**

**फा. बिजेंद्र कुमार (सहाय्यक धर्मगुरू)** — **Mob. : 7698986966**

**सर्व ग्रामस्थ**

डिवाईन मर्सी श्राईन, डिवाईन मर्सी कॅम्पस, 'दिव्यदयाधाम',

दहाड, उमरगाम स्टेशन रोड, उमरगाम पश्चिम, गुजरात - ३९६ १६५.

**<u>गाडयांचे वेळापत्रक</u>**

**गाडी नं. २२९५३** गुजरात एक्सप्रेस बोरिवलीहून सकाळी ६.०७ वा. सुटून उमरगाव स्टेशनला सकाळी ७.५० ला पोहचेल.

**गाडी नं. १२९३५** एक्सप्रेस बोरिवलीहून सकाळी ६.५८ वा. सुटून विरारला ७.२८ ला पोहचेल आणि उमरगाव स्टेशनला ८.३८ ला पोहचेल.

**गाडी नं. ६९१३९** बोरिवली-वलसाड मेमू बोरिवलीहून सकाळी ७.२० वाजता सुटून वसईला ७.२९ ला पोहचेल व विरारला ७.४३ ला व उमरगाव स्टेशनला ९.२४ ला पोहचेल.

**संपादकीय**



# पुनरुत्थानाचा अन्वयार्थ

ख्रिस्ती धर्माची दोन व्यवच्छेदक लक्षणे आहेत : (१) येशूच्या देहीकरणाचे रहस्य आणि (२) ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचे वास्तव. म्हणूनच, दरवर्षी २५ डिसेंबर रोजी नाताळ (ख्रिस्तमस) व मार्च/एप्रिल मध्ये 'ईस्टर' हा चर्चतर्फे सर्वांत मोठा सण साजरा केला जातो.

ख्रिस्ताचे पुनरुत्थान ही जगाच्या इतिहासातील अभूतपूर्व घटना आहे आणि ती ख्रिस्ती श्रद्धेचा पायाभूत सिद्धांत आहे. ती येशू ख्रिस्ताचे क्रुसावरील मरण आणि त्याला थडग्यात पुरणे ह्या घटनेशी संबंधित आहे; त्याचे वर्णन संत पॉलने 'येशू मृतातून उठला' असे थोडक्यात केले आहे (१करिंथ १५:३-५). वस्तुत: येशूच्या पुनरुत्थानाला पॉल पुष्टी देतो (१करिंथ १५:१३) आणि भविष्यसूचक वचनाच्या पूर्ततेवर आधारित एका प्रश्नाद्वारे सर्वांना आव्हानही देतो, ''हे मृत्यू, तुझा विजय कोठे आहे? हे मृत्यू, तुझी नांगी कोठे आहे?... परमेश्वर आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे आम्हाला विजय मिळवून देतो'' (१करिंथ १५:५५-५६).

'रिकामी कबर' (लूक २४:१-५) ही घटना आणि भित्र्या शिष्यांना धाडसी प्रेषितांमध्ये परिवर्तित करण्याच्या (प्रेषितांची कृत्ये १:१२-२:४७) कथेद्वारे, तसेच प्रामुख्याने मरणानंतर, येशूच्या वारंवार होणाऱ्या दर्शनांद्वारे, समृद्ध अशा 'ईस्टर कथां'च्या माध्यमातून पुढील वास्तवाला पुष्टी मिळते.

**१) <u>बागे</u>मधील मरिया माग्दलिना :** येशू सर्वप्रथम मरिया माग्दलिनाला बागेत, कबरेजवळ दिसतो. पण तिला येशू माळी वाटला (मार्क १६:९-११, लूक २४:१-१२, योहान २०:११-१८)

तुम्हाला एदेन बागेची आठवण येते का? (उत्पत्ती २)

**२) <u>कबरे</u>जवळच्या स्त्रिया आणि प्रभूचा दूत :** दोन स्त्रिया दगड बाजूला सारण्याबद्दल चिंता करीत होत्या, पण तो बाजूला सारण्यात आला आणि देवदूताने येशूच्या पुनरुत्थानाची घोषणा केली (मत्तय २८:१-१०, लूक २४:१-१२, योहान २०:१-१८)...

शुभवर्तमानातील पवित्र मरियेसोबत देवदूताची भूमिका लक्षात असेल (लूक १:२६-३३).

**३) अम्माऊसच्या <u>मार्गा</u>वरील शिष्य :** अम्माऊसकडे प्रवास करणाऱ्या दोन निराश शिष्यांना येशू दिसतो आणि शास्त्रवचनांच्या चर्चेत भाग घेत, हळूहळू आपल्या पुनरुत्थानाचे रहस्य प्रकट करतो (लूक २४:१३-३५, मार्क १६:१२-१३)...

तांबडा समुद्र ओलांडताना परमेश्वराच्या सामर्थ्याची हळूहळू झालेली जाणीव आठवा (निर्गम १४).

**४) <u>खोलीत</u> १० शिष्यांना दर्शन :** येशू यरुशलेममधील बंद खोलीत १० शिष्यांना दिसतो. तो आपले हात, कूस आणि जखमा दाखवून त्यांना शांतीची देणगी देतो (मत्तय २८:११-२५, लूक २४:३४-३६-४३, १करिंथ १५:५, योहान २०:१९-२३)...

तुरुंगात असताना योसेफने देवाचा प्रभाव अनुभवल्याचे आठवा (उत्पत्ती ३९:१-१९-२३).

**५) थॉमससह <u>घरा</u>तील ११शिष्यांना दर्शन :** एक आठवड्यानंतर येशू सर्व ११शिष्यांना दिसला आणि त्याने शंका घेणाऱ्या ('संशय' घेणाऱ्या नव्हे) थॉमसची श्रद्धा मजबूत केली. त्यामुळे तो येशू ख्रिस्ताला ''माझ्या प्रभू, माझ्या देवा'' असे संबोधतो (योहान २०:२४-२९)...

गोंधळलेल्या जखऱ्याला सांभाळणाऱ्या परमेश्वरी पद्धतीचे स्मरण करा (लूक १:५-२५,५७-६६).

**६) <u>समुद्र</u>किनारी ७ शिष्यांना दर्शन व त्यांच्यासह न्याहारी :** शिष्य मासेमारीसाठी गेले परंतु सुरुवातीला त्यांना मासे मिळाले नाहीत. नंतर येशूसह त्यांना भरपूर मासे मिळाले, मग त्याने त्यांच्यासह न्याहारी केली व तिहेरी कबुलीनंतर पेत्राला अधिकार दिला (योहान २१:१-१४-१९)...

मोशेचे नेतृत्वासाठी आढेवेढे व नंतर देवाला समर्पण ह्यावर मनन करा (निर्गम ३:१-४:१७).

**७) गालीलमधील ऑलिव्ह <u>पर्वता</u>वर ११ शिष्यांना आदेश :** येशूने आपल्या स्वर्गारोहणापूर्वी शिष्यांना सुवार्तेची घोषणा करण्याचा आदेश दिला आणि त्यांना आपली सोबत, क्षमता व आवश्यक सामर्थ्याची हमी दिली (मत्तय २८:१८-२०, मार्क १६:१५-१८, लूक २४:४४-५३)...

शुभवर्तमान घोषित करण्याचे कर्तव्य व जबाबदारीवर चिंतन करा (यशया ६१:१, १करिंथ ९:१६).

ह्याबरोबरच, दमास्कसच्या मार्गावरील **<u>अपघातात</u>** ख्रिस्त सॉलला दर्शन देतो व सॉलचे पॉलमध्ये परिवर्तन होते, ही घटना इतकी नाट्यमय व ऐतिहासिक आहे की, अपवादात्मकरीत्या, प्रेषितांची कृत्ये ह्या पुस्तकात तिची तीनदा नोंद आहे. त्यात येशूचे प्रभावी शब्द आहेत, ''सॉल, सॉल, तू माझा छळ का करतोस?'' (प्रे.कृत्ये ९:१-४,९; २२:१-२१; २६:२-२३). अशा प्रकारे ७+१ घटना पुढील प्रमुख मथितार्थावर लक्ष केंद्रित करतात :

१) <u>पुनरुत्थित ख्रिस्ताला कोणतीही जागा अस्पृश्य नाही,</u> त्याची उपस्थिती आपल्याला सर्वत्र जाणवते : बागेत, कबरेत, रस्त्यावर, खोलीत, घरात, समुद्रकिनारी, पर्वतावर, अगदी अपघातातही.

२) <u>सर्वाधिक गरज असते तेथे पुनरुत्थित ख्रिस्त भेट देतो</u> आणि राहतो : मानवी अहंकार, आत्मदोष, लाज-शरम, न्यूनगंड इत्यादींपासून संबंधितांनी मुक्त व्हावे म्हणून.

३) <u>पुनरुत्थानाचा गाभा शांती/सलोखा आहे.</u> येशू शिष्यांसोबत होता तरी त्यांच्यापैकी बहुतेक (योहान वगळता) गरजेवेळी त्याला सोडून गेले. तरीही, ते होते तेथे तो त्यांना भेट देतो.

४) <u>ईस्टर हा सर्वांत मोठा सण ईशपरिज्ञानीय सद्गुणांचा (श्रद्धा, आशा व प्रेम) उत्सव आहे</u> म्हणजेच, श्रद्धा भीतीला पळवते, आशा निराश करत नाही, प्रेम सनातन मूल्य होते.

५) <u>येशूचे पुनरुत्थान हा जीवन, प्रकाश व सत्याचा परिपूर्ण विजय आहे.</u> मृत्यू, अंधकार व असत्याचा नाश होतो, अंतिमत: सत्याचाच विजय होतो' ह्या त्रिकालाबाधित सत्याला पुष्टी मिळते

६) <u>अद्वितीयता</u> : व्यक्ती कितीही निरोगी, सधन, बलवान असली तरी ती हे जग सोडून जातेच. येशू एक मनुष्य म्हणून जगला पण क्रुसावरसुद्धा तो क्षमाशील होता म्हणून स्वर्गस्थसुद्धा आहे.

७) <u>अस्सल नेता</u> : पुनरुत्थानानंतर ४० दिवसांनी येशू स्वर्गात गेला. नेता मार्ग जाणतो, दाखवतो व त्या मार्गावर चालतो. एक दिवस आपणदेखील स्वर्गीय मार्ग अनुसरावा ही येशूची इच्छा आहे.

**पुनरुत्थानाच्या सत्याचा आणि ईस्टरच्या सणाचे सुख, शांती, समाधान तुम्हाला रोज लाभो!**

**- फा. (डॉ.) जोएल डिकुना**

## संपादकास पत्रे

### अनुकरणीय संदेश


मार्च २०२६मधील ‘सुवार्ता’ अंकातील ‘उपवासकाळ : परिवर्तन काळ’ ह्या संपादकीयात आपण सुधारणा आणि परिवर्तन ह्यामधील फरक सुलभरीत्या विशद केला आहे. परिवर्तन फक्त स्वत: नव्हे; तर सख्यासोबत्यांचे देखील करा, हा आपण दिलेला संदेश सुद्धा अनुकरणीय असाच आहे. फा. रॉबर्ट गोन्सालवीस लिखित ‘राखेतून पुनरुत्थानाकडे’ ह्या विशेष लेखातून प्रायश्चित्त काळाच्या हार्दिक शुभेच्छा नावीन्यपूर्ण व आदर्शवत आहेत.

अवर लेडी ऑफ ग्रेस चर्च, पापडीला युनेस्कोने दिलेला पुरस्कार वसईकरांसाठी अभिमानास्पद आहे. हा पुरस्कार चर्चच्या आधुनिक स्वरूपाच्या झगमगाटाला दिलेला नसून तो पुराण वास्तूचे आणि वस्तूंचे संवर्धन केल्याबद्दल दिला गेला आहे, ही खास लक्षात घेण्याजोगी बाब आहे. ह्या संदर्भात पापडीचे प्रख्यात चित्रकार ख्रि. रॉबी डिसिल्वा ह्यांची आठवण झाली. काही वर्षांपूर्वी पापडी चर्चमधील पुरातन आणि दुर्मीळ आल्तारे (वेदी) बदलून नवीन आल्तारे स्थापन करण्याच्या योजनेला त्यांनी कडाडून विरोध करून ती योजना यशस्वीपणे थांबविली होती. त्याच वसईतील अन्य काही चर्चमधील पुरातन आल्तारे काढून त्याऐवजी नवीन आल्तारे बसविण्यात आली होती. ह्यानिमित्ताने सांडोर, निर्मळ, नंदाखाल इत्यादी चर्चमधील पुरातन वास्तूंचे आणि वस्तूंचे संवर्धन आणि संरक्षण व्हावे असे आवाहन करावेसे वाटते.

- **झेवियर डिसोजा,** पानशेत-गिरीज

### विविध विषयाला स्पर्श

मार्च २०२६ ‘सुवार्ता’ मासिकाचे उद्बोधक मुखपृष्ठ उपवासकाळावर असले तरी ‘सुवार्ता’ विविध विषयांवर




भरगच्चपणे नटलेला आहे. बिशपांच्या अधिकृतचे शीर्षक समर्पक आणि मनन-चिंतनीय आहे. संपादकीयात सांगितल्या-प्रमाणे क्रुसाची वाट, येशूच्या दु:खसहनावरील भक्ती (पासो), धार्मिक तीर्थयात्रा, तपसाधना, रिट्रिट अशा धार्मिक क्रियांचा अवलंब केला जातो. उपरोक्त धार्मिक क्रियांचा माझ्या जीवनात आध्यात्मिकतेमध्ये तीव्र परिणाम दिसून आला नाही तर शुभ शुक्रवारनंतरचे पुनरुत्थान मी खऱ्या अर्थाने अनुभवू शकणार नाही.

आपण प्रभू येशूचे पुनरुत्थान साजरे करताना पुनरुत्थान काळात देवळामध्ये *“नवे आकाश, नवी पृथ्वी, नवे नवे होणार । येशू संगे स्वर्गामधूनी स्वर्ग नवा दिसणार”* हे गीत गातो. म्हणून मी जर आपल्या पुनरुत्थित प्रभू येशू ख्रिस्ताप्रमाणे प्रेम फुलविणार असेन, नवी पृथ्वीमाला निर्माण करणार असेन, नव्या नगरीचा मला ह्या भूतलावर अनुभव घ्यायचा असेल; तर मी कोणाविषयी पूर्वग्रह, शंका-कुशंका, दुजाभाव, शत्रुत्वाची भावना, धर्माविषयी, जातीविषयी भेदभाव, लिंगभेद, रंगभेद ठेवणार नाही. मी माझ्या कुटुंबात माझ्या भावा-बहिणींमध्ये एकोप्याचे संबंध आणि बिनशर्ती प्रेम आणि शांती अनुभवणार. माझ्या कुटुंबात संपत्ती आणि जमीन वाटपावरून भांडण-तंटे होणार नाहीत. झेविअर डिसोजा ह्यांनी ह्या संदर्भात पर्यावरण संरक्षण आणि परिवर्तनशील समाज प्रबोधन ह्यावर लक्ष वेधले आहे. आपल्या निसर्गरम्य वसईच्या अधोगतीच्या ऱ्हासास कारणीभूत आणि जबाबदार आपणच का बरे? ह्या संदर्भात ‘कमर्शियलचा उंट’ हे स्टीफन एम. परेरा, मर्सिस ह्यांचे प्रासंगिक वसईतील स्थानिक लोकांना डोळ्यांत अंजन घालण्यासारखे आहे. महिला दिनानिमित्ताने ‘अखिल बिशप कॉन्फरन्स’तर्फे नॅशनल अवॉर्ड पुरस्कृत ज्येष्ठ समाजसेविका डॉमिनिका डाबरे ह्यांची मुलाखत, ‘महिलांची दैवी प्रतिष्ठा’ हा सिस्टर डॅफनी सिक्वेरा ह्यांचा लेख आणि अन्य लेखांद्वारे स्त्रियांची अस्मिता समर्पपणे अधोरेखित केली आहे.

- **फा. ॲण्ड्र्यू डाबरे**, एस.जे.,
डांग गुजरात

## साद-प्रतिसाद

**‘सुवार्ता’ मे २०२६च्या अंकासाठी**

**विषय : मे महिन्यातील माझा सुट्टीचा अनुभव**

शब्दमर्यादा : १५० शब्द

आपला अभिप्राय/अनुभव १० एप्रिल २०२६पर्यंत

**‘सुवार्ता’ भ्रमणध्वनी**

**९७०२०९०२३१** (WhatsApp)

**किंवा**

**E-mail : suvartavasai@gmail.com वर पाठविणे.**

# महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायदा (२०२६)

**दिनांक १९ मार्च २०२६**

आम्ही, महाराष्ट्र राज्यातील बिशप्स, महाराष्ट्र विधानसभेने नुकत्याच पारित केलेल्या तथाकथित 'महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायदा २०२६' विरुद्ध आमची घोर निराशा आणि तीव्र निषेध नोंदवत आहोत. धार्मिक स्वातंत्र्याचे रक्षण करण्यापासून दूर असलेला हा कायदा, सांप्रत स्वरूपात, भारतीय संविधानाच्या कलम १९, २१ आणि २५नुसार हमी दिल्याप्रमाणे, एखाद्याचा धर्म निवडण्याचे आणि त्याचा प्रसार करण्याच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचा दावा करत असलेल्या अधिकाराला, प्रभावीपणे कमी लेखतो.

सदरहू, कायद्याच्या तरतुदी चर्चच्या धार्मिक प्रथा, विशेषत: 'प्रौढ ख्रिस्ती कृपासंस्कार विधी' (Rite of Christian Initiation of Adults ) ह्या कार्यक्रमात थेट व अन्यायकारक हस्तक्षेप करतात. ह्या विधेयकाला विरोध करणाऱ्या सर्वांचे आम्ही आभार मानतो. तथापि सत्ताधारी पक्षाने काही इतरांसह ह्या विधेयकाची सर्वाधिक झळ पोहचलेल्या समुदायांशी पुरेसा विचारविनिमय न करता ह्या विधेयकाचे समर्थन केले आहे, हे तितकेच निराशाजनक आहे. श्री. अटलबिहारी वाजपेयींच्या सरकारांसह मागील सरकारांनी धार्मिक समुदायांवर परिणाम करणारे कायदे लागू करण्यापूर्वी संबंधितांशी संवाद साधण्याची लोकशाही परंपरा कायम ठेवली. तसा सल्लामसलतीचा दृष्टिकोन येथे स्पष्टपणे अनुपस्थित आहे.

प्रकरण, III कायद्याच्या कलम ६मध्ये आदेश दिले आहेत की धर्मांतर करू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने सक्षम अधिकाऱ्याला ६० दिवस अगोदर नोटीस सादर करणे आवश्यक आहे. पुढे, प्रस्तावित धर्मांतरणाचा 'हेतू, उद्देश किंवा कारण' ह्याबाबत आक्षेप घेतल्यास किंवा 'स्वत:हून' पोलीस चौकशी सुरू करण्याचे अधिकार अधिकाऱ्यांना दिले आहेत. ही तरतूद मानवी जीवनाच्या विवेक आणि श्रद्धेच्या खोलवरील वैयक्तिक क्षेत्रात प्रवेश करते, हस्तक्षेप करते आणि छाननी, संशय व छळाचे दरवाजे उघडते. विधेयकातील बहुतांश भागांप्रमाणे हा विभाग स्पष्टपणे मनमानी/अनियंत्रित आहे आणि हे कलम सर्वोच्च न्यायालयाने न्यायमूर्ती के.एस. पुट्टास्वामी (निवृत्त) विरुद्ध भारतीय केंद्र सरकार ह्या निकालात मान्यता दिलेल्या अनुच्छेद २१द्वारे संरक्षित केलेल्या व्यक्तीच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन करणारे आहे.

कॅथलिक चर्चने सक्तीच्या धर्मांतराला सातत्याने विरोध केला आहे. त्यांचा स्वत:चा कॅनन कायदा (Canon 865 : 1) स्पष्टपणे नमूद करतो की बाप्तिस्मा घेणाऱ्या प्रौढ व्यक्तीने मुक्त आणि योग्य पूर्वतयारीनंतर तसे केले पाहिजे. हे सुनिश्चित करण्यासाठी 'प्रौढ ख्रिस्ती कृपासंस्कार विधी (RCIA), प्रक्रिया सामान्यत: अनेक महिन्यांपर्यंत असते, त्याप्रमाणे ती अचूकपणे आखीव-रेखीव केली आहे. त्यामुळे व्यक्ती त्यांच्या श्रद्धेबाबत जाणीवपूर्वक आणि स्वखुशीने निर्णय घेतात.

तथापि, सध्याच्या कायद्यानुसार, अशा काळजीपूर्वक विचार केलेल्या आणि मुक्तपणे निवडलेल्या धर्मांतराला सहज आव्हान दिले जाऊ शकते. कुटुंबातील सदस्य अशा निर्णयाला स्वाभाविकपणे विरोध करू शकतात, आक्षेप घेऊ लागले तर धर्मगुरू/पाळक आणि प्रक्रियेत सामील असलेल्या इतरांवर, विधेयकाच्या २(प)मध्ये नमूद केल्यानुसार जबरदस्ती किंवा विचारसरणीत चुकीने बदल (ब्रेनवॉशिंग) केल्याचा, आरोप होण्याचा धोका आहे. अशा परिस्थितीत, त्यांना कोणतीही चूक नसतानाही, सात वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि मोठ्या दंडासह कठोर आणि बिगरप्रमाणातील शिक्षेशी सामना करावा लागण्याचा धोका आहे. त्यामुळे कायदेशीर धार्मिक कार्यांना गुन्हेगार ठरवले जाईल आणि व्यक्ती नि धार्मिक संस्था अशा दोघांवर अवास्तव ताण लादला जाऊ शकतो. आरोपींवरील पुराव्याचे ओझे बाजूला सारणे, खोट्या आरोपांवर प्रतिबंधात्मक शिक्षेचा अभाव आणि प्रस्तुत कायद्याची स्थूल व संदिग्ध भाषा तसेच मनमानी वापर आणि संभाव्य गैरवापराबद्दल गंभीर चिंता निर्माण करते, जसे इतर राज्यांमध्ये घडते. हे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २५ आणि अनुच्छेद २१ ह्या दोन्हींचे उल्लंघन करणारे आहे.

प्रस्तुत कायद्याचा बारकाईने अभ्यास केल्यास तटस्थतेचा अभाव दिसून येतो आणि तो त्रासदायक ठरू शकतो. सुसंवाद वाढवण्याऐवजी, ह्या कायद्यामुळे संशय, दुही आणि अन्याय वाढण्याची जोखीम आहे. हा कायदा अल्पसंख्याक समुदायांवर विषम परिणाम करत असल्याचे दिसत असल्याने त्याच्या हेतू आणि लागू करण्याबद्दल गंभीर चिंता निर्माण करते.

कॅथलिक चर्च नेहमीच राष्ट्राच्या प्रगती, एकता आणि अखंडतेच्या समर्थनासाठी उभे राहिले आहे. न्याय्य आणि सर्वसमावेशक समाजाच्या उभारणीत सरकारच्या बरोबरीने चर्चने कार्य केले आहे. तथापि, घटनात्मक तत्त्वांपासून कायदे दूर जातात आणि पक्षपाती किंवा जबरदस्ती पद्धतीचा अवलंब करतात, तेव्हा तत्त्वनिष्ठ असहमतीचा आवाज उठवणे अनिवार्य बनते.

म्हणून सध्याच्या स्वरूपातील ह्या कायद्याला आम्ही तीव्र विरोध करतो आणि तो त्वरित मागे घेण्याची किंवा त्यात भरीव सुधारणा करण्याची मागणी करतो. धार्मिक स्वातंत्र्य ही राज्याने दिलेली सवलत नाही; तो एक मूलभूत अधिकार आहे; त्याचा आदर, त्याचे रक्षण आणि पालन करण्यास राज्य बांधील आहे.

**न्याय, संवैधानिक अखंडता आणि मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी.**

+ **एलायस गोन्साल्विस** : नागपूरचे आर्चबिशप-अध्यक्ष, WRBC
+ **जॉन रॉड्रिग्ज** :बॉम्बेचे आर्चबिशप
+ **मार सेबॅस्टियन** :कल्याणचे आर्चबिशप
+ **थॉमस डिसोजा** :वसईचे बिशप - सरकार्यवाह, WRBC
+ **लॅन्सी पिंटो** :औरंगाबादचे बिशप
+ **सायमन आल्मेडा** :पुण्याचे बिशप
+ **मार इफ्रेम नॅरिक्युलम** : चांदाचे एपार्क
+ **बिशप माल्कम सिक्वेरा** :अमरावतीचे बिशप
+ **म्याथिव्स मार पोकोमिओ** : खडकीचे एपार्क
+ **बिशप ॲग्नेलो पिन्हेरो** :सिंधुदुर्ग धर्मप्रांताचे बिशप
+ **बिशप सॅव्हियो फर्नांडिस** :साहाय्यक बिशप, बॉम्बे सरधर्मप्रांत
+ **बिशप स्टीव्हन फर्नांडिस** :साहाय्यक बिशप, बॉम्बे सरधर्मप्रांत
+ **बिशप ऑल्विन डिसिल्वा** :साहाय्यक बिशप, बॉम्बे सरधर्मप्रांत

# कळविण्यास आनंद होतो की...

-फा. रॉबर्ट गोन्साल्वीस,
चुळणे

भाविकांच्या उठलेल्या प्रतिक्रियांच्या पार्श्वभूमीवर, सर्व संबंधितांशी केलेल्या विचारविनिमयाअंति, वसई धर्मप्रांताच्या बिशपांनी केलेल्या सूचनेनुसार यंदा प्रायश्चित्तकालीन विभागवार मिस्सांवेळी सर्वत्र सखोल चिंतन-चर्चा होत आहे. विषय : सोहळेबाजी.

कानोसा घेता, बहुतेक ठिकाणी काही व्यक्तिगत (वार्षिक सुट्ट्या, परदेशी पाहुणे, वगैरे), सामाजिक (गरज, जवळच्यांचा आग्रह व दबाव, हेटाळणी, वगैरे) वा तांत्रिक बाबी (वाजंत्री, मंडप, भोजन-कारभारी, कार्यस्थळांची अनुपलब्धता, वगैरे) अशा अडचणी असूनसुद्धा हे सर्व कुठेतरी थांबलेच पाहिजे असाच एकंदरीत सूर सर्वत्र निघताना दिसत आहे.



समारंभ-सोहळे हे निश्चितच कौटुंबिक व सामाजिक आनंदाचे व उत्सवाचे क्षण आहेत. तथापि, त्यात अनाठायी वाढत चाललेल्या प्रथा-परंपरांची खरोखरच आवश्यकता आहे का? सिने-समाजमाध्यम प्रसिद्ध नट-नट्यांचे अंधानुकरण करीत destination wedding, संगीत, हळद, घोडेस्वार, विदुषकी पेहरावाच्या मिरवणुका, कानठळ्या बसवणारी फटाक्यांची आतषबाजी, वगैरे स्थानिक संस्कृती-बाह्य गोष्टी त्या ताणून ओढून आणल्या जात आहेत. इथे, कोणत्या संस्कृतीला हिणवण्याचा हेतू नाही. मात्र विधी-सोहळे-समारंभ प्रादेशिक संस्कृती प्रदर्शनाचे मेळावे आहेत का?

वधुसोबत, एखाद-दुसऱ्या करवल्यांऐवजी गावभर सर्वांना एकाच रंगाच्या कपड्यात रंगविण्याची व पुरुषांना कंठपट्टीने बांधण्याची उठाठेव करण्याची खरंच कितपत गरज आहे व त्यातून नक्की काय साध्य होते, ह्याचा एकदा शोध घ्यायला हवा. अनावश्यक गीतनृत्य-गायनाच्या कार्यक्रमांनी लग्न-समारंभ हे करमणुकीचे आखाडे होणार नाहीत ह्याकडे सर्वांनीच लक्ष पुरवायला नको का? आमंत्रितांनी करमणुकीसाठी नव्हे; तर वधु-वरांना आशीर्वाद व शुभेच्छा देण्यासाठी यावे ह्यावर भर असला पाहिजे. मात्र वधु-वर ह्यांच्या घरची सर्वच मंडळी त्यावेळी नृत्य-नाट्याचे धडे गिरविण्यात मग्न असतील; तर वऱ्हाड्यांनी दोन घास खाऊन निघून जावे अशी अपेक्षा असते काय?

**लग्न सोहळे एक - दोन दिवसात का साजरे करता येऊ नयेत?**

लग्न-सोहळे व समारंभ हे प्रादेशिक व काही प्रमाणात परदेशी खाद्यसंस्कृतीचे मेळावे वाटण्याकडे सद्या वाटचाल सुरू आहे. त्यासाठी आकर्षक खाद्यपदार्थांची मांडणी व रेलचेल असते. ह्याउप्पर भोजनपूर्व भलते-सलते तेलकट-तूपकट पदार्थ वाढून पाहुण्यांचे स्वास्थ्य बिघडविण्याचे अपश्रेय घ्यायची गरज ती काय? मंडप, सजावट आदी पारंपरिक सहभागाची कामे एव्हाना बाह्य-कंत्राटदारांना दिली जातातच. त्यात, मेजवानीचा राजेशाही थाट का? वऱ्हाडींच्या सहभागाने ताटात रूचकर, स्थानिक पारंपरिक पदार्थ तयार करून वाढणे नाही का येणार? संस्कृती संवर्धनाच्या नावाने एका बाजूने गळे काढायचे आणि ताटात अखिल भारतीय खाद्यसंस्कृतीचे दर्शन घडवण्याचा अट्टाहास धरायचा हा दुटप्पीपणा नाही का?

कार्य सिद्धीस नेण्यास परमेश्वर आहेच. तेव्हा, निमंत्रण असेल तर सोहळ्यास जरूर उपस्थित राहून शुभाशीर्वाद द्यावेत. मात्र, सर्वांनीच सहकुटुंब-सहपरिवार जाऊन मनसोक्त मेजवानी झोडण्याचा तसा काही कुणाचा आग्रह नसतो. समारंभास उपस्थित राहून शुभाशीर्वाद देऊन ह्या सत्यावर आता आपण विश्वास ठेवायला शिकले पाहिजे.

पूर्वी विहिरी-तळ्यावर पाणी आणायला जाणारे वऱ्हाडी आता विहिरी-तळी आटल्यावर परंपरा जिवंत ठेवण्यासाठी तळ्याऐवजी नळावर जाऊ लागली. पण उत्तररात्रीपर्यंत त्यांची सरबराई करताना येणाऱ्या भुर्दंडापायी यजमानांच्या तोंडचे पाणी पळून त्यांच्या घशाला कोरड पडण्याची वेळ येते त्याचे काय?

लग्नसमारंभानिमित्ताने घरोघरी पोहचलेले हे पैराणी-पदार्थ नवीन पिढीला त्याचे फारसे आकर्षण नसल्याने कित्येक दिवस तसेच पडून राहतात. शिवाय, पैराणी घरी पोहचल्यावर त्याच्या रंग-रूप-आकार-चव-बांधणी ह्यांवरून टीका-टिप्पणी व कुचेष्टा होते ती वेगळीच.

एक गोष्ट इथे नमूद केली पाहिजे की उत्सव-समारंभ कमी करणे हा अनेकांचा (मेजवानी कंत्राटदार, आचारी, मंडप-सजावटदार, फोटोग्राफर्स - व्हिडियोग्राफर्स ह्यांसारख्या अनेकांचा) रोजगार हिरावून घेण्याचा विषय वा प्रयत्न नाही; तर आपले उत्सव-समारंभ अधिक जबाबदार व नैसर्गिक साधन-संपत्तीच्या नासाडीशिवाय साजरे करण्याचा हा विचार आहे. म्हणूनच, समारंभ-सोहळे नसावेत, परंपरा पाळू नयेत असे कुणी म्हणत नाही; तर अनावश्यक बाबींना फाटा देत ते आटोपशीर व मर्यादित प्रमाणात साजरे करता येतील का ह्याविषयी गांभीर्याने विचार करणे हे गरजेचे वाटते. त्या दृष्टीने मग उपवर मेजवानी (bachelor party), विवाहपूर्व भोजनावळ, विवाहदिनाचा स्वागत समारंभ, विवाहोत्तर (सौदि) भोजनावळ, नंतरची उरल्या-सुरल्यांच्या आभाराप्रीत्यर्थ भोजनावळ हे सर्व कुठेतरी थांबून समारंभ नीटनेटका पण पूर्वीसारखा दिवसा-दोन दिवसांचा आटोपशीर करण्याचा विचार चुकीचा आहे का?

अनेकांना मनोमन हा विचार पटलेला असला तरी त्यांच्यावर, (ह्यापूर्वी आजवर अशा समारंभ-सोहळ्यात सहभागी होऊन त्याचा मनसोक्त आनंद लुटलेला असल्यामुळे) त्यांच्या घरातील मंगलकार्यात आता त्याची, तशीच, त्याहून अधिक मोठ्या प्रमाणात परतफेड करण्याचा सामाजिक दबाव दिसून येतो. अशा सर्वांनी, सामाजिक बदलाच्या वैचारिक प्रगल्भतेअभावी ह्यापूर्वी घडलेल्या अशा गोष्टींबाबत दुरुस्ती करायची चालून आलेली ही संधी का घेऊ नये? अर्थात, त्याच वेळी समाजपरिवर्तनाच्या दिशेने पहिले पाऊल टाकणाऱ्यांना नाहक हिणवले जाणार नाही व परिसरातील लोकांकडून त्यांना सामाजिक तुसडेपणाचा अनुभव येणार नाही, ह्याची ग्वाहीदेखील सर्वांनी द्यायला हवी.

समाजातील उपरोल्लेखित सर्व विधी-सोहळ्यांना येत असलेले व्यावसायिक स्वरूप, त्याहून होत असलेले सत्ता-संपत्तीचे ओंगळ प्रदर्शन, सुटत चाललेले सामाजिक भान ह्याने समाजमन ढवळून निघत असल्याचे एकंदरीत चित्र आहे. पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष असताना, अर्धेअधिक जग पोटभर अन्नाविना उपाशी झोपी जात असताना, विजेविना परिसर वारंवार अंधारात बुडत असताना, ह्या नैसर्गिक साधन-संपत्तीची उधळपट्टी व अपव्यय हे गंभीर बाब ठरते. ह्याबाबतीत, ''माझ्या मिळकतीचा विनियोग माझ्या मर्जीने करण्यास मी मुखत्यार आहे'' हा विचार दुर्दैवी अभाग्यांप्रती असभ्यता, सामाजिक अरेरावी, धार्मिक उन्मत्तपणा व आध्यात्मिक उर्मटपणाचा ठरेल.

●


**मासिक 'सुवार्ता'च्या मालकी व इतर तपशिलासंबंधीचे निवेदन फॉर्म ४**

(नियम ८ अन्वये)

**१) प्रकाशन स्थळ** : 'सुवार्ता' कार्यालय, जीवन दर्शन केंद्र, गिरीज, तालुका - वसई, जि. पालघर, महाराष्ट्र ४०१ २०१.

**२) प्रकाशन काल** : मासिक

**३) मुद्रकाचे नाव** : 'सुवार्ता' ट्रस्ट
भारताचे नागरीक आहेत काय? : होय
पत्ता : 'सुवार्ता' कार्यालय, जीवन दर्शन केंद्र, गिरीज, ता. वसई, जि. पालघर, महाराष्ट्र ४०१ २०१.

**४) प्रकाशकाचे नाव** : 'सुवार्ता' ट्रस्ट
भारताचे नागरीक आहेत काय? : होय
पत्ता : 'सुवार्ता' कार्यालय, जीवन दर्शन केंद्र, गिरीज, ता. वसई, जि. पालघर, महाराष्ट्र ४०१ २०१.

**५) संपादकाचे नाव** : फा. (डॉ.) जोएल डिकुना
भारताचे नागरीक आहेत काय? : होय
पत्ता : 'सुवार्ता' कार्यालय, जीवन दर्शन केंद्र, गिरीज, ता. वसई, जि. पालघर, महाराष्ट्र ४०१ २०१.

आम्ही, **सुवार्ता ट्रस्ट** असे जाहीर करतो की वर दिलेली माहिती आमच्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

**१ एप्रिल २०२६** **सुवार्ता ट्रस्ट**
प्रकाशक



## REQUIRED TEACHING STAFF

1. **LLM/NET/SET/Ph.D. for Law College**
2. **M.A./M.Com./ M.Sc.with M.Ed./Ph.D./NET for English Medium B.Ed. College& Degree College**
3. **M.A./M.Com./ M.Sc. /M.Sc. I.T./MCA with B.Ed. for English Medium Junior College**
4. **B.A./B.Com./ B.Sc. /B.Sc. I.T. with B.Ed. for English Medium School**
5. **H.S.C. with D.Ed. for English Medium School**

Add: -Mother Velankani Education Trust, Mahesh Park, Tulinj Road, Nallasopara (East).

**Contact No.: 8446989051/8446819051/7410179057**


Please send your resume on
Email: mother.velankani.education.trust@gmail.com

# वेदनेतून वंदनाकडे

-फा. (डॉ.) रॉबर्ट डिसोजा
बहारे

तीस-तेहतीस वर्षे हे काही मरायचं वय नव्हतंच मुळी! मात्र तो जन्माला आलेला होता तो मरण्यासाठीच! जन्मा आधी बापाने त्याच्या अस्तित्वाविषयी शंका उपस्थित केलेली. जन्मत:च शत्रूने तलवार उपसलेली... देवदूतांच्या गायनाचे सूर हवेत विरतात न विरतात तोच बेथलेहेमच्या पाळण्या-पाळण्यांतून आणि घराघरांतून विलापाचे व आकांताचे स्वर उमटू लागलेले... मेंढपाळ, राजे, नातलग आणि शेजारी ह्यांच्याकडून कोडकौतुक करून घेण्याचे दिवस सरत नाहीत; तोच निर्वासित होण्याचा दुर्दैवी प्रसंग त्याच्यावर आलेला... ''इस्राएलात अनेकांचे पडणे आणि पुन्हा उठणे ह्याचे चिन्ह होण्यासाठी'' तो जगात अवतरलेला होता... ''त्याच्या राज्याचा अंत होणार नाही'', हे गॅब्रिएल देवदूताचे शब्द मनात खेळविणाऱ्या मरियेच्या कानावर शिमोन संदेष्ट्याचे भाकीत उकळत्या तेलाच्या थेंबासारखे पडलेले : ''तुझ्या जिवांतून तलवार आरपार भोसकून जाईल.''

वेदनेचं बाळकडू पचवून तो ज्ञानाने व शरीराने देवाच्या व माणसांच्या कृपेत वाढत असलेला... ''हा माझा परमप्रिय पुत्र आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे'', अशी आकाशवाणी होते काय आणि मागोमाग सैतानाचे गोंधळ निर्माण करणारे शब्द त्याला बेचैन करतात काय... ''तू जर देवाचा पुत्र असशील तर...'' त्याला आदाम-एवेची आठवण झालेली असावी. देवाने आपल्या प्रतिमेप्रमाणे व प्रतिरूपाप्रमाणे निर्माण केलेल्या पती-पत्नीला ''तुम्ही देवासारखे व्हाल...'' अशा शब्दांत सैतानाने भुलविलेले होते. तिथूनच मोह, पाप, दु:ख आणि मरणाची



मालिका सुरू झालेली... आता नवा आदाम बनून त्याला परतीचा प्रवास सुरू करायचा होता. तो मोक्षाचा मार्ग मरणाच्या मैदानाला जाऊन मिळणार होता.

त्याने कंबर कसली... डोक्यावर तारणाचे शिरस्राण धारण केले... छातीवर नीतिमत्त्वाचे उरस्राण घातले... एका हातात देवशब्दाची दुधारी तलवार घेतली... दुसऱ्या हातात श्रद्धेची ढाल घेतली... कमरेला सत्याचा कमरबंद करकचून आवळला... पायात शांतीची

**अंतर्यामी चाललेल्या संघर्षरूपी झाडाला आलेली ती लालभडक फुले होती.**

सुवार्ता असलेली सिद्धता चढविली... त्याचे झगडणे आता रक्तामांसाबरोबर, हाडा-मांसाच्या माणसांबरोबर नव्हते. ते युद्ध होते ह्या जगाच्या अधिपतीबरोबर. आकाशातील दुरात्म्यांबरोबर... आणि काळोखाच्या अधिकाऱ्यांबरोबर...

...आणि त्याने तुतारी फुंकली : ''परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आलेला आहे. दीनांस शुभवार्ता देण्यासाठी त्याने मला अभिषेक केलेला आहे...'' त्याच्या मुखातून निघणारी कृपावचने कानाला गोड लागत होती... मात्र काळजाला झोंबत होती. ऐकणाऱ्यांनी त्याचा कडेलोट करण्याचा प्रयत्न केला. घरच्या लोकांनी त्याला वेड्यात काढले. गावकऱ्यांनी त्याच्यावर अविश्वास दाखविला. सोबत फिरणारे शिष्य स्वार्थाने बरबटलेले होते. शास्त्री-परुशी त्याच्यावर टपून बसलेले... तशातच त्याने जेरुसलेमच्या भव्य-दिव्य मंदिरात हातात आसूड घेऊन त्याचे शुद्धीकरण करण्याचे धाडस दाखविल्याने धार्मिक व राजकीय अधिकारी दुखावले गेले होते. यहुदियाच्या वाळवंटात पराभूत झालेला सैतान डूख धरून बसलेला होता... आता तोही आपले डावपेच खेळू लागला... भरल्या ताटावरून त्याने ज्युदासला उठायला लावलेले होते...

एदेन बागेत सुखाच्या लालसेपायी मानवाचे पतन झालेले होते. आता दु:खाच्या गेथशेमाने बागेत 'आत्मा आतुर होता; पण देह फितूर होता'... मनुष्याचा पुत्र रक्ताचा घाम गाळीत होता... अंतर्यामी चाललेल्या संघर्षरूपी झाडाला आलेली ती लालभडक फुले होती. वेदनेचा पारिजातक आता असाच फुलत जाणार होता... ज्युदासचे कडुजार चुंबन, शिष्यांचे अकस्मात पलायन, यहुदी अधिकाऱ्यांनी केलेले बिनबुडाचे आरोप, पिलातचे हात धुणे, पाठ सोलून काढणारे चाबकाचे फटके, पेत्राचा जहरीला नकार, डोके भणाणून काढणारा काटेरी मुकुट,



हात आणि खांदे सोलणारा ओबडधोबड क्रूस, पाय रक्तबंबाळ करणारी खडकाळ वाट, लोकांनी केलेली जीवघेणी थट्टामस्करी, रोमन शिपायांनी चालविलेली विटंबना, कालवारीवरचे रणरणते ऊन, हाता-पायांना भेदून आरपार जाणारे तीक्ष्ण धारदार खिळे... अशा विविध रूपांत वेदनेचे एक एक फूल उमलत होते... क्रुसावरून ओघळणाऱ्या रक्ताच्या एक-एक थेंबातून वेदनेचा हुंदका ऐकू  येत होता...

क्रुसाच्या लाकडाला खिळ्यांनी जखडण्यात आलेली त्याच्या शरीराची तार झंकारली गेली. तिच्यातून बाहेर पडणारा, वेदनेने ओथंबलेला एक-एक सूर उपस्थितांचे काळीज विदीर्ण करीत होता. ''बापा, त्यांना क्षमा कर... आज तू माझ्याबरोबर सुखलोकांत असशील... बाई पहा, तुझा मुलगा... माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?... मला तहान लागली आहे... पूर्ण झाले आहे... बापा, मी माझा आत्मा तुझ्या हाती सोपवितो...'' कालवारीवरचे हे सप्तसूर आसमंतात घुमत राहिले... नव्हे; ते आभाळावर कायमचेच कोरले गेले.

आता वेदना शमली होती... मात्र प्रीतीचा अंगार विझलेला नव्हता... भाल्याचे अणकुचीदार पाते लागताच त्याच्या मृत शरीरातून जीवनाचा झरा वाहू लागला... तिच्या हृदयातूनही दु:खाची तलवार आरपार भोसकून गेली... भर दुपारी नीतिमत्तेचा सूर्य अस्ताला जात होता... तिच्या हृदयात मात्र पहाटेचे नक्षत्र उगवले होते... त्या वेदनामय मन:स्थितीतही तिला देवदूताचे शब्द धीर देत होते, ''तो याकोबच्या घराण्यावर युगानुयुग राज्य करील''... काळजावर दगड ठेवून तिने ते वेदनाविरहित शरीर थडग्यात ठेवले... त्यावर धोंड लोटली जात असताना तिच्या जीवनातील एका नाट्यांकावर पडदा पडला...

मात्र त्याची वेदना वांझ ठरणारी नव्हती... त्या वेदनेच्या काळोख्या रात्रीत गौरवमय जीवनाचा उष:काल दडलेला होता... गव्हाचा दाणा जमिनीत पडून मेला होता... बुजला होता... रुजला होता... आता तो पुष्कळ पीक देणार होता... तुच्छ मानलेला... मनुष्यांनी टाकलेला... क्लेशांनी व्यापलेला... व्याधींनी भरलेला... शोभा-सौंदर्य नसलेला... रूपरंग विटलेला... तो पुरुष पुनरुत्थानाच्या नव्या तेजाने झळकणार होता. त्याला झालेल्या शिक्षेमुळे आम्हांला शांती मिळणार होती... त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त होणार होते. क्रुसाची वाट ही स्वर्गाची वाट बनणार होती... अपमानाचे चिन्ह असलेला क्रूस तारणाचे प्रतीक बनणार होता. मानवाच्या पराजयाचे झाड आता विजयाचा वटवृक्ष बनणार होता... 'गुड फ्रायडे'चा सूर्य कधीच नजरेआड झालेला होता... पुनरुत्थानाचा रविकिरण सर्वत्र तेजाची पावले फाकणार होता... उत्तम मेंढपाळ जिवंत झालेला होता... विखुरलेली मेंढरे आता एक कळप बनून नवजीवनाच्या हिरव्यागार कुरणात चरणार होती... शांतीच्या संथ पाण्यावर जाणार होती...

लांडगा कोकराजवळ राहणार होता... चित्ता करडाजवळ बसणार होता... गाय आणि अस्वल एकत्र चरणार होते. सिंह बैलाप्रमाणे कडबा खाणार होता... तान्हे बाळ नागाच्या बिळाजवळ खेळणार होते. थानतुटे मूल फुरश्याच्या बुबुळाला हात लावणार होते. भीती नाही... दहशत नाही... असुरक्षिततेचा लवलेश नाही... अनिश्चितेचा मागमूसही नाही. त्याच्या पुनरुत्थानाने नवे आकाश व नवी पृथ्वी ह्याचे स्वप्न साकार होणार होते. सात विकारांतून मुक्त झालेली मेरी मॅग्दालेन प्रेषितांची प्रेषिता बनणार होती. चंचल वृत्तीचा पेत्र श्रद्धेचा भक्कम नि कणखर खडक बनणार होता. ऐन रणांगणातून पळून गेलेले शिष्य दाही देशांनी सुवार्ता पताका फडकवित उजळ माथ्याने फिरणार होते. संशयी वृत्तीचा थॉमस श्रद्धेचा शिलेदार बनणार होता. होसान्नाला आता आल्लेलुयाची जोड मिळणार होती. ज्याला त्यांनी विंधिले त्याच्याकडे सर्वजण आदराने आणि भक्तिभावाने पाहणार होते. वेदनेच्या भट्टीतून तावून-सुलाखून निघालेले शरीर गौरवमय तेजाने तळपणार होते.

ही सारी त्या वेदनेची किमया होती. म्हणून वेदना टाळायची नसते तर ती हृदयाशी कवटाळायची असते. त्या वेदनेला वंदन! त्या क्रुसाला वंदन!! मानवी वेदनेला अर्थ देणाऱ्या पुनरुत्थित ख्रिस्ताला वंदन!!!

मोबाईल : 96 37 20 44 33


## जाहिरातदारांसाठी खुलासा

**'सुवार्ता'मध्ये जाहिराती व शोकसमाचार प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंतच स्वीकारल्या जातात** हे आपणास माहीतच आहे. मात्र एकूण पृष्ठसंख्या व जाहिरातींची पृष्ठसंख्या मर्यादित ठेवावी लागत असल्यामुळे रंगीत व कृष्णधवल जाहिरातींची पाने वरील तारखेच्या आत भरली गेल्यास नाईलाजास्तव आम्ही आपली जाहिरात स्वीकारू शकणार नाहीत. म्हणून कृपया शेवटच्या घटकेपर्यंत थांबणाऱ्यांना जाहिरातीसाठी जागा उपलब्ध होऊ शकेलच ह्याची शाश्वती आम्ही देऊ शकत नाही.

**- व्यवस्थापक**

# पुनरुत्थित ख्रिस्त माणसाच्या शोधात...

-फा. जॉन मॅथ्यू फरोज, ये.सं.
उपलाट, पाटीलपाडा, तलासरी

उपवासकाळ हा मानवी जीवनातील आत्मपरीक्षणाचा, पश्चात्तापाचा आणि नव्या जीवनाला सुरुवात करण्याचा काळ होय. परिवर्तनाचा मार्ग हा येशू ख्रिस्ताने आपल्या खांद्यावर वाहिलेल्या क्रुसाचा आहे. हा पवित्र क्रूस येशूच्या अस्तित्वाचे, जीवनाचे एक महत्त्वाचे विजयाचे प्रतीक ठरले. म्हणून क्रुसाशिवाय येशू नाही आणि येशूशिवाय क्रूस नाही. क्रुसावर टांगलेल्या येशूचा देह अखिल मानवजातीला मुक्तीचा मार्ग दाखवत आहे. अनेक कलावंतांना, लेखकांना हे जिवंत प्रतीक प्रेरणादायक ठरत आहे.

प्रभू येशू म्हणतो, ''मला पृथ्वीपासून उंच केले, तर मी सर्वांना माझ्याकडे आकर्षून घेईन.'' पुढे येशू लोक-समुदायास म्हणाला, ''आणखी थोडा वेळ तुमच्याबरोबर प्रकाश आहे; तुम्हांला अंधकाराने गाठू नये म्हणून तुम्हाजवळ प्रकाश आहे. तुम्ही प्रकाशाचे पुत्र व्हावे म्हणून तुम्हाजवळ प्रकाश असतानाच प्रकाशावर विश्वास ठेवा'' (योहान १२:३२,३५-३६).

हा प्रकाश ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा आहे. म्हणून हा प्रकाश चिरकाल अंधकारावर मात करणारा आणि मानवजातीला नवजीवनाची देणगी देणारा प्रकाश आहे. म्हणूनच येशू ख्रिस्त आपल्याला आपल्या जीवनाद्वारे इतरांना प्रकाश देण्याचे आमंत्रण करत आहे. येशू आपल्या शिष्यांना म्हणाला, ''माझ्या मागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वत:चा त्याग करावा व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे'' (मत्तय १६:२४). हे आमंत्रण ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या मार्गाचे आहे. कारण येशूचे दु:खसहन, यातना, वेदना आणि क्रुसावरील मरण ही ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाची पहाट होती. म्हणून येशू



म्हणतो, ''मुख्य याजक व शास्त्री ह्यांच्याकडून पुष्कळ दु:खे सोसावी, जिवे मारले जावे व तिसऱ्या दिवशी उठविले जावे ह्याचे अगत्य आहे'' (मत्तय १६:२९). ह्या विधानाद्वारे प्रभू येशू आपल्याला त्याच्या पुनरुत्थानाची साक्ष देतो.

ख्रिस्ताचे पुनरुत्थान त्याच्या दैवीपणाची परमेश्वराच्या चमत्काराची जरी साक्ष देत असली तरी ख्रिस्ताचे पुनरुत्थान ह्या साक्षीच्या पलीकडील आहे. ईशज्ञानी आल्बर्ट नोलेन म्हणतात, ''येशू हा ख्रिस्ती धर्माच्या उगमापलीकडचा परमेश्वराचा पुत्र, परमेश्वराचा आविष्कार, प्रकटीकरण असून तो अखिल मानवजातीचा तारणारा आहे. ख्रिस्ताचे पुनरुत्थान ह्याची पावती देते.''

**येशूचा क्रुसावरील त्याग, आत्मबलिदान हे पुनरुत्थानाशिवाय अपूर्ण आहे.**

फा. जे. एन. एम. म्हणतात, ''पुनरुत्थान हे ख्रिस्त देव आहे, ह्याची केवळ पावती देत नाही; तर पुनरुत्थान तारणकार्याचे एक महान रहस्य आहे. पुनरुत्थानाद्वारे ख्रिस्ताने आपले तारणकार्य पूर्ण केले आहे. म्हणून पुनरुत्थानाचा जो एक गहन व्यापक अर्थ आहे आणि पुनरुत्थानाद्वारे जे परमेश्वराचे सर्वत्र अस्तित्व आहे ते समजून घेणे महत्त्वाचे व गरजेचे आहे.'' म्हणूनच संत इग्नेशियस लोयोला म्हणतात, ''परमेश्वर चराचरात, निसर्गात, मानवात आहे. त्याचा शोध घेण्याची गरज आहे.'' वास्तविक ख्रिस्ताचे पुनरुत्थान आपल्या समोर एक मोठे आव्हान निर्माण करत आहे.

येशूच्या क्रुसावरील त्याग, आत्मबलिदान हे पुनरुत्थानाशिवाय अपूर्ण आहे. ख्रिस्ताच्या जीवनाची परिपूर्णता पुनरुत्थानात आहे. बऱ्याच वेळा आपण सहजपणे म्हणतो की मिस्साविधी येशूचे क्रुसावरील आत्मबलिदान आहे. मिस्सा साजरी करणे, मिस्सा जगणे म्हणजे ख्रिस्ताचे पुनरुत्थान साजरे करणे, जगणे. येशू आपला प्राण सोडतेवेळी म्हणाला, ''हे बापा, मी आपला आत्मा तुझ्या हाती सोपवून देतो'' (लूक २३:४६). जेव्हा पिता येशूचे समर्पण स्वीकारतो, तेव्हा येशूचे मिशनकार्य पूर्ण होते. म्हणून येशू म्हणतो, ''आता पूर्ण झाले आहे. येशूच्या ह्या समर्पणात परमेश्वराचा गौरव होता आणि ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा नवा तेजोमय प्रकाश होता.

ख्रिस्ताचे पुनरुत्थान हे परमेश्वराने येशूचे बलिदान स्वीकारल्याचे एक प्रभावी प्रतीक आहे म्हणून मिस्सा केवळ येशूचे क्रुसावरील बलिदान नव्हे; तर खऱ्या अर्थाने पित्याने येशूच्या समर्पणाचा जो स्वीकार केला त्याची आठवण होय. तसेच येशू ख्रिस्ताचे जीवन, आत्मबलिदान व पुनरुत्थान साजरे करणे आणि ते जगणे म्हणजेच पुनरुत्थित ख्रिस्ताचे जीवन

साजरेपण होय. धर्मगुरू प्रापंचिकांसह मिस्सा साजरी करताना, आपला पुनरुत्थित ख्रिस्त ह्या विधीत पूर्णपणे सहभागी होऊन भाविकांच्या मनाचा, मानसिकतेचा शोध घेत असतो. म्हणूनच ख्रिस्ती धर्मात पुनरुत्थित ख्रिस्तासह मिस्सा साजरी करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

मिस्सा साजरी करताना विधीप्रमुख धर्मगुरू म्हणतात, ''हे प्रभो, तुझा पुत्र, आमचा प्रभू ख्रिस्त ह्याच्या पवित्र दु:खसहनाची, मृतांमधून झालेल्या पुनरुत्थानाची व त्याच्या गौरवशाली स्वर्गारोहणाची पूज्य स्मृती साजरी करीत असताना, आम्ही तुझे सेवक व तुझे पवित्र लोक, तू आम्हांला दिलेल्या दानांमधून तुझ्या ऐश्वर्यशाली सन्मानासाठी हा परिशब्द बळी, हा पवित्र बळी, हा निष्कलंक बळी, ही शाश्वत जीवनाची पवित्र भाकर आणि हा सार्वकालिक तारणाचा प्याला तुझ्या गौरवशाली राजवैभवासाठी अर्पण करीत आहोत. आमच्या ह्या दानांवर प्रसन्न व प्रेमळ नजरेने पाहण्याची कृपा कर आणि आमच्या ह्या दानांचा स्वीकार कर'' (रोमन मिस्साग्रंथ - आभारघोष प्रार्थना १, पान क्र. ५१०).

पुनरुत्थानाच्या प्रकाशाच्या तेजोमय स्पर्शाने धर्मगुरू भाविकांसह मिस्सा साजरी करतात. ह्या साजरेपणात एक वैभव, बलस्थान आहे. ह्या साजरेपणात घाई करून चालणार नाही. ख्रिस्ताचे जीवन, दु:खसहन, पुनरुत्थान साजरे करताना ख्रिस्तासाठी योग्य वेळ देणे महत्त्वाचे आहे. मिस्सा साजरी करताना ख्रिस्त आपल्या सर्वांशी एकरूप होऊ इच्छितो. त्याला आपला शोध घेण्यास वेळ देण्याची नितांत गरज आहे.

लॅटिन अमेरिकेत एल साल्वादोरचे आर्चबिशप ऑस्कर रोमेरो आणि काही धर्मगुरू लोकांच्या संघर्षाच्या, अन्यायाच्या काळात त्यांना साथसोबत करण्यासाठी आणि त्यांच्यासाठी लढा देण्यासाठी रस्त्यांवर, गल्लीबोळात, चौकाचौकांत, गावांत, घरांत मिस्सा साजरी करून त्यांना पुनरुत्थित ख्रिस्ताची प्रेरणा देत होते. आपल्या संघर्षात भाविक ख्रिस्ताचा आणि ख्रिस्त भाविकांचा शोध घेत होता. मुक्तिदाता ख्रिस्त त्यांचे बलस्थान ठरले. ह्या मुक्तीच्या लढ्यात आर्चबिशप ऑस्कर रोमेरो, काही जेज्वीट व धर्मप्रांतीय धर्मगुरू आणि प्रापंचिक ह्यांना आपले रक्त सांडावे लागले. मात्र त्यांचे रक्त वाया गेले नाही. पुनरुत्थित ख्रिस्ताच्या प्रेरणेतून आणि मिस्सा साजरीकरणातून भाविकांच्या जीवनात ख्रिस्ताचे पुनरुत्थान झाले आणि त्यांना ख्रिस्त सापडला व ख्रिस्ताला त्यांचा शोध लागला.

मोबाईल : 99 75 08 67 00


# SARAH & SARAH TOURS

Since 2005

1) **ANDAMAN -** HAVELOCK, NEIL ISLAND : DT. 19 TO 24 APRIL '26, RS. 25,000/- + FLIGHT.
2) **ROYAL HIMACHAL - SIMLA, KULLU, MANALI, ROHATANG, CHANDIGARH :** Dt. 9th to 18th May '26 Rs. 42,000/- RAJDHANI TEJAS EXPRESS, RIVER RAFTING, KUFRI HORSE RIDE, SIMLA ZOO etc.
3) **VENUS VIETNAM -** HANOI, DA NANG, HALONG BAY, HO CHI MINH, 1 NIGHT 5 STAR CRUISE - Dt. 1ST. EVENING to 9TH MAY '26 Rs. 1,13,000/-.
4) **SRILANKA - KANDY, NEW ELLIYA, BENTOTA, COLOMBO** Dt. 03 to 08 MAY 2026 RS. 65000/-.
5) **SINGAPORE MALAYSIA-GENTING , THAILAND - BANGKOK PATTAYA -** Dt. 20th to 31st MAY '26 Rs. 1,35,000/-, Universal studio, Sentosa Island, Twin Towers, Boat Cruise Etc, 2nd Group.
6) **THAILAND - BANGKOK PATTAYA :** Dt. 26th to 31st MAY '26 Rs. 60,000/-.
7) **LAZAWAB MAHABLESHWAR, PANCHGANI, PRATAPGARH** : DT. 03 to 06 June'26 RS. 13,000/-.
8) **CARMEL MAULI - VAILANKANNI NOVENA :** 4 TO 18 JULY'26 - 25th SILVER JUBILEE 1) RS. 25,000/-Full AC package With Travelling & 2) RS. 19,000/- Full only Room n Food.

**Cont. : Prop.Charles : 9930871303**

**C/O - William : 9930832035 & C/O Swapnil : 9970585051**

Office No. 02, SIMON SMRUTI BLDG, Near PASAYDAN church, NALLA

इतिहास

# ऐतिहासिक येशू : क्रुसावरील मृत्यू ते रिकामी कबर

-डॉ. मॅकनोबल मायकल डिक्रुझ
अंजेरी, नंदाखाल

ईस्टर रविवार हा ख्रिस्ती विश्वासाचा पाया आहे. परंतु आधुनिक काळात जेव्हा आपण येशू ख्रिस्त ह्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करतो, तेव्हा अनेकदा श्रद्धा आणि इतिहास ह्यांच्यात गल्लत होते. जेव्हा मी इतिहासाच्या पानात डोकावतो, तेव्हा मला केवळ श्रद्धेचा येशूच नाही; तर ऐतिहासिक येशू सुद्धा प्रकर्षाने जाणवतो. ह्या लेखात आपण बायबलच्या पलीकडे जाऊन रोमन दस्तऐवज, पुरातत्त्वीय शोध आणि त्या काळातील कायद्यांच्या आधारे येशूच्या जीवनाचा आणि पुनरुत्थानाचा वेध घेणार आहोत.



### १. येशू ख्रिस्त : एक ऐतिहासिक सत्य की दंतकथा?

काही विचारवंतांचे मत होते की येशू ही केवळ एक काल्पनिक व्यक्तिरेखा आहे. परंतु आधुनिक इतिहासकारांनी हे पूर्णपणे खोडून काढले आहे. पहिल्या शतकातील दोन प्रमुख ख्रिस्तीतर इतिहासकारांनी येशूच्या अस्तित्वाचा पुरावा दिला आहे.

फ्लॅव्हियस जोसेफस हा ज्यू इतिहासकार होता. त्याने इ.स. ९३मध्ये 'Antiquities of the Jews' ह्या ग्रंथात येशूचा उल्लेख 'एक ज्ञानी माणूस' आणि 'ख्रिस्त म्हटला जाणारा' असा केला आहे. कॉर्नेलियस टॅसिटस हा प्रख्यात रोमन इतिहासकार होता. त्याने स्पष्टपणे लिहिले आहे की, ''ख्रिस्ताला तिबेरियसच्या राजवटीत पॉन्टियस पिलातने मृत्युदंड दिला होता.'' हे पुरावे महत्त्वाचे आहेत. कारण हे लेखक ख्रिस्ती नव्हते; उलट, त्यांना ह्या नवीन चळवळीबद्दल फारसा आदर नव्हता. तरीही त्यांनी येशूच्या अस्तित्वाची आणि त्याच्या मृत्यूची नोंद केली.

### २. रोमन कायदा आणि राजद्रोह

येशूला क्रुसावर का चढवण्यात आले? ह्याला केवळ धार्मिक कारण नव्हते. रोमन साम्राज्यात ज्यू धर्मगुरूंना कोणालाही सुळावर देण्याचा अधिकार नव्हता. त्यांनी येशूला रोमन गव्हर्नर पॉन्टियस पिलातकडे नेले तेव्हा त्यांनी त्याच्यावर 'Lex Julia Maiestatis' (राजद्रोहाचा कायदा) अंतर्गत आरोप लावला. येशूने स्वत:ला 'राजा' म्हटले होते. रोमन कायद्यानुसार सिझरशिवाय दुसरा कोणीही राजा असू शकत नव्हता. म्हणून येशूचा गुन्हा धार्मिक पाप नसून रोमन साम्राज्याविरुद्धचा राजकीय गुन्हा ठरवण्यात आला. क्रुसावर लावलेली पाटी ज्यावर 'INRI' (नाझरेथचा येशू, ज्यूंचा राजा) लिहिले होते, ते प्रत्यक्षात त्याचे अधिकृत दोषारोपपत्र होते.

**ईस्टर हा केवळ धार्मिक सण नाही; तर तो सत्याच्या विजयाचा ऐतिहासिक दाखला आहे.**

### ३. क्रुसावरील मृत्यू आणि दफनविधी : पुरातत्त्वीय पुरावे

काही टीकाकार म्हणतात की क्रुसावर चढवलेल्या गुन्हेगारांना सन्मानाने पुरले जात नसे; तर त्यांचे मृतदेह उघड्यावर टाकले जात. मग येशूच्या थडग्याची कथा खरी कशी? १९६८मध्ये जेरुसलेममध्ये एका उत्खननात यहोहानान नावाच्या व्यक्तीचे अवशेष सापडले. ह्या व्यक्तीला क्रुसावर चढवण्यात आले होते. कारण त्याच्या टाचेच्या हाडात आजही लोखंडी खिळा अडकलेला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ह्या गुन्हेगाराला एका व्यवस्थित कौटुंबिक थडग्यात पुरले होते. ह्या शोधामुळे हे सिद्ध झाले की रोमन काळातही क्रुसावर दिलेल्या गुन्हेगाराचा मृतदेह त्याच्या नातेवाईकांना सन्मानाने पुरण्यासाठी दिला जात असे. हे वर्णन बायबलमधील अरिमथाईच्या योसेफने येशूचा मृतदेह मागून घेतल्याच्या घटनेला ऐतिहासिक पुष्टी देते.

### ४. नाझरेथचा शिलालेख

इतिहासातील सर्वांत वेधक पुरावा म्हणजे १८७८मध्ये नाझरेथमध्ये सापडलेला एक संगमरवरी शिलालेख. हा शिलालेख इसवीसनाच्या पहिल्या शतकातील असून त्यावर रोमन सम्राटाची आज्ञा कोरलेली आहे. ह्या कायद्यानुसार, 'थडग्यातून मृतदेह चोरणे किंवा हलवणे' हा आता केवळ गुन्हा नसून त्याला देहान्ताची शिक्षा दिली जाईल, असे जाहीर केले होते. इतिहासकार असा प्रश्न विचारतात : रोमच्या सम्राटाला अचानक थडग्यातून मृतदेह चोरीला जाण्याबाबत इतका कडक कायदा का करावा लागला? ह्याचे उत्तर येशूच्या रिकाम्या कबरेच्या बातमीने जेरुसलेममध्ये निर्माण झालेल्या गोंधळात दडलेले असावे. ज्यू अधिकाऱ्यांनी असा दावा केला होता की शिष्यांनी मृतदेह चोरला आणि ह्या अफवा रोखण्यासाठी रोमने हा कठोर कायदा लागू केला असावा.

**५. रिकामी कबर : एक ऐतिहासिक समस्या**

येशूच्या पुनरुत्थानानंतर सर्वांत मोठी वस्तुस्थिती ही होती की, त्याची कबर रिकामी होती. येशूचा मृतदेह तिथेच असता, तर रोमन किंवा ज्यू अधिकारी तो मृतदेह जनतेसमोर आणून ही नवीन ख्रिस्ती चळवळ एका दिवसात संपवू शकले असते. परंतु कोणालाही तो मृतदेह शोधता आला नाही.

इतिहासाच्या कसोटीवर उतरणारी दुसरी गोष्ट म्हणजे स्त्रियांची साक्ष. त्या काळी ज्यू आणि रोमन कायद्यानुसार स्त्रियांची साक्ष न्यायालयात ग्राह्य धरली जात नसे. जर ख्रिस्ती शिष्यांना पुनरुत्थानाची खोटी कथा रचायची असती, तर त्यांनी पहिले साक्षीदार म्हणून थोर पुरुषांची किंवा प्रतिष्ठित व्यक्तींची नावे घेतली असती. परंतु सर्व शुभवर्तमाने सांगतात की मरिया मग्दालिया आणि इतर स्त्रियांनी प्रथम पुनरुत्थान पाहिले. हेच सिद्ध करते की ही कथा रचलेली नसून ती जशी घडली तशीच लिहिली गेली आहे.

**६. शिष्यांचे परिवर्तन : सर्वांत मोठा पुरावा**

मानसशास्त्रीय आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहिले तर, येशूच्या मृत्यूच्या वेळी त्याचे सर्व शिष्य घाबरून पळून गेले होते. पेत्राने त्याला ओळखण्यास नकार दिला होता. परंतु, काही दिवसानंतर हेच शिष्य जेरुसलेमच्या रस्त्यावर उभे राहून धैर्याने सांगू लागले की येशू जिवंत झाला आहे. ह्या दाव्यासाठी त्यांना प्रचंड छळ सहन करावा लागला, अनेकांना हौतात्म्य आले. कोणीही एका खोट्या गोष्टीसाठी आपला जीव देत नाही. त्यांच्या जीवनातील हा आमूलाग्र बदल हाच येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा सर्वांत जिवंत पुरावा आहे.

**७. निष्कर्ष : आजच्या काळासाठी ईस्टरचा अर्थ**

वाणिज्य आणि व्यवस्थापन क्षेत्रांत आपण ऑडिट आणि व्हेरीफिकेशन ह्या संकल्पना वापरतो. जेव्हा आपण येशूच्या पुनरुत्थानाचे ऐतिहासिक ऑडिट करतो, तेव्हा आपल्याला असे दिसते की

१) येशूचा मृत्यू एक ऐतिहासिक घटना होती.

२) त्याची कबर रिकामी असणे ही एक प्रशासकीय समस्या बनली होती.

३) त्याच्या शिष्यांत झालेला बदल हा समाजशास्त्रीय चमत्कार होता.

म्हणूनच, ईस्टर हा केवळ धार्मिक सण नाही; तर तो सत्याच्या विजयाचा ऐतिहासिक दाखला आहे. मृत्यूवर विजय मिळविणारा ख्रिस्त आपल्याला हेच सांगतो की, अंधार कितीही गडद असला तरी सत्याचा प्रकाश त्याला भेदून बाहेर पडतोच. ह्या पावन प्रसंगी, आपण केवळ श्रद्धेनेच नव्हे; तर ज्ञानाने आणि खात्रीने गाऊया -

''ख्रिस्त खरोखर जिवंत झाला आहे! आल्लेलुया!''

मोबाईल : 96 73 25 01 98


## जेरूसलेम टूर्स अ‍ॅन्ड कॅटरिंग सर्व्हिस, आगाशी

**१) निसर्गरम्य कोकण-गोवा दर्शन सहल :-** दि. १२ ते १७ एप्रिल २०२६. ए.सी. ट्रेन, ए.सी. बस, ए.सी. रूम, (प्रवास शक्यतो वसई ते वसई. क्रुझ सफर, समुद्र सफर विथ डॉल्फिन दर्शन, मसाला गार्डन, कोकण तारकर्ली बीच, सिंधुदूर्ग किल्ला व लाकडाच्या खेळण्याचा बाजार, खरेदी, संत फ्रान्सिस झेविअर दर्शन (चर्च), भारदार पार्टी तसेच एक दिवस मालवणी जेवणाचा आस्वाद! एकूण खर्च प्रत्येकी रु. १७,०००/- व ५ ते १० वर्षे मुलांस प्रत्येकी रु. १४,०००/- मात्र.

**२) मँगलोर-उडीपी कुर्ग सहल :** दि.४ मे १२ मे २०२६. ए.सी. ट्रेन, ए.सी. बस, ए.सी. रूम, सर्व काही बघण्यासारखं, फूल खाण्यापिण्याची धम्माल! एकूण खर्च प्रत्येकी रु.२५,०००/- व ५ ते १० वर्षे मुलांस प्रत्येकी रु. २२,०००/- मात्र.

**३) हैद्राबाद रामोजी फिल्म सिटी सहल :** दि. १२ ते १७ मे २६ ए.सी. ट्रेन, ए.सी. बस, ए.सी. रूम, सर्व एन्ट्री फीसहीत, गेट टुगेदर पार्टी एकूण खर्च प्रत्येकी रु. १६,५००/- व ५ ते १० वर्षे मुलांस प्रत्येकी रु. १४,०००/- मात्र.

**४) वेलंकनी माता नोव्हेना :** दिनांक ४ ते १८ जुलै २०२६. खास कोळी बांधवांसाठी. बुकींग चालू झाली आहे.

**सूचना :** वरील तिन्ही सहलींसाठी तीन जणांस एक रूम असेल.

**संपर्क :-** १. संज्याव घोन्सालवीस, आगाशी : **9320888907**
२. पायस घोन्सालवीस, आगाशी : **9766092738**

## ॲरॉन टूर्स अ‍ॅन्ड ट्रॅव्हल्स

**आयोजक : श्री. मायकल बरबोज व सौ. आर्पिना बरबोज**
**मो. : ९८५०५३३२१४, ९२८४५०३९६१**

**१) बँगलोर, म्हैसूर, उटी, कुर्ग, वायनाड सहल :** दिनांक २० एप्रिल ते ३० एप्रिल २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. २९,०००/- + रेल्वे किंवा विमान प्रवास खर्च.

**२) कोकण-गोवा सहल :** दिनांक ९ एप्रिल ते १४एप्रिल २०२६. संपूर्ण ए.सी.पॅकेज. खर्च प्रत्येकी रु. १६,५००/-तारकर्ली, सिंधुदूर्ग किल्ला, कोकण, तीन रात्र गोव्यात. गेट टुगेदर पार्टी.

**३) अमृतसर - काश्मिर सहल :** दिनांक २ मे ते १३ मे २०२६. खर्च प्रत्येकी रु. ३८,५००/-. जालीयनवाला बाग, गोल्डन टेंपल, वाघा बॉर्डर, गुलमर्ग, सोनमर्ग, लोकल साईड, पेहेलगाम.

**४) कोलकत्ता, गँगटोक-सिक्कीम (पेलींग), दार्जिलिंग-नेपाळ बॉर्डर सहल :** दिनांक १७ मे ते २८ मे २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. ३८,५००/-+रेल्वे -विमान प्रवास, गेट टुगेदर पार्टी.

**५) दुधनी-खानवेल सहल :** दिनांक ३० व ३१ मे २०२६. गेट टुगेदर पार्टीसहीत खर्च रु. ५,०००/- (चार जणांस एक रूम)

**६) मद्रास वेलंकनी नोव्हेना :** दि. ४ ते १८ जुलै २०२६. ए.सी. रेल्वे, ३ए.सी. व ए.सी.रूम खर्च रु. २३,५००/- ५ दिवसांचा नोव्हेना खर्च रु. १४,०००/-. ऑगस्ट-सप्टेंबर बुकींग सुरू आहे.

**७) महाबळेश्वर-पांचगणी-प्रतापगड सहल :** दिनांक ३० मे ते २ जून २०२६. २×२ पुश बॅक ए.सी.पुश बॅक बस. खर्च प्रत्येकी रु. १३,०००/- (चार जणांस एक रुम).


FLORENCE
FLORENCE TOURS & TRAVEL
7N / 8D
VIETNAM
1,20,000/- Per Person
1,18,000/-
Special Price
18th May 2026
5N / 6D
SRI LANKA
68,000/- Per Person
65,000/-
Special Price
2nd May 2026
5N / 6D
THAILAND
68,000/- Per Person
65,000/-
Special Price
8th May 2026
6N / 7D
KASHMIR
35,000/-*
Per Person
20th May 2026
27th May 2026
5N / 6D
DUBAI
87,000/- Per Person
85,000/-
Special Price
2nd May 2026
SPECIAL DISCOUNTS ON ALL HONEYMOON AND CUSTOMISED PACKAGES
8N / 9D
BAKU GEORGIA
1,50,000/- Per Person
1,45,000/-
Special Price
28 May 2026
Diwali Vacation
Vietnam | Dubai | Sri Lanka
Hong Kong & China | Thailand
* Meghlay, Kashmir, Leh Ladhak including only land package
BOOK NOW
INCLUSIONS
Pickup Drop
Flight
Visa
Hotels
Sightseeing
All Meals.
Brian Dabre 7710027271
Wilfred Pereira 9922638520

धार्मिक

# ख्रिस्त आज विजयी झाला

- फा. व्हॅलेंटाईन पावकर
मर्सेस

ख्रिस्ताचे पुनरुत्थान म्हणजे ख्रिस्ती विश्वासाचा आत्मा आहे. ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाने आपल्यासाठी पवित्र आत्म्याचे वरदान बहाल केले. ख्रिस्ताने मरणावर विजय मिळवून प्रत्येक मानवाच्या मनात आशेचा अंकुर फुलविला. ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाने आपणांस नवजीवन व आशा प्राप्त करून दिली. जसा गव्हाचा दाणा कुजतो, रुजतो तेव्हा हजारो दाणे निघतात तसे ख्रिस्ताच्या मरणाने प्रत्येक मानवाचे तारण झाले आहे.

प्रभू येशूला मेल्यानंतर जेव्हा पुरण्यात आले तेव्हा सर्व शिष्य, मरिया माग्दलेना व काही भाविकांच्या आशा-आकांक्षा गाडल्या गेल्या आणि त्यांच्या पदरी निराशा आली. जणूकाही ख्रिस्तानेच त्यांच्या आशा-आकांक्षा धुळीमध्ये गाडून घेतल्या. परंतु प्रभू येशू आपल्या शरीराच्या मंदिराला तीन दिवसांत पुनरुत्थानाने पुन्हा उघडतो. दोन हजार वर्षांपूर्वी हा प्रभू येशू ख्रिस्त मेलेल्यांतून उठला नसता, तर आज हा पुनरुत्थान सोहळा साजरा केला गेला नसता. परंतु प्रभू येशू मेलेल्यांतून उठला आहे व सर्व शिष्यांना प्रकट झाला. हे पाहून सर्वांच्या अपेक्षांना जिवंतपणाचे कोंब फुटले व स्वर्गराज्याची आशा निर्माण झाली. पुनरुत्थानामुळे ख्रिस्ताने आपल्यासाठी पवित्र आत्म्याचे वरदान बहाल केले. प्रत्येक माणसाच्या मनात आशेचा अंकुर फुलविला. आपणांस नवजीवन दिले.

जेव्हा शास्त्री लोकांनी येशूला प्रश्न विचारला तेव्हा त्याने शास्त्री लोकांना योना संदेष्ट्याचे उत्तर दिले (मत्तय १२:३८-४२), ''जसा योना संदेष्टा मोठ्या माशाच्या पोटात तीन दिवस व तीन रात्र होता, तसा मनुष्याचा पुत्र तीन दिवस व तीन रात्र पृथ्वीच्या पोटात राहिला.'' 'हे मंदिर उद्ध्वस्त करा व मी, ते तीन दिवसांत पुन्हा उभारीन' (योहान २:१९). त्याने हे स्वत:च्या शरीराविषयी



भाकीत केले होते. ज्याप्रमाणे येशूने अभिवचन दिले होते त्याचप्रमाणे तिसऱ्या दिवशी तो उठला. प्रभू येशूचे पुनरुत्थान म्हणजे, जगातील एकमेव महान सत्य आहे. मरिया माग्दलिया येशूच्या कबरेजवळ आली असताना, तिने रिकामी कबर पाहिली. तिने ती बातमी शिष्यांना कळविली. त्या कबरेजवळ दूतांचा सहवास त्या संदेष्ट्यांनी घेतला. ''तुम्ही भिऊ नका, तो (येशू) उठला आहे.'' प्रेषितांनी येशूच्या पुनरुत्थानावर विश्वास ठेवला व ही शुभवार्ता वाऱ्यासारखी पसरली.

'प्रभू येशूचे पुनरुत्थान हा ख्रिस्ती जीवनाचा मूळ पाया आहे.' येशूच्या पुनरुत्थानामुळेच सर्व विश्वासू असणाऱ्यांच्या मनात पुनरुत्थानाची आशा निर्माण झाली.

> **पुनरुत्थानामुळे ख्रिस्ताने आपल्यासाठी पवित्र आत्म्याचे वरदान बहाल केले.**

संत पॉल म्हणतो, आपल्या जीवनातील आजार, संकटे, अपयश, नैराश्य, वैफल्यग्रस्तता इ. प्रसंगी येशूचे दु:खसहन, मरण व पुनरुत्थान ह्यांवर चिंतन करू. धीराने व आशेने त्यावर मात करण्यासाठी प्रभू येशूला शरण गेले पाहिजे. जीवनात घडणाऱ्या अनेक घटनांमधून पुनरुत्थानाचा अनुभव मिळत असतो. संत पेत्राने व संत पॉलने ज्याप्रमाणे आपल्या वाणीद्वारे व आचरणाद्वारे पुनरुत्थित ख्रिस्ताची साक्ष दिली, त्या पुनरुत्थानाचा सोहळा साजरा करीत असताना ख्रिस्तसभा सुवार्ता प्रचाराचे आवाहन करीत आहे. आपल्या शब्दांद्वारे, कृतींद्वारे व आचरणांद्वारे पुनरुत्थित ख्रिस्त आपल्या जीवनातून प्रतिबिंबित व्हावा.

''त्याच्या हातात खिळ्यांचे व्रण पाहिल्यावाचून, खिळे होते त्या जागी आपले बोट घातल्यावाचून व त्याच्या कुशीत आपला हात घातल्यावाचून मी विश्वास धरणारच नाही'' (योहान २०:२४-२५) असे उद्‌गार संत थॉमसने काढले. तो येशूचा जवळचा शिष्य होता. तो येशूसोबत राहिला होता, त्याने येशूचे चमत्कार पाहिले होते. येशूचे शब्द त्याने ऐकले होते. तरीही येशूच्या पुनरुत्थानावर त्याने विश्वास ठेवला नाही. मग शास्त्री, परुशी व इतर लोक येशूच्या पुनरुत्थानावर विश्वास कसा ठेवतील? ८ दिवसानंतर शिष्य एकत्र असताना येशू प्रकट झाला व त्यांना म्हणाला, ''तुम्हांस शांती असो!'' नंतर त्याने थोमाला म्हटले, ''तू आपले बोट इकडे कर व माझे हात पाहा व आपला हात पुढे करून माझ्या कुशीत घाल आणि विश्वासहीन असू नको, तर विश्वास ठेवणारा ऐस.'' थोमाने म्हटले, ''माझा प्रभू, माझा देव.'' येशूने त्याला म्हटले, ''तू मला पाहिले म्हणून विश्वास ठेवला आहे पण पाहिल्यावाचून विश्वास ठेवणारे ते धन्य!'' (योहान २०:२७-२९)


प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने प्रभू येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानावर विश्वास ठेवला पाहिजे. पुनरुत्थानाचे हे सत्य आचरणात आणले पाहिजे.

''मी कुठेही कसा ही असो, ख्रिस्त माझ्यामध्ये तो दिसो!''

मोबाईल : 98 90 22 78 40

# पुनरुत्थानावरचा विश्वास

-फा. ओनिल फरोज
वाडा



गेल्या पन्नास वर्षांतील महान धर्मतज्ज्ञांपैकी एक Jurgen Moltmann मुळात क्वांटस भौतिकशास्त्राचा विद्यार्थी होता. पण तो युद्धाच्या भोवऱ्यात अडकला. दुसऱ्या महायुद्धात पकडला गेला. कैदेत टाकला गेला. त्या कैदेतील थडग्यासारख्या अनुभवाने त्याचे आयुष्य बदलले. कैदेत असतानाच त्याने जीवनाचा अर्थ शोधला आणि कसे जगायचे हे ठरवले. मुक्त झाल्यावर मोल्टमानने भौतिकशास्त्राचा मार्ग सोडला आणि धर्मशास्त्राकडे वळला. कारण त्याने मृत्यूच्या सावलीत पुनरुत्थानाचा प्रकाश पाहिला होता. त्यांच्या मते आपण पृथ्वीवर क्रूस आणि पुनरुत्थान ह्यांच्या दरम्यानच्या विरोधाभासाच्या अवस्थेत जगत आहोत. जीवन दु:खाने वेढलेले असूनही आपण परिपूर्णतेचे स्वप्न पाहू शकतो, कारण गौरवशाली भविष्यावर विश्वास टिकवून ठेवला, तर तो वर्तमानालाही बदलतो. जसा कैद्यांच्या छावणीत एक दिवस मुक्त होण्याच्या आशेने मोल्टमान ह्यांच्या प्रत्येक दिवसाला अर्थ प्राप्त झाला.

कवी जॉर्ज हर्बट लिहितात, ''अविश्वास दूर होवो; माझ्या देवाने वचन दिले आहे तो न्यायी आहे.''

कवीच्या ह्या चिंतनातून हीच आशा उमलते. ह्या जगात विरोधाभास कितीही असले, तरी अजून न दिसणाऱ्या न्यायावर विश्वास ठेवायचा असतो. हा विश्वास अविवेकी वाटतो; पण पुनरुत्थानाचा अर्थ उलगडू लागला की तोच विश्वास सर्वांत तर्कसंगत ठरतो. आयरिश कवी पॅट्रिक कवानाघ म्हणतात, ''पुनरुत्थान म्हणजे दु:खाच्या वेदनेतून मुक्त झालेले हास्य.'' ह्याचा अर्थ वेदना आपल्याला फार काळ बांधून ठेवू शकत नाहीत. ह्या तत्त्वावर आपण आयुष्य पणाला लावतो, तेव्हा आपण मानतो की हे जगही पुनरुत्थानाच्या विश्वासाने बदलेल. धर्मतत्त्वज्ञ कार्ल राहनर ह्यांनी लिहिले आहे, ''मी तुमच्या सोबत जगलो आणि तुमच्या सोबत मरण पावलो. मी तुमचे जीवन आहे. मी तुम्हाला वचन देतो. तुमच्यासाठीही जीवन वाट पाहत आहे. तुमच्यासाठीही दारे उघडतील.'' अशा विश्वासावर उभे राहिलेले जीवन अंधारालाही प्रकाशात बदलते कारण पुनरुत्थानाची पहाट आधी मनात उगवते आणि मग जगात. संत पौलने घोषित

> **''पुनरुत्थान म्हणजे दु:खाच्या वेदनेतून मुक्त झालेले हास्य.''**

केल्याप्रमाणे ख्रिस्त मरण पावला, पण तिसऱ्या दिवशी शास्त्रांच्या गूढ संकेतांप्रमाणे तो पुन्हा उठला. हा केवळ घटनाक्रम नाही; हा आहे मानवी निराशेच्या काठावर देवाच्या हस्ताक्षराचा प्रकाश. ह्या रहस्याच्या शोधात अनेकांनी आयुष्य घालवले. त्यांपैकी एक धर्मग्रंथांचा सूक्ष्म अभ्यासक, गंभीर चिंतनाचा साधक रेमंड इ. ब्राऊन. जवळजवळ चार दशके त्यांनी क्रुसावर खिळलेल्या ख्रिस्ताचा अभ्यास केला. त्यांच्या लेखणीमधून केवळ विद्वत्ता नव्हे; तर श्रद्धेचा निनादही उमटत राहिला. मृत्यूच्या काही आठवडे अगोदर कोणीतरी त्यांना विचारले, ''आता पुढे पुनरुत्थानाच्या कथांवरही तुम्ही तसाच ग्रंथ लिहिणार का?'' ते क्षणभर हसले आणि शांतपणे म्हणाले, ''क्रुसहत्येच्या कथांचा अभ्यास मी विश्वासाने केला आहे म्हणून पुनरुत्थानाच्या कथांचे खरे संशोधन मी देवाशी प्रत्यक्ष भेटीत करणार आहे.'' आणि त्यानंतर काही आठवड्यांतच त्यांची पृथ्वीवरील यात्रा संपली आणि ते खरोखरच त्या अंतिम संशोधनासाठी निघून गेले. पण त्यांच्या त्या वाक्यात एक गूढ प्रकाश दडलेला आहे. कारण पुनरुत्थानावरचा विश्वास हा केवळ सिद्धांत नाही; तर विश्वासाच्या आशयाला बदलवणारा केंद्रबिंदू आहे. कारण पुनरुत्थानावरचा विश्वास हा केवळ अभ्यासण्याचा विषय नाही; ते आहे जगण्याचे रहस्य, अनुभवण्याची पहाट आणि शेवटी देवाशी समोरासमोर उभे राहून समजून घेण्याचा अंतिम प्रकाश.

पुनरुत्थानावरचा विश्वास मृत्यूला नाकारणं नाही; तर त्याच्या डोळ्यांत डोळे घालून उभ्या राहणाऱ्या सत्यांत सापडतो. तो केवळ थडग्याच्या दगडावर लिहिलेला विजय नाही, तो अंधाराच्या अंतरंगात लावलेला एक दिवा आहे. मृत्यूच्या

पकडीतून मुक्त करण्याची शक्ती ही केवळ बंधन तोडण्याची क्रिया नाही; ती मनाच्या साखळ्यांत अडकलेल्या आत्म्याला स्वत:च्या मूळ प्रकाशाची आठवण करून देणे आहे. म्हणून पुनरुत्थान म्हणजे एकदा घडलेली घटना नव्हे; तर प्रत्येक क्षणी मृत्यूच्या विविध रूपांना नव्या जीवनाने उत्तर देणारा अनंत प्रतिसाद आहे.

पडझड ही शेवटची भाषा नाही, ती केवळ प्रवासातील एक विरामचिन्ह आहे. आपण वारंवार कोसळलो तरी राखेत निखारे शिल्लक असतात; अंधाराच्या तळाशीही प्रकाशाची बीजे गुप्तपणे अंकुरत असतात ह्याचे भान असावे, कारण ख्रिस्त स्वत: जीवनाचा श्वास घेऊन थडग्याच्या दगडामागून उभा राहिला; मृत्यूच्या थंड मिठीत शिरून त्याच्या पोकळ सामर्थ्याला स्पर्श केला आणि त्या स्पर्शानेच त्याचे अस्तित्व धुळीत मिसळून गेले. मृत्यूला ख्रिस्ताने बाहेरून हरवले नाही, तो आत उतरला. त्याच्या गाभाऱ्यातील अंधार ओलांडून तेथेच प्रकाश पेटवला. हे यशया संदेष्ट्याने पूर्वीच उद्घोष केले आहे. "तो भेटला आणि अधोलोक हादरला." प्रत्येक अश्रूत नव्या प्रभाताची चाहूल आहे. आपण कोसळतो, पण कोसळण्यातूनच आपल्याला उभे राहण्याचा अर्थ कळतो आणि त्या उभे राहण्यात आपल्याला उमगते की थडगे ही समाप्ती नसते, ती तर विश्वासाच्या जन्माची अदृश्य प्रसूतीवेदना असते.

ज्या इस्राएलच्या भूमीतून पुनरुत्थानाचा प्रकाश उगवला, त्याच भूमीत आज माणूस आतून कोसळत आहे. पवित्रतेच्या राखेतून युद्धाची ज्वाला उसळते आणि श्रद्धेच्या सावलीत अविश्वासाची तलवार चमकते. This Was Not Our War ह्या शीर्षकाला जर आजचे जग नवे नाव देणार असेल, तर कदाचित ते म्हणेल, हे आमचे युद्ध नाही किंवा आणखी खोल जाऊन हे कुणाचेच युद्ध नाही. कारण प्रत्येक स्फोट सीमांच्या पलीकडे जखमा सोडतो. प्रत्येक गोळी मानवतेच्या सामायिक देहात घुसते. ह्या पुस्तकाच्या लेखिका स्वानी हंट आपल्या विवेकाला प्रश्न विचारतात, आपण आगीला आगीने उत्तर देत आहोत, धडा शिकवण्याच्या नावाखाली रक्ताच्या अक्षरात इतिहास लिहितो आहोत; पण आजवर जे काही केलं, ते निष्फळ ठरलं नाही का? युद्धाच्या प्रतिध्वनित आपण स्वत:चाच आवाज हरवला आहे. विजयाच्या घोषणांमध्ये पराभवाचे बीज दडलेले आहे. म्हणूनच कदाचित नव्या दृष्टिकोनाची गरज ही केवळ कल्पना नाही, ती एक नैतिक क्रांती आहे; शस्त्राऐवजी संवाद, प्रतिशोधाऐवजी समज आणि सामर्थ्याऐवजी करुणा ह्यांना केंद्रस्थानी ठेवणारी. कारण युद्ध जिंकले तरी मानव हरतो आणि जेव्हा आपण म्हणू शकतो हे कुणाचंच युद्ध नाही, तेव्हाच कदाचित आपण प्रथमच खऱ्या शांततेच्या दिशेने पुनरुत्थानाची वाट चालायला लागू.

पुनरुत्थानाच्या उजेडात जे शक्य आहे असे आपल्याला जाणवते, तेच प्रथम स्वीकारले पाहिजे कारण शक्यतेचा तो लहानगा कण विश्वासाच्या गर्भात बीजासारखा पडतो. अशक्यतेच्या भिंतीला आपल्याच श्वासाने तडे जाऊ लागतात. उजेड स्वत: मार्ग तयार करत नाही; तो आपल्याला चालायला प्रवृत्त करतो. आपल्या विश्वासाच्या चिकाटीतून, क्षमाशीलतेच्या सरावातून आणि ह्या पावलांच्या सातत्यातून अशक्यतेच्या दगडात एक सूक्ष्म भेग उमलते.

आपल्या जीवनाच्या आत्यंतिक धावपळीखाली, कर्कश गोंगाटाखाली, युद्धाच्या आणि छळाच्या सावलीत, एक विश्व जगत असते, सतत उमलणाऱ्या सौंदर्याने भरलेले. आपण त्याला जखमा देऊ शकतो, त्याच्या अंगावर ओरखडे उमटवू शकतो, पण त्याचा पूर्ण विनाश आपल्याला कधीच करता येत नाही. कारण पुनरुत्थान हे अस्तित्वाच्या गाभ्यात धडधडणारे सत्य आहे. मृत्यूच्या थंड मिठीतून सुटणाऱ्या श्वासासारखे पुनरुत्थान सतत घडत असते. आपण दगड लोटू शकतो, कबर बंद करू शकतो, आकाश काळवंडू शकतो; पण प्रकाशाच्या जन्माला कैद करू शकत नाही. कारण पुनरुत्थान म्हणजे देवाने जगावर ठेवलेली अंतिम सही, की जीवन शेवटी जिंकते, प्रेम शेवटी टिकते, आणि सौंदर्य, कितीही विदीर्ण झाले तरी, पुन्हा उमलण्याची वाट शोधते.

मोबाईल : 76 20 70 21 96


**व्ही.एम्. टूर्स अ‍ॅन्ड ट्रॅव्हल्स**

**आयोजक : टोनी डायस,** ओळंबवाडी–पापडी

**वेलंकनी नोव्हेना : ६ ते १५ मे २०२६**

रू. २८,०००/– विमानप्रवास + ए.सी. रूम + जेवण
रू. १९,०००/– ए.सी. रूम, ए.सी. रेल्वे प्रवास + जेवण
रू. १४,५००/– नॉन.ए.सी. रूम, नॉन.ए.सी. रेल्वे प्रवास + जेवण
रू. १३,०००/– ए.सी. रूम + जेवण *(रूममध्ये चार जण शेअरिंग)*

**अमृतसर–श्रीनगर (काश्मीर) सहल**
**(१९ ते २८ एप्रिल; १६ ते २७ मे २०२६)**

अमृतसर, वाघा बॉर्डर, श्रीनगर, पेहलगाम, गुलमर्ग, सोनमर्ग
२ रात्र अमृतसर, २ रात्र पेहलगाम, ४ रात्र श्रीनगर
एकूण खर्च– रू. ४०,०००/– डिलक्स हॉटेल्स, गंडोलाची फर्स्ट राईड + सर्व साईटसीन समाविष्ट
रू. ३५,०००/– (वय ४ ते ११) (घरगुती जेवण, गाईड, गेट–टुगेदरसह)
जाताना प. एक्सप्रेस एसी व येताना राजधानी एक्सप्रेस
(साईटसीनसाठी एसी बस)

**हाय–फाय काश्मीर** श्रीनगर, पहेलगाम, गुलमर्ग, सोनमर्ग
**(१९ ते २५ मे २०२६)**

एकूण खर्च– रू. २८,०००/– + विमानप्रवास, डिलक्स हॉटेल्स, सर्व साईटसीन (एसी बस, घरगुती जेवण, गाईड, गेट–टुगेदरसह)
मुंबई–श्रीनगर–मुंबई फ्लाईट

**कार्मेल माऊली नोव्हेना, वेलंकनी**
**(४ ते १८ जुलै २०२६ – १५ दिवस)**

एकूण खर्च– एसी रू. २३,०००/–, नॉन एसी रू. १७,०००/–

**Inclusion : Rly. Ticket + Dlx. Hotel Stay + All Meals (4 person per room)**

**Contact : 8485890360 / 9320385977 / 9766398405**
**9011890360 / 8459263384 / 8766589780 / 9960107733**

# माझ्या देवा... माझ्या स्वामी

-विजया डिसा
बोरिवली


त्याला मरताना मी माझ्या डोळ्यांनी पाहिले. एखादी ऐकीव गोष्ट नव्हती ही किंवा कपोलकल्पित शोकांतिकाही नव्हती. मी त्या बघ्यांच्या गर्दीत होते. हातोडीचे घाव बसत होते आणि प्रत्येक घाव त्याला छिन्नविछिन्न करत होता...

गोलगोथावर आकाश काळवंडत होते, पण माझ्या अंत:करणातील अंधार अधिक घुसमटवणारा होत होता. ज्युदासचा विश्वासघात, पेत्राचा तीन वेळा नकार, सारेच अतर्क्य... धाडसाने मी कधीतरी म्हटले होते, ''चला, आपणही त्याच्या बरोबर मरू या'' (योहान ११:१६). किती धीट वाटलो होतो मी त्यावेळेस! आणि आता, आतून किती पोकळ झालो होतो मी!...

जेव्हा त्यांनी त्याला धरले, तेव्हा मी गर्दीतून निसटलो. जेव्हा त्यांनी त्याची क्रूर थट्टा केली, तेव्हा मी लपलो. जेव्हा त्यांनी त्याला क्रुसावर खिळले, तेव्हा मी लांबून पाहत राहिलो. त्यांनी फक्त माझ्या प्रभूला क्रुसावर खिळले नाही. त्यांनी माझे उभे भविष्य तिथे खिळले. मला उमजलेला तेज:पुंज निखळला... झंझावाती वादळ शमले.

तोच तारणारा आहे, असे मी मानले होते. मृत्यू त्याच्या आवाजाने थरथरेल, असा माझा विश्वास होता. पण मला दिसले... तोच श्वासासाठी झगडत होता. भाला त्याच्या कुशीमध्ये खुपसला गेला... रक्त आणि पाणी वाहिले... प्रतीक नव्हते, रूपक नव्हते; होती ती कठोर वास्तवता.

मी सैनिकांपासून लपलो. मी इतरांपासून लपलो. मी स्वत:पासूनही लपलो. माझं चुकलं का?...अशातच ते धापा टाकत आले... चेहऱ्यावर तेज, डोळ्यांत आश्चर्य... ''आम्ही प्रभूला पाहिले''.. पाहिले? मी तर त्याला कोसळताना पाहिले होते. मी त्याला



प्रेतवस्त्रांनी गुंडाळलेले पाहिले होते. मी धोंडेने बंद झालेले थडगे पाहिले होते.

जोपर्यंत मी त्याच्या हातांवरील खिळ्यांच्या जखमा पाहत नाही, जोपर्यंत खिळ्यांनी छिंदलेल्या जागी माझं बोट ठेवत नाही, जोपर्यंत भाल्याने वेंधलेल्या कुशीवर माझा हात ठेवत नाही... तोपर्यंत मी विश्वास ठेवणार नाही! मला स्पर्श करता येईल असे सत्य हवे होते. आठवणींपेक्षा मजबूत वास्तव हवे होते.

आठ दिवस त्यांचा शांत आनंद. माझ्या आतला कोलाहल. मी चुकीचा ठरेन, ह्याची भीती होती. कारण मी माझ्या हृदयाची कवाडे घट्ट बंद करून घेतली होती आणि मीच बरोबर ठरेन, ह्याचीही

**त्यांनी फक्त माझ्या प्रभूला क्रुसावर खिळले नाही; त्यांनी माझे उभे भविष्य तिथे खिळले.**

भीती मनात दाटली होती, कारण जर तसेच असेल, तर मृत्यूच अंतिम सत्य हे सिद्ध होते. जिवाची घालमेल आणि मग... तो आम्हांमध्ये अवतरला. ना पावलांचा आवाज, ना दार उघडण्याचा आवाज. फक्त त्याची उपस्थिती... प्रत्यक्षात केवळ आठवण नाही. आभास नाही... तर देहाने, जखमांसह.... ''तुम्हांस शांती असो!'' शांती, ज्या शब्दाची माझ्या शिणलेल्या आत्म्याला सर्वांत जास्त गरज होती. मग तो माझ्याकडे वळला. त्याने मला दोष दिला नाही, माझे हट्टी शब्दही पुन्हा उच्चारले नाहीत. त्याने मला आमंत्रण दिले, ''थोमा, तुझे बोट इथे ठेव. माझे हात पाहा. तुझा हात पुढे कर आणि माझ्या कुशीमध्ये ठेव. अविश्वास सोड आणि विश्वासू हो!''

त्याला सगळे ठाऊक होते. माझे प्रत्येक कठोर वाक्य. मी तळमळून काढलेली प्रत्येक रात्र. लपवलेला प्रत्येक अश्रू. त्याच्या जखमा अजूनही ओल्याच होत्या... पण त्या पराभवाच्या नव्हत्या. त्या विजयाच्या साक्षी होत्या. क्रुसाने त्याला उंचावले होते. त्या क्षणी माझा शंकेचा आवाज वरमला. मला स्पर्श करण्याची गरज उरली नाही. त्याच्या दर्शनाने सर्व शंका गळून पडल्या. क्रुसावर खिळलेला तोच माझा प्रभू, ज्याला मी अंत:करणात पुरले होते, तो समोर जिवंत उभा होता.

माझे बंद हृदय सताड उघडले. दु:ख उपासनेत बदलले. ''माझ्या प्रभू... आणि माझ्या देवा!'' तो फक्त गुरू नव्हता. तो फक्त चमत्कार करणारा नव्हता. तो फक्त स्वप्न नव्हता. तो प्रभू होता, तो देवपुत्र होता, माझा तारणहार होता. क्रूस हे अपयशाचे चिन्ह नव्हते, ते प्रवेशद्वार होते. थडगे कारागृह नव्हते, ते त्याने जिंकलेले रणांगण होते. मृत्यूने त्याला पराभूत केले नव्हते, त्याने मृत्यूवर विजय मिळविला, तो पुनरुत्थित झाला.

आणि माझा अविश्वास...? त्याने मला दूर लोटले नाही; तर जखमी हातांनी मला जवळ घेतले. मी पुरावा मागितला... मला अनंतत्व सापडले. मी अंधारात शंका घेतली. त्याने प्रकाशाने मला वेढले. मी माझ्या पूर्ण शक्तीने शंका घेतली. मी माझ्या पूर्ण आत्म्याने त्याला शरण आलो.

# संत मेरी माग्दलेन : पुनरुत्थानाची साक्षीदार...!

-अनिल गोन्सालविस
रमेदी

पोन्ती पिलाताने 'हा यहुद्यांचा राजा आहे' असा नामफलक लावलेल्या व वधस्तंभावरील मरणदंडाची शिक्षा दिलेल्या त्या मनुष्याकडे येरुशलेम नगरातून जाणारे-येणारे वाटसरू आपली तोंडे फिरवीत होते. परंतु येशू ख्रिस्ताला क्रुसावर खिळीले त्या क्षणापासून 'ती' तिथे हजर होती. ख्रिस्ताचा एक अनुयायी, गुप्त शिष्य म्हणून अरिमथाईकर योसेफ पिलाताकडून परवानगी घेऊन त्याचे मृत शरीर क्रुसावरून उतरवितो व जवळच्या खडकात खोदलेल्या नवीन कबरीत नेऊन ठेवतो. त्या वेळेस देखील 'ती' तिथे उपस्थित होती.

बायबलमध्ये अशीच एक व्यक्ति-रेखा आहे, जिच्या चारित्र्यावर वाईट, पापी, व्यभिचारी असे शिंतोडे उडविले आहेत. बायबल अभ्यासकांच्या मते त्याचे कारणही तसेच असावे कारण, मेरी माग्दलेन गालिल समुद्राच्या पश्चिम किनाऱ्यावर वसलेल्या 'माग्दला' गावची होती, म्हणून ती मेरी माग्दलेन म्हणून परिचित होती. दुसरे कारण म्हणजे 'माग्दला' गाव वाईट कृत्य व देहव्यापार ह्यासाठी त्याकाळी कुप्रसिद्ध होते. कदाचित त्यामुळेच तिच्यावर 'पापी' म्हणून शिक्का लागला असावा. परंतु त्याने तिला दुष्ट आत्म्यांपासून मुक्त केले होते. ती संपूर्ण गालिलमध्ये येशूमागे शिष्यांसोबत जात असे आणि मदत करणाऱ्या महिलांपैकी 'ती' मरिया माग्दलेन एक होती (लूक ८:१-२), त्यास दुजोरा म्हणून चारही शुभ-



वर्तमानकार साक्ष देतात की, तिने येशूचे क्रुसावर चढवणे, त्याचा मृत्यू व कबरीत ठेवणे पाहिले होते. योहान १९:२५ पुढे नमूद करते की, पवित्र मरियासह वधस्तंभाजवळ त्याची मावशी, क्लोपाची पत्नी मरिया ह्यांसह मरिया माग्दलेन हीदेखील उभी होती. येशूने तिच्यातून सात भुते काढून टाकली होती (लूक ८:२). कदाचित शुभवर्तमानकार शब्दप्रयोगातून असे सूचित करत असेल की त्याने तिला शारीरिक विकारातून बरे केले असावे. येशू तिला 'मरियम' ह्या नावाने हाक मारायचा. मरियम म्हणजेच 'मेरी माग्दलेन.'

> **शुभवर्तमानकारांनी तिचे वर्णन 'येशूची शिष्या' असे केले आहे.**

येशूला कुठे कबरीत ठेवले आहे, हे माग्दलेन मरिया व योसेफची आई मरिया ह्यांनी लक्ष देऊन पाहिले होते (मार्क १५:४७). आठवड्याच्या पहिल्या दिवशी भल्या पहाटेस सूर्योदयासमयी येशूच्या शरीराला अभिषेक करण्यासाठी सुगंधी द्रव्य घेऊन कबरीकडे माग्दलेन मरिया, याकोबची आई मरिया व सलोमी गेली. कबरीत डोकावून व कबर रिकामी पाहून त्या स्त्रिया भयभीत झाल्या व कबरीपासून पळाल्या. परंतु त्याने पुनरुत्थान झाल्यावर पहिल्या प्रथम माग्दलेन मरिया हिला दर्शन दिले (मार्क १६:९). लागलीच ती शिष्यांकडे धावली, विशेषत: पेत्राकडे गेल्यानंतर ख्रिस्ताने तिला कशा प्रकारे दर्शन दिले आणि तिला प्रेषितांना काय सांगण्यास सांगितले त्याचे कथन केले. कबरीजवळच माळीकाम करणाऱ्या वेशात असलेल्या व्यक्तीने तिला विचारले, ''कोणाचा शोध करतेस?'' तिने म्हटले, ''दादा, त्याला कोठे नेले आहे ते मला सांगा, म्हणजे मी त्याला घेऊन जाईन.'' एवढ्यात येशूने हाक मारली, ''मरिये!'' लागलीच तिने वळून पाहिले व म्हणाली, ''रब्बुनी (गुरुजी)''. येशूने तिला म्हटले, ''मला स्पर्श करू नकोस. जाऊन त्यांना सांग.'' त्याचा वृत्तांत आपणांस योहान २०:१७-१८मध्ये सापडतो.

तसे पाहिले तर येशूची आई मरिया मातेनंतर मेरी माग्दलेनचे नाव आणि स्थान बायबलमध्ये महत्त्वाचे आहे. शुभ-वर्तमानकारांनी तिचे वर्णन 'येशूची शिष्या' असे केले आहे. येशूचे सुवार्ता कार्य, दु:खसहन, क्रुसावरील मरण व पुनरुत्थान ह्याची तीच प्रथम साक्षीदार आहे. त्यामुळे तिचे स्थान बायबलमध्ये व ख्रिस्त-सभेमध्ये महत्त्वाचे मानले जाते.

अनेक महान पाश्चात्त्य चित्रकारांनी मेरी माग्दलेनची विविध रूपात व छटांमध्ये चित्रणे चितारली आहेत. जसे 'पश्चात्ताप

करणारी' व 'येशूची शिष्या', 'क्रुसावरील दु:खसहन' अशी  चित्रे ही बर्नाडीन लुईनी, कॅरवॅजिओ, एल ग्रेको, टिशियानया सर्व पाश्चात्त्य कलाकारांनी आपल्या कुंचल्यांनी चित्रे साकारली आहेत. पण अपवादात्मक बऱ्याच चित्रांत माग्दलेनचे केस सुटे लांब, तांबूस रंगाचे दाखविण्यात आले आहेत. तसे पाहता येरुशलेम व पॅलेस्टाईन, ज्यू स्त्रिया डोक्यावरून वेल किंवा मोठा स्कार्प सदृश्य कपड्याद्वारे आपले डोके व केस झाकतात. मग लांब सडक व सुटे केस सोडणारी 'तीच' हे कसे सत्य मानावे? कदाचित चित्रकारांनी चित्र बनविण्यासाठी बायबलमधील पुढील संदर्भ घेतला असावा. ''तेव्हा मरियेने सुमारे अर्धा शेर शुद्ध जटामांसीचे बहुमोल सुगंधी तेल घेऊन येशूच्या चरणांस लावले आणि आपल्या केसांनी त्याचे चरण पुसले'' (योहान १२:३).

पाश्चात्त्य देशात विविध चर्चेसमध्ये संत मेरी माग्दलेनचे अनेक कथित अवशेष, ज्यात तिची डोक्याची कवटी, कपाळाच्या मांसाचा तुकडा आणि तिचा डावा हात जतन केलेला आहे. काही अवशेष फ्रान्स आणि माऊंट एथोसमधील कॅथलिक चर्चेसमध्ये जतन केले आहेत, ज्यात पर्यटकांसाठी प्रदर्शने आणि तिच्या सन्मानार्थ वार्षिक मिरवणुका काढल्या जातात. तिच्या डाव्या हाताचे अवशेष एथोस पर्वतावरील मायमनोपेट्रा मठात ठेवले आहे. तिच्या पायाचा काही अवशेष रोममधील सॅन जियोव्हानी देई फिओरेंटिनीच्या चर्च / संग्रहालयामध्ये ठेवण्यात आला आहे. ख्रिस्ताच्या पुनरुत्थानानंतर त्या पवित्र कबरीत प्रवेश करणारा हा 'मेरी माग्दलेन'चा पहिला पाय मानला जातो.

रोमन कॅथलिक चर्चसह ईस्टर्न ऑर्थोडॉक्स चर्च, ओरिएंटल ऑर्थोडॉक्स चर्च, अँग्लिकन, लूथरनिझम अशा विविध पंथात तिला विशेष महत्त्व दिले गेले आहे. सन २०१६ साली दिवंगत पोप फ्रान्सिस ह्यांनी संत मेरी माग्दलेनची तुलना 'शिष्यांची शिष्या' अशी करून 'ख्रिस्ताची खरी सुवार्तिक' म्हणून तिच्या स्मरणार्थ २२जुलै हा दिवस 'सणाचा दिवस' म्हणून पाळला जाईल असे घोषित केले. भारतामध्ये पुन्नामल्ली, चेन्नई येथे १८१९ साली सेंट मेरी माग्दलेनच्या गौरवार्थ चर्च समर्पित केले आहे. तसेच आपल्या वसईतील मुळगाव येथे सन १९४५ साली उभारलेले चर्च सेंट मेरी माग्दलेनच्या गौरवार्थ समर्पित करण्यात आलेले आहे.

मोबाईल : 90 49 91 93 14

•

## मच्याडो टूर्स आणि कॅटरर्स, नाळा

**मे महिन्यातील महाबळेश्वर, प्रतापगड, पांचगणी सहल:** पहिल्या २ सहली-दिनांक ६ ते १० मे व २० ते २४मे २०२६. प्रवास खर्च रु.१०,५००/-व मुलांस रु.९,०००/- दिनांक २७ मे ते ३१ मे व ३ ते ७ जून २०२६. खर्च रु. ११,०००/- व लहान मुलांस रु. ९,५००/-. जेवण : व्हेज-नॉन व्हेज. चहा, नाश्ता, चार जणांस एक रूम. प्रवास ए.सी.बस व गेट टुगेदर पार्टी.

**आयोजक : लॉडसन मच्याडो**
9923640082, 9892012890
**लिप्सन मच्याडो**
8108340640, 9011986305
**ग्रेव्ही मच्याडो, आगाशी**
8087187597, 9730863207
**ऑस्टीन कोरिया :** 9527888469
**मायकल रॉड्रिग्ज :** 9527832169

**आगामी सहल : मद्रास वेलंकनी ऑगस्ट-सप्टेंबर २०२६.**

## परिचय टूर्स ॲण्ड कॅटरर्स

**१) सापुतारा सहल :**
दिनांक २६ ते २८ एप्रिल २०२६.
ही सहल फूल झाली आहे, धन्यवाद!
**२) आसाम, मेघालय सहल :**
दिनांक २ मे ते १२ मे २०२६.
ही सहल फूल झाली आहे, धन्यवाद!
**३) बँगलोर, म्हैसूर, उटी सहल :**
दिनांक १९ मे ते २७ मे २०२६.
एकूण खर्च प्रत्येकी रु. ३३,५००/-.
**४) मालवण गोवा सहल :**
दिनांक २९ मे ते ३ जून २०२६.
एकूण खर्च प्रत्येकी रु. १६,०००/-
संपूर्ण सहलीमध्ये व्हेज, नॉनव्हेज अनलिमिटेड बुफे परिचय कॅटरर्सचे रूचकर जेवण, नाष्टा व एक गेट टुगेदर पार्टी.

**: संपर्क :**
**कैतान तुस्कानो** : 9423947534
**सोपान खरात** : 9503598153
**फ्रान्सिस डाबरे** : 7709239578
**मायकल डाबरे** : 9923483481

## परिवार टूर्स आयोजित

**१) महाबळेश्वर, प्रतापगड, पांचगणी सहल** : प्रवास ए.सी.बसने.
दिनांक ७ मे (संध्याकाळचा प्रवास) ते १० मे २०२६. खर्च रु. १२,५००/-.
**२) कोकण गोवा सहल** : संपूर्ण प्रवास ए.सी.बसने. दिनांक १२ ते १७ मे २०२६. तीन रात्र गोव्यात. क्रूझ सफर, एक तासाची समुद्रसफर विथ डॉल्फिन दर्शन, मसाला गार्डनमध्ये गोवानीस जेवणाचा आस्वाद, कोकण तारकर्ली बीच, सिंधुदुर्ग किल्ला. खर्च रु. १६,५००/-.
**३) दुधनी माऊलीच्या सणानिमित्त दुधनी खानवेल सहल** : दि. ३० ते ३१ मे २०२६. ए.सी. पॅकेज विथ स्विमिंग पूल. खर्च रु. ४,५००/-.

**संपर्क :- १) रॉबर्ट डिसोजा, वाघोली**
9834409039
**२) डॅनी रॉड्रिग्ज, न्यू राणेभाट**
9503795588

# ईस्टरची चिन्हे


-ब्रदर लिरॉन डिकुन्हा
गोरेगाव

जसजसा शुभशुक्रवारचा अंधार ओसरत जातो, तसतशी ईस्टरची चिन्हे आपल्याला दिसू लागतात. ही प्रत्येक चिन्हे आपल्या सोबत एक खोल अर्थ घेऊन येतात आणि प्रभू येशूच्या पुनरुत्थानाचे रहस्य आपल्या समोर उलगडतात. ख्रिस्ती उपासनेमध्येही चिन्हे केवळ सजावट किंवा परंपरेचा भाग नसून, ती आपल्या श्रद्धेचे प्रकटीकरण आहेत की प्रभू येशूने पापांवर आणि मृत्यूवर विजय मिळवून अंधाराचा नाश केला आहे.

पुनरुत्थानाच्या जागरण विधीद्वारे देऊळमाता आपल्याला काही महत्त्वाची चिन्हे दर्शविते.

**अग्नी :** अग्नीचा उल्लेख आपल्याला जुन्या करारापासून दिसतो. निर्गमच्या पुस्तकात परमेश्वर मोशेशी जळत्या झुडपातून बोलतो, तसेच तो अग्नीच्या स्तंभाच्या रूपात इस्त्राएली लोकांसोबत मार्गदर्शन करत चालत असे. नव्या करारातही पवित्र आत्मा अग्नीच्या ज्वालांच्या रूपात अवतरताना दिसतो. ख्रिस्तसभेच्या प्रारंभी पुनरुत्थान जागरण साजरे करताना लोक अग्नीने प्रकाश करीत असत. कालांतराने, चौथ्या शतकापासून पुनरुत्थान जागरणाच्या विधीत अग्नीला आशीर्वाद देण्याची प्रथा ख्रिस्तसभेत रूढ झाली. हा अग्नी नव्या निर्मितीचे प्रतीक आहे आणि दैवी प्रकाशाचे चिन्ह आहे. ह्या प्रकाशाद्वारे पाप व मृत्यूचा अंधार नाहीसा झाल्याचे दर्शविले जाते.

**पास्काची मेणबत्ती :** ख्रिस्तसभेच्या आरंभीपासून उपासनेत मेणबत्त्यांचा वापर केला जात होता. परंतु चौथ्या शतकापासून पुनरुत्थान जागरणाच्या वेळी एक मोठी 'पास्काची मेणबत्ती' पेटवली जाऊ लागली. ह्या पास्काच्या मेणबत्तीपासून इतर मेणबत्त्या पेटवल्या जातात. ह्याचा अर्थ असा की ख्रिस्त हा जगाचा खरा प्रकाश आहे आणि त्याच्याद्वारे आपल्याला तारण प्राप्त होते.



संपूर्ण पुनरुत्थानकाळात ही पास्काची मेणबत्ती तेवत ठेवली जाते. ती आपल्याला आठवण करून देते की प्रभू येशूच्या पुनरुत्थानाद्वारे आपल्याला नवे जीवन आणि नवी निर्मिती प्राप्त झाली आहे. ह्या मेणबत्तीवर लावलेल्या पाच धूपाचे खडे ख्रिस्ताच्या वध स्तंभावरील पाच जखमांचे प्रतीक आहेत. तसेच मेणबत्तीवर लिहिलेली अल्फा आणि ओमेगा ही चिन्हे ख्रिस्तच सुरुवात व शेवट आहे हे दर्शवितात. ही पास्काची मेणबत्ती बाप्तिस्म्याच्या वेळीही वापरली जाते, जी नव्या जीवनाचे प्रतीक आहे.

**पुनरुत्थानाच्या जागरण विधीद्वारे देऊळमाता आपल्याला काही महत्त्वाची चिन्हे दर्शविते.**

**पवित्र पाणी :** पुनरुत्थान जागरण विधीत पाण्यालाही विशेष महत्त्व आहे. जुन्या करारात पाण्याचे पवित्र आणि तारणदायी महत्त्व अनेक ठिकाणी दिसून येते. उत्पत्तीच्या पुस्तकात परमेश्वराचा आत्मा पाण्यावर तरंगताना दिसतो. नोहाच्या प्रलयाच्या कथेत पाण्याद्वारे पापाचा नाश झाला असे दर्शविले जाते. तसेच निर्गमच्या पुस्तकात देवाने इस्त्राएली लोकांची सुटका लाल समुद्रातून पाण्याद्वारे केली. ह्या घटनांमधून प्रेरणा घेऊन प्रारंभीच्या ख्रिस्ती लोकांनी पुनरुत्थान जागरणात पाण्याचा समावेश बाप्तिस्म्याच्या संस्कारासाठी केला. ख्रिस्तसभेत पाणी हे पापांच्या शुद्धीकरणाचे आणि प्रभू येशूच्या मृत्यू व पुनरुत्थानात सहभागी होण्याचे चिन्ह आहे. पुनरुत्थान जागरणाच्या विधीत बाप्तिम्याचे पाणी आशीर्वादित केले जाते आणि ते बाप्तिस्म्यासाठी तसेच बाप्तिस्म्याच्या वचनांच्या नूतनी-करणासाठी वापरले जाते. ह्यामधून हे व्यक्त होते की आपणही ख्रिस्ताच्या मृत्यूत सहभागी होऊन त्याच्या पुनरुत्थानासारखे नवे जीवन जगण्यास बोलावलेले आहोत.

तसेच जगभरात ईस्टरशी संबंधित काही इतर चिन्हेही प्रचलित आहेत. ही काही देशांच्या संस्कृती व परंपरांमधून आलेली असली तरी त्यांना ख्रिस्ती अर्थही प्राप्त झाला आहे.

**ईस्टर एग :** प्राचीन काळापासून अंडे हे नव्या जीवनाचे प्रतीक मानले जाते. विशेषत: ईस्टर्न ऑर्थोडॉक्स परंपरेत अंडे हे बंद असलेल्या थडग्याचे प्रतीक मानले जाते आणि त्यातून प्रभू येशूचे पुनरुत्थान झाले असे दर्शविले जाते. अंड्याचे बाहेरील कठीण कवच हे क्रुसावर खिळल्यानंतर येशूला ठेवलेल्या बंद थडग्याचे प्रतीक आहे. अंडे फोडणे म्हणजे येशूने मृत्यूवर विजय मिळवून थडग्यातून बाहेर येण्याचे प्रतीक आहे. त्याचप्रमाणे उपवासाच्या काळात ख्रिस्ती भाविक अंडी व मांस खाणे टाळत असत. त्यामुळे ईस्टरच्या रविवारी पुन्हा अंडी खाण्याची परंपरा निर्माण झाली. म्हणून आशीर्वादित ईस्टर एग हे आत्मिक पुनरुत्थानाचे तसेच उपवासकाळ समाप्त झाल्याचे प्रतीक मानले जाते.

ईस्टरची ही चिन्हे आपल्याला संदेश देतात, प्रकाशाने अंधारावर व जीवनाने मृत्यूवर विजय मिळवला आहे. म्हणूनच, ह्या चिन्हांकडे पाहताना आपण नव्या आशेने व जीवनाने भरून प्रभूच्या पुनरुत्थानचे साक्षीदार बनू या.

मोबाईल : 77 98 73 27 00


ALDEL INSTITUTE OF MANAGEMENT
Approved by AICTE
St. John Technical and Educational Campus, Vevoor, Manor Road., Palghar (E) 401 404
ALDEL
PGDM
MBA
(AUTONOMOUS)
A+
NAAC
FINANCE
PHARMA MANAGEMENT
HR
BUSINESS ANALYTICS
OPERATIONS
MARKETING
EXAMS ACCEPTED
CAT / XAT / CMAT / ATMA
MAT / GMAT / MH-CET
8484055109
8484055209
aldelinstituteofmanagement
aldel.aim
https://aimsj.edu.in/
admission@aimedu.org.in
SCAN QR CODE TO APPLY
Placement Associates
NOMURA
J.P.Morgan
AXIS BANK
TATA STEEL
gsk
accenture
CRISIL
Alembic
IBM
MACLEODS
tcs TATA CONSULTANCY SERVICES
zomato
HDFC BANK
We understand your world
ICICI Bank
ALKEM
zydus
Dedicated To Life
mahindra LIFESPACES

# येशू ख्रिस्त आणि पुनरुत्थानाचा संदेश

-ॲड. बॅरी डाबरे
भुईगाव



येशू ख्रिस्ताचे जीवन प्रेम, सेवा आणि करुणेने भरलेले होते. त्यांनी गरिबांना आधार दिला, आजारी लोकांना बरे केले आणि लोकांना देवाच्या प्रेमाचा संदेश दिला. तरीही त्यांना अपमान, छळ आणि शेवटी क्रुसावर खिळले जाण्याची शिक्षा झाली. त्या क्षणी सर्व काही संपल्यासारखे वाटत होते. शिष्य घाबरले होते, लोक निराश झाले होते. परंतु तिसऱ्या दिवशी येशूचे पुनरुत्थान झाले. हा प्रसंग केवळ धार्मिक घटना नाही; तर संपूर्ण मानवजातीसाठी आशेचा संदेश आहे.

अंधार कायमचा नसतो, दुःख कायमचे नसते. देवाची योजना अनेकदा आपल्या समजण्यापलीकडे असते. अमेरिकेतील जगप्रसिद्ध टेनिस खेळाडू ऑर्थर ॲशे ह्यांची गोष्ट खूप प्रेरणादायी आहे. त्यांनी Wimbledon, US Open आणि Australian Open सारख्या मोठ्या स्पर्धा जिंकल्या. लाखो लोक त्यांना आदर्श मानत होते. पण आयुष्यात एक मोठा धक्का त्यांना बसला. हृदयाच्या शस्त्रक्रियेदरम्यान त्यांना चुकून संक्रमित रक्त देण्यात आले आणि त्यातून त्यांना HIV / AIDS झाला.

> **संपूर्ण मानवजातीसाठी आशेचा संदेश देणारी घटना म्हणजे येशूचे पुनरुत्थान!**

जेव्हा ही बातमी जगासमोर आली तेव्हा अनेक चाहत्यांनी त्यांना पत्र लिहिले. त्यातील एका चाहत्याने प्रश्न विचारला, ‘‘देवाने एवढा भयंकर आजार तुमच्याच बाबतीत का होऊ दिला? ऑर्थर ॲशे ह्यांनी त्या प्रश्नाला दिलेले उत्तर आजही जगभर प्रसिद्ध आहे. त्यांनी लिहिले, ‘‘जगात कोट्यवधी मुले टेनिस खेळायला सुरुवात करतात. त्यातील काही हजार जण व्यावसायिक खेळाडू बनतात. काही शेकडो मोठ्या स्पर्धांपर्यंत पोहोचतात. काही मोजकेच विम्बलेडन पर्यंत पोहोचतात आणि त्यातला फक्त एकच विजेता बनतो. जेव्हा मी विम्बलेडनचा कप हातात घेतला, तेव्हा मी देवाला कधीच विचारले नाही, ‘‘फक्त मीच का?’’

मग आज ह्या आजाराच्या वेळी मी देवाला कसा विचारू शकतो, ‘‘फक्त मीच का?’’

त्यांच्या ह्या उत्तरातून एक मोठा जीवनधडा मिळतो, आनंदाच्या क्षणी आपण देवाला प्रश्न विचारत नाही, मग दुःखाच्या वेळीच का विचारतो? आपल्या प्रत्येकाच्या जीवनात काही ना काही संघर्ष असतात. कधी आर्थिक अडचणी, कधी आरोग्याच्या समस्या, कधी कुटुंबातील मतभेद, कधी अपयश किंवा अन्याय... अशा वेळी मनात निराशा येते; पण ईस्टरचा संदेश सांगतो की, देव आपल्याला कधीही सोडत नाही.

कधीकधी संकटे आपल्याला अधिक मजबूत बनवण्यासाठी येतात. ती आपल्याला नम्र बनवतात, इतरांच्या वेदना समजायला शिकवतात आणि देवावर अधिक विश्वास ठेवायला शिकवतात.

आजच्या आधुनिक जीवनात अनेक कुटुंबांमध्ये तणाव, गैरसमज आणि तुटलेली नाती दिसतात. अशा वेळी ईस्टरचा संदेश आपल्याला आठवण करून देतो की, संकटाच्या वेळी कुटुंब एकत्र राहिले पाहिजे. एकमेकांना दोष देण्याऐवजी आधार दिला पाहिजे. आशा आणि विश्वास सोडू नये. कारण अनेक वेळा अडचणी कुटुंबाला अधिक मजबूत बनवतात.

ईस्टर आपल्याला सांगतो की, क्रुसानंतर पुनरुत्थान आहे. दुःखानंतर आनंद आहे. अंधारानंतर प्रकाश आहे. म्हणून जेव्हा आयुष्यात कठीण प्रसंग येतील तेव्हा ‘‘फक्त मीच का?’’ असा प्रश्न विचारण्याऐवजी आपण देवावर विश्वास ठेवू या. कारण कदाचित त्या संघर्षामागेच देवाने आपल्या जीवनासाठी नव्या आशेचा मार्ग तयार केला असेल.

मोबाईल : 92 70 63 15 99

## लिहिते व्हा!

* जास्तीत जास्त लोकांनी व्यक्त व्हावे, लिहिते व्हावे, अशी आम्ही सदिच्छा बाळगतो.
* दर्जेदार व प्रसिद्धीयोग्य लिखाणाचे ‘सुवार्ता’ नेहमीच स्वागत करते.
* छापण्याच्या उद्देशाने ‘सुवार्ता’ला आपले लेख, कविता, वृत्त पाठविताना ते नेहमी पूर्ण नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आदी तपशीलासहित व लिखित स्वरूपातच पाठवावे.
* आपला लेख शक्यतो ५०० ते ५५० इतक्या शब्द मर्यादेचे पालन करणारा असावा.
* कृपया इतरत्र प्रकाशित झालेले साहित्य पाठवू नये.
* व्हॉट्‌ॲप किंवा तत्सम माध्यमांतून प्राप्त झालेल्या मजकुरांचा छपाईसाठी विचार केला जाणार नाही.
* प्रकाशित न करता आलेल्या साहित्याविषयी कारणे वा स्पष्टीकरण देणे शक्य होणार नाही. तसेच अप्रकाशित साहित्य आपल्याला परत पाठविणे आम्हांला शक्य होणार नाही.

**- संपादक मंडळ**

अभिवादन


# डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व अल्पसंख्याकांचे अधिकार

**-फादर किरण लोपीस**
थॉमस बॅप्टिस्टा हायस्कूल आणि ज्युनि.कॉलेज, पापडी

बायबलमधील एक सुंदर वचन आहे : ''देव पक्षपाती नाही, हे माझ्या पक्के ध्यानात आहे; तर प्रत्येक राष्ट्रांत जो त्याची भीती बाळगतो व ज्याची कृत्ये नैतिक आहेत तो त्याला मान्य आहे'' (प्रे. कृ.१०:३५).

१४ एप्रिल हा सर्व भारतीयांसाठी अति महत्त्वाचा व स्मरणातील दिवस आहे. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक तत्त्वज्ञानाच्या विचारांचा जन्मदिवस. हो, मित्रांनो ह्याच दिवशी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा जन्म झाला. अत्यंत पवित्र, परिवर्तनकारी, प्रेरणादायी आणि स्फूर्तिदायक असा दिवस. बाबासाहेबांनी संपूर्ण जीवन भारताचा विवेक राखण्यांत, मानवतेचे प्रतीक बनण्यांसाठी घालविले. ते शेवटपर्यंत लढले आणि शेवटपर्यंत त्यांनी आपल्या बांधवांसाठी संघर्ष केला. आपल्या विचारांनी, आपल्या लेखणीने संघर्षापासून संविधानापर्यंतचा त्यांचा मुक्तीलढा, व्यक्तिस्वातंत्र्य व धर्मस्वातंत्र्यासाठी त्यांचा आग्रह हा शब्दांत मोजता येणार नाही. अस्पृश्यता, भेदभाव, सामाजिक अन्याय, जाती विषमता ह्याविरुद्धचा त्यांचा अखंड लढा, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र आपल्या समाजाला देऊन सर्व लेकरे भगवंताची सुंदर रूपे आहेत, ही त्यांची भावना. आपल्या संघर्षमय जीवनातून शोषित, वंचित व दुर्बल घटकांबरोबरच अल्पसंख्याक समुदायासाठी बाबासाहेबांनी आदराने, समानतेने आणि करुणेने पाहिले.

संविधानातील अनेक तत्त्वांद्वारे त्यामधील तरतुदीमुळे अल्पसंख्याकांना सामाजिक, राजकीय व आर्थिक स्थैर्य लाभले. बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानात त्यांची प्रगल्भ बुद्धिमत्ता आणि मेहनत दिसून येते. भारताचे हे संविधान बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक, सामर्थ्यशाली आणि दुर्बल समाज, बहुधर्मी आणि बहुभाषिक समाजातील सर्व घटकांचा नीतीचा आरसा झाला. भारताच्या



अखंडतेत, अस्मितेमध्ये आणि एकात्मतेसाठी सर्वसमावेशक योगदान हा त्यांच्या तत्त्वज्ञानी विचारांचा प्रभाव भारताच्या संविधानात प्रकर्षाने दिसून येतो. बलसंपन्न भारताचे स्वप्न जगासमोर ठेवले. अल्पसंख्याकांना भारताच्या अस्मितेत आणि विकासात क्रियाशील स्थान दिल्यामुळे त्यांचा सहभाग प्रभावी ठरला आणि अखंड भारताच्या विकासामध्ये त्यांची भूमिका उत्तम प्रकारे बजावत आहेत. त्यांचे रक्षण, संरक्षण आणि अधिकार हक्क मिळावेत म्हणून विशेष प्रयत्न केले गेले.

संविधानमध्ये समानतेचा अधिकार सर्वांना मिळावा ह्यासाठी कलम १४-१८मध्ये विशेष बाबींची तरतूद केलेली आहे. समानतेच्या अधिकारामध्ये कायद्यापुढे सर्वच समान. धर्म, जात, भाषा, लिंग

> **बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानात त्यांची प्रगल्भ बुद्धिमत्ता आणि परिश्रम दिसून येतात.**

ह्यांच्याद्वारे कोणताही भेदभाव नसावा. सर्व धर्मांतील, जातींतील, भाषांतील आणि लिंगांतील लोकांना आपले जीवन सुरक्षित, निर्भयपणे जगण्याचा हक्क आहे. कलम २५-२८ मध्ये प्रभावीपणे दिसून आलेला धर्मस्वातंत्र्याचा अधिकार ज्यामध्ये प्रत्येक नागरिकास आपापल्या मर्जीनुसार, इच्छेनुसार आपल्या धर्माचे पालन, प्रचार व प्रसार करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे आपण भयभीत न बनता निर्भय बनावे हे वरील कलम आपणांस सांगत आहेत. कलम २९-३०मध्ये अल्पसंख्याक समाजाला स्वत:ची भाषा, संस्कृती जोपासणे त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्था स्थापन करणे व चालवणे  हा अधिकार आहे. जेणेकरून सर्व समाजाचा समान विकास व्हावा हा ह्यामागचा उदात्त हेतू आहे. कलम १४ सामाजिक समता कलम २५-२८ धर्मनिरपेक्षता, कलम २१अ शिक्षणाचा अर्थ, संकल्पना व महत्त्व विशद करत आहे, तर संविधानातील मूलभूत घटक हे दुर्बलांचे रक्षण झाले पाहिजे ह्याविषयी सांगत आहे.

संविधानाने दिलेली मार्गदर्शक तत्त्वे त्यामधील तरतुदी आपल्या सर्वांच्या समान हक्क, विकासासाठी आहेत. त्यामुळे अल्पसंख्याक समाजातील लोकांचेसुद्धा देशहितासाठी, सामाजिक विकासासाठी प्रभावी योगदान असणे आवश्यक आहे. स्वतंत्र भारताचे आपण सर्वजण नागरिक असून संविधानाचा आदर राखणे, सामाजिक सलोखा, हित व विकास साधणे, धर्म-भाषा-संस्कृती व अस्मितेचा आदर सर्व स्तरापासून सर्व स्तरापर्यंत करणे महत्त्वाचे आहे.

समानतेच्या अधिकारामध्ये मला काय मिळेल ह्यापेक्षा मी भारतासाठी काय करू शकणार, माझी विद्वत्ता माझ्या देशाच्या अखंड आणि समृद्ध भारताला कशा पद्धतीने बलसंपन्न करणार, ह्यावर एक विचार होणे आवश्यक आहे. त्यामध्ये भारतातील प्रत्येक नागरिकांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हे संविधान अर्थपूर्णरीत्या समजून घेणे समतेचा संकल्प सर्वोच्च व प्रथम असणे व त्यातून साकारणारा १४ एप्रिलचा दिवस आपल्या सगळ्यांसाठी विशेष करून अल्पसंख्याकांसाठी आदर्शवत ठरणार आहे.

मोबाईल : 91 58 45 43 34

# तुटू लागल्या लग्नाच्या गाठी...!

-जॉन कोलासो
उंबरभाट, गिरीज

पूर्वी युरोप-अमेरिकेत लग्नाच्या गाठी झटपट सुटत वा तुटत असत. नंतर आपल्याकडील चित्रपटसृष्टीतील नटनट्यांच्या, श्रीमंत वर्गातील लग्नाच्या गाठींचे बंद तुटल्याच्या बातम्या वाचायला मिळायच्या. आता तर आपल्या आजूबाजूला नव्हे; तर घरापर्यंत हे लोण पोहचले आहेत... चर्चमध्ये वेदीसमोर, अनेक भाविकांच्या साक्षीने एकमेकांशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेऊन लग्नसंस्कार स्वीकारणारे, उंबराचे पाणी अंगावरून सरत नाही, तोच घटस्फोटाची तयारी करीत असल्याची कुजबुज कानी पडू लागते.

देवाने जे नाते जोडले आहे, ते माणसाने तोडू नये, असे सांगितले जाते; पण पाश्चात्त्याचे अनुकरण करणाऱ्या नव्या पिढीचे प्रतिनिधी ही देववाणी ऐकण्याच्या मन:स्थितीत नाही, असे दिसून येते. त्यामुळे ह्या तुटलेल्या गाठी सावरण्याचे काम धर्मपातळीवर तसेच विविध स्तरांवरील न्यायालयांना, फॅमिली कोर्टापासून सुप्रिम कोर्टापर्यंत करावे लागत आहे. धर्मगुरूंचा तसेच न्यायालयांचा फार मोठा वेळ ह्याकामी खर्च होत आहे. न्यायाधीश व वकील मंडळींना घटस्फोटाची वाढती प्रकरणे निकाली कशी काढायची ह्याची फार मोठी चिंता लागली आहे. म्हणून केरळ हायकोर्टाने एका घटस्फोट प्रकरणी निकाल देताना, ''आजची लग्ने म्हणजे संस्कार नसून 'युज अँड थ्रो' ह्या नव्या चंगळवादी संस्कृतीचा भाग बनला आहे'', असे उद्‌गार काढले आहेत.

**घटस्फोटांचे प्रमाण का वाढले?**

पूर्वी महिला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी नव्हती. त्यामुळे तिला सर्वस्वी पतीवर, कुटुंबावर अवलंबून राहावे लागे. पतीचा स्वैराचार, मद्याचे व्यसन, पतीकडून, सासूकडून होणारा छळ सहन



करीत व कुटुंबाची अब्रू सांभाळण्यासाठी तोंडातून ब्र ही न काढता ती मुकाट्याने नवऱ्याबरोबर नांदत असे. आता शिक्षणामुळे आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झालेली महिला पतीचे दुर्वर्तन सहन करू इच्छित नाही. कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार ती खपवून घेण्यास तयार नाही. स्वत:च्या असुरक्षिततेपुढे तिला कौटुंबिक अब्रूची पर्वा नाही. मानसिक कोंडमारा व शारीरिक अत्याचार सहन करीत जीवन कंठण्यापेक्षा घटस्फोट

**वाढत्या घटस्फोटामागची कारणे काय असावीत बरे?**

घेऊन स्वतंत्र जीवन जगणे तिला श्रेयस्कर वाटते. तथापि काही प्रकरणांत तर पत्नीही एकतर्फी चुकीची वाट चालताना दिसते वा पतीला ब्लॅकमेलिंग करताना दिसून येते, असा ह्या प्रकरणी मध्यस्थी करणाऱ्यांचा दावा असतो.

पती-पत्नी दोघेही भिन्न कौटुंबिक संस्कृतीत वाढलेले असल्याने लग्नानंतर सुरुवातीच्या काळात उभयतांत मतभेद होणे साहजिकच आहे. असे मतभेद मिटविण्यासाठी दोन्ही कुटुंबांनी दक्ष राहून सुरुवातीपासूनच प्रयत्न करणे आवश्यक आहे. पतीपत्नीने लग्नाच्या अगदी पहिल्या वर्धापनदिनापासून व पुढे प्रत्येक वर्धापन दिनी आपल्या लग्नाची सीडी पाहण्याचा कार्यक्रम अवश्य ठेवावा, म्हणजे वेदीवर आपण एकमेकांना कोणती वचने दिलेली आहेत, ह्याचे स्मरण होत राहील, असे ह्यानिमित्ताने सुचविणे अगत्याचे वाटते.

**घटस्फोटाची कार्यपद्धती**

समुपदेशाने पती-पत्नीची दिल जमाई होतच नसेल, तर अशावेळी नाईलाज म्हणून घटस्फोटाचा मार्ग स्वीकारणे ठीक आहे. घटस्फोटासाठी प्रथम धर्मपातळीवर तसेच फॅमिली कोर्टात किंवा (फॅमिली कोर्ट नसल्यास) सिव्हिल कोर्टात अर्ज करावा लागतो. ह्या अर्जाचा तातडीने विचार न करता हे न्यायालय उभयतांना सहा महिन्यांची मुदत देते आणि ह्या काळात उभयतांनी आपापसात सामोपचार घडवून आणण्याचा सल्ला देते. अशा प्रकारे लग्न मोडू नये, ह्या दृष्टीने न्यायालयही प्रयत्नशील असते. मात्र, ह्या मुदतीत उभयतांत तडजोड झाली नाही; तर मग सहा महिन्यांनी रीतसर खटला चालविण्यासाठी न्यायालय तारखा देते. बऱ्याच वेळेला ह्या तारखांना न्यायालयात सुनावणी होतच नाही किंवा पती वा पत्नींकडून अवाजवी मागणी केली जाते. उभयतांची बाजू मांडणारे वकील वेगवेगळी निमित्त पुढे करून न्यायालयाकडे पुढील तारखा मागत राहतात व अशा प्रकारे खटले वर्षानुवर्षे लांबणीवर पडले जातात. त्यात खालच्या न्यायालयाने दिलेल्या निकालाला वरच्या न्यायालयात आव्हान देणे, असे होणारे प्रकार वेगळेच. परिणामी पती-पत्नींना कोर्टात खेटे घालण्याशिवाय गत्यंतर नसते.

**घटस्फोट लवकर मंजूर करावा**

हे लक्षात घेऊन एका घटस्फोटाच्या खटल्यात सुप्रिम कोर्टाच्या पाच

न्यायमूर्तींच्या खंडपीठाने जोडप्याबद्दल सहानुभूती व्यक्त करीत म्हटले की, जर लग्नानंतर दोघे जण एकत्र आनंदात नांदू शकत नसतील; तर त्यांचे खटले वर्षानुवर्षे लांबणीवर न टाकता दोघांच्या सहमतीने न्यायालयाने लवकरात लवकर घटस्फोट मंजूर करावा आणि त्यांना वेगळे राहण्याची मुभा द्यावी. इतकेच नव्हे; तर घटस्फोट मंजूर करण्यासाठी कायद्यात नमूद केलेल्या कारणां-व्यतिरिक्त कारणे असतील तर ती कारणे घटस्फोट मंजुरीसाठी मान्य करता यावीत, ह्यासाठी राज्यघटनेच्या कलम १४२चा कसा आधार घेता येईल, ह्याचा विचार करण्यात येईल, असे आश्वासनही खंडपीठाने दिले आहे.

सुप्रिम कोर्टाच्या ह्या खंडपीठाने सदर खटल्यात मदतीसाठी ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग ह्यांची नेमणूक केली होती. त्यांनीही ह्या खंडपीठाला असा सल्ला दिला की, लोकांना लग्न करण्याचा हक्क असावा तसेच त्यांना विभक्त होण्याचाही हक्क असावा. जर जोडप्यात तडजोड होणे शक्यच नसेल, लग्न टिकून राहणे अशक्य असेल तर अशा वेळी सुप्रिम कोर्टाने हस्तक्षेप करून उभयतांना घटस्फोट मंजूर करावा. तथापि, घटस्फोट खटल्याचा निकाल देण्यापूर्वी पती-पत्नीमध्ये तडजोड घडवून आणण्यासाठी प्रयत्न करावेत, असाही सल्ला ॲड. जयसिंग ह्यांनी दिला आहे.

### सार्वजनिक धोरण

जर पती-पत्नींमध्ये वाद निर्माण झाला आणि त्यांचे लग्न टिकून राहणे अशक्यच बनले असेल, तर उभयतांना वैवाहिक बंधनातून सहजपणे मुक्त करता यावे, असे एक सार्वजनिक धोरण बनविणे आवश्यक आहे. उभयतांचे आपसात पटत नसेल, त्यांच्यात बेनाव झाला असेल तर त्यांना एकत्र राहण्यास भाग पाडण्यात येऊ नये. असे करणे दोघांच्याही हिताचे नाही. राष्ट्रीय गुन्हे संशोधन मंडळाच्या अहवालानुसार वैवाहिक जीवनाच्या काळात महिलांनी आत्महत्या करण्याच्या घटना वाढत आहेत. २०१६ ते २०२० ह्या काळात ३७ हजार महिलांचा बळी गेला असून त्यापैकी ७% महिला घटस्फोट प्रकरणातील आहेत. ही बाबही ॲड. जयसिंग ह्यांनी खंडपीठाच्या नजरेत आणून दिली आहे.

### चांगले जीवनसाथीदार

ह्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले आहे की, लग्नानंतर उभयतांत, पती-पत्नी ह्यांच्यात वाद निर्माण होणे म्हणजे त्याचा अर्थ असा नव्हे की दोन्ही चांगली माणसं लग्नानंतर कायमचे चांगले जीवन-साथीदार राहू शकतीलच किंवा त्यांनी तसे राहावे अशी अपेक्षा ठेवणे वा गृहीत धरणे चुकीचे आहे.

खंडपीठातील प्रमुख न्यायमूर्ती संजय किशन कौल ह्यांनी सांगितले की, वैवाहिक जीवनात निर्माण होणाऱ्या वादात ५०% वाद हे लग्नानंतर तीन वर्षात उद्‌भवणारे आहेत. त्यामुळे सतत संघर्ष करीत पुढील काळ वैवाहिक जीवन जगण्यापेक्षा त्यांना विभक्त होण्याची संधी देण्यात यावी.

सुप्रिम कोर्टाने घटस्फोट खटल्यात उभयतांना लवकरात लवकर विभक्त करण्यासंबंधी असा सहानुभूतीचा विचार मांडला आहे. मात्र केवळ हायकोर्टाने तर दुसऱ्या एका घटस्फोट खटल्यात घटस्फोटाच्या वाढत्या प्रकरणावर तसेच तरुण पिढीच्या नव्या विचारसरणीवर टीका केली आहे. ह्या हायकोर्टाने एका घटस्फोट खटल्याचा निकाल देताना म्हटले आहे की, आजची तरुण पिढी लग्न म्हणजे 'युज ॲंड थ्रो' संस्कृती समजत आहे. हायकोर्टाने लग्नाचा नवा प्रकार निदर्शनास आणून दिला आहे.

### चंगळवादी जीवनशैलीचा परिणाम

आजच्या तरुण पिढीवर सध्याच्या चंगळवादी जीवनशैलीचा इतका परिणाम झाला आहे की ते विवाहही ह्याच चंगळवादी परिमाणात मोजत आहे. ही पिढी लग्न करणे म्हणजे आपल्यावर संकट ओढवून घेणे, असे समजत आहे. आपल्या मुक्त जीवन जगण्याच्या आड वैवाहिक बंधने येतात, असा विचार ही पिढी करू लागली आहे. वैवाहिक जीवनामुळे आपल्यावर येणाऱ्या जबाबदाऱ्या व कर्तव्य ते टाळू पाहत आहेत. पूर्वी 'वाइफ' म्हणजे 'वाइज इन्व्हेस्टमेंट फॉर एव्हर' असे समजले जात असे, तर आताची पिढी 'वाइफ' म्हणजे 'व्हरी इनव्हायटेड फॉर एव्हर' असं समजू लागली आहे.

नॅशनल स्टॅटिस्टिकल ऑफिस (एनएसओ) ने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार २०११ ते २०१९ ह्या काळात अविवाहित मुलांची (पुरुषांची) संख्या २०.८ टक्क्यांवरून २६.१ टक्के अशी वाढली आहे तर ह्याच काळात मुलींची संख्या १३.५ टक्क्यांवरून १९.९ टक्के अशी झाली आहे. असा ट्रेंड वाढण्यामागे इतर गोष्टींपेक्षा आर्थिक आणि भौतिक बाबी अधिक कारणीभूत आहेत, कारण ही नवी पिढी लग्न करणे म्हणजे आपल्यावर संकट ओढवून घेणे, असे मानत आहे. असे निष्कर्षही केरळ हायकोर्टाने एका घटस्फोट खटल्यात निकाल देताना काढला आहे,. अर्थातच हायकोर्टाने त्यांच्यापुढे आलेली विवाहित पुरुषाची घटस्फोटाची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली.

केरळ हायकोर्टाचा घटस्फोट प्रकरणीचा निष्कर्ष सर्वांनाच पटणारा नाही. मात्र सुप्रिम कोर्टाने नमूद केल्यानुसार वाढते घटस्फोट प्रकरणांचे वास्तव लक्षात घेऊन त्यातून पतीपत्नींना लवकरात लवकर विभक्त कसे करता येईल, वा त्यांची होणारी आर्थिक, मानसिक कुचंबणा कशी कमी करता येईल, हा विचार अधिक भावतो, तो अधिक सकारात्मक वाटतो.

मोबाईल : 83 29 59 68 37

विचार

# फॉरवर्ड, व्हायरल आणि रिप्लायचा आगडोंब


-डॉ. ॲलिना गोन्सालविस
चुळणे

डिजिटल युगाने आपल्याला अभूतपूर्व संवादशक्ती दिली आहे. एका स्पर्शाने संदेश हजारो लोकांपर्यंत पोहोचतो आणि एका प्रतिक्रियेने वातावरण तापते. 'फॉरवर्ड', 'व्हायरल' आणि 'रिप्लाय' हे शब्द केवळ तांत्रिक संज्ञा नाहीत; ते आधुनिक समाजाच्या मानसिकतेचे प्रतीक बनले आहेत. दुर्दैवाने, ह्या प्रतीकांमधून अनेकदा विवेकाऐवजी आवेग व संवादाऐवजी संघर्ष जन्म घेतो.

आज माहितीपेक्षा तिचा वेग अधिक प्रभावी ठरतो आहे. ''पहिल्यांदा शेअर करा'' ह्या स्पर्धेत ''खरे आहे का?'' हा प्रश्न मागे पडतो. एखाद्या घटनेचा अपूर्ण संदर्भ, छायाचित्रांचा दिशाभूल करणारा अर्थ किंवा बनावट संदेश हे सर्व एका क्षणात व्हायरल होतात. त्यावर प्रतिक्रिया येतात, प्रतिक्रिया प्रतिकारात बदलतात आणि प्रतिकार वैमनस्यात परिवर्तित होतो. अशा वेळी समाजाच्या सामूहिक विवेकावर भावनांचा अंधार पसरतो.

अफवांचे दुष्परिणाम आपण अनेकदा अनुभवले आहेत. अपहरणाच्या खोट्या संदेशांमुळे निरपराध व्यक्तींवर हल्ले झाले; धार्मिक किंवा जातीय तणाव भडकवणाऱ्या पोस्टमुळे स्थानिक पातळीवर अस्वस्थता निर्माण झाली. एका 'फॉरवर्ड'ने निर्माण केलेला संशय प्रत्यक्ष आयुष्यात भीतीचे रूप धारण करतो. डिजिटल ठिणगी प्रत्यक्ष वास्तवात ज्वाला बनते.

ह्याहून गंभीर बाब म्हणजे 'रिप्लायचा आगडोंब'. सामाजिक माध्यमांवरील चर्चा अनेकदा संवाद न राहता आरोप-प्रत्यारोपांच्या रणांगणात रूपांतरित होतात. विचारांची देवाणघेवाण न होता व्यक्तिमत्त्वावर हल्ले होतात. शब्दांची मर्यादा सुटते. मतभेदांना वैराची किनार मिळते. परिणामी समाजात ध्रुवीकरण



वाढते आणि परस्पर विश्वास कमी होतो.

ह्या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. माध्यमसंस्था, शासन किंवा तंत्रज्ञान कंपन्या ह्यांची जबाबदारी असली तरी सर्वांत मूलभूत जबाबदारी ही वापरकर्त्याची आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या मोबाईलमधून एक छोटेखानी प्रसारमाध्यम चालवत असते. त्यामुळे विवेक, संयम आणि तथ्य पडताळणी ही वैयक्तिक सवय बनली पाहिजे.

**माध्यम साक्षरता ही मूलभूत गरज आहे.**

ह्यासाठी माध्यम साक्षरता ही मूलभूत गरज आहे. माहितीची पडताळणी करणे, संदर्भ समजून घेणे आणि भावनिक उत्तेजनाला बळी न पडणे ही साधी पावले समाजाला स्थैर्य देऊ शकतात. तसेच संवादातील सभ्यता जपणे, असहमती व्यक्त करतानाही आदर राखणे हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.

प्रथम, कोणतीही माहिती पुढे पाठवण्यापूर्वी तिचा स्रोत तपासणे ही किमान जबाबदारी मानली पाहिजे. अधिकृत संकेतस्थळे, विश्वासार्ह वृत्तसंस्था किंवा संबंधित तज्ज्ञांचे मत ह्यांचा आधार घेणे आवश्यक आहे. भावनिक उत्तेजन देणाऱ्या संदेशांपासून जाणीवपूर्वक अंतर ठेवणे गरजेचे आहे. सामाजिक माध्यमांवरील संवादात सभ्य भाषेचा आग्रह धरणे आवश्यक आहे. असहमती व्यक्त करणे हा लोकशाहीचा भाग आहे; परंतु अपमान करणे हा स्वातंत्र्याचा दुरुपयोग आहे.

'फारवर्ड', 'व्हायरल' आणि 'रिप्लाय' ह्या शब्दांमध्ये अपार शक्ती दडलेली आहे. ही शक्ती समाजाला जोडू शकते, प्रेरणा देऊ शकते आणि परिवर्तन घडवू शकते. परंतु विवेकाचा अभाव असेल, तर हीच शक्ती आगडोंब ठरते. म्हणूनच प्रत्येक क्लिकपूर्वी एक क्षण थांबून विचार करू या - आपण संवाद वाढवत आहोत की दरी?

'फॉरवर्ड', 'व्हायरल' आणि 'रिप्लाय' ह्या केवळ डिजिटल क्रिया नाहीत; त्या नैतिक निवडी आहेत. प्रत्येक क्लिकपूर्वी आपण ठरवत असतो की समाजात प्रकाश पसरवायचा की ठिणगी टाकायची! विवेक आणि जबाबदारी ह्यांची सांगड घातली, तर डिजिटल जग संवादाचे मंदिर ठरू शकते; अन्यथा ते संघर्षाचे रणांगण बनण्यास वेळ लागणार नाही.

निवड आपल्या बोटांवर आहे आणि भविष्य आपल्या सामूहिक विवेकावर.

मोबाईल : 77 98 35 27 69

●

**'सुवार्ता' साठी आपली जाहिरात, वर्गणी किंवा देणगी चेकद्वारा द्यायची असल्यास कृपया आपला चेक 'The Suwarta Trust' ह्या नावाने काढावा.**

**- व्यवस्थापक**



ALDEL EDUCATION TRUST

# ST. JOHN COLLEGE OF HUMANITIES AND SCIENCES

**AUTONOMOUS**

NAAC ‘ B++’ Grade

**UNIVERSITY CODE 1055**

## ADMISSIONS OPEN 2025-26

M.Sc. (IT) | M.Com. (Advanced Accountancy)

B.A. | B. Com. | B.B.I. | B.A.F. | B.F.M.

B. Sc.(IT) | B. Sc.(CS) | B. Sc.(DS)

B. Sc. (HOSPITALITY STUDIES) | B. Sc.(PCM / PCB) | B.Com (MS) / BMS

Interactive & Engaging Activities

- Modern Infrastructure
- Well-Equipped Laboratories
- Great Indoor and Outdoor Sports facilities
- Highly Experienced Teachers
- Digital Smart Classrooms
- Scholarship Opportunities

7219230156 | 02525 - 297071

St. John Technical and Educational Campus, Vevoor,
Manor Road, Palghar (East), Dist. Palghar - 401 404, Maharashtra, India.

office@sjchs.edu.in
aldel.sjchs
sjchs_official
www.sjchs.edu.in

## लग्नाच्या ५०व्या वर्धापनदिनानिमित्त सुवर्णमयी शुभेच्छा

**२५ एप्रिल १९७६ ते २५ एप्रिल २०२६**





## श्री. अंतोन आल्मेडा व श्रीमती फिलोमिना आल्मेडा

माणिकपूर, वसई

प्रिय मम्मी व डॅडी,

परमेश्वराच्या कृपेने तुम्ही दिनांक २५/०४/२०२६ रोजी वैवाहिक जीवनाची ५० वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन!

परमेश्वर तुम्हांला चांगले आरोग्य व सुखी दीर्घायुष्य देवो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**-: शुभेच्छुक :-**

**भाऊ : फादर मायकल आल्मेडा (एस.जे.)**
**मुले : राजू, रुपेश व रॉनी आल्मेडा**
**सुना : सुप्रिया, सुनिता व मिनल आल्मेडा**
**मुलगी : रेणुका घोन्सालवीस**
**जावई : सेबेस्टीन घोन्सालवीस**
**नातवंडे : हॅन्स, तानिया, प्रेशिता, रोझ, सायना व रसल**

## लग्नाच्या ५५व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा

१८/०४/१९७१ - १८/०४/२०२६



**श्री. पॉल व सौ. लुसी आल्मेडा**

भुईगाव, एखाद आळी

प्रिय बाबा आणि आई,

परमेश्वराच्या कृपेने तुम्ही दिनांक १८/०४/२०२६ रोजी वैवाहिक जीवनाची ५५ वर्षे पूर्ण करीत आहात त्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद! तुमचे पुढील वैवाहिक जीवन सुखाचे व आनंदाचे जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**शुभेच्छुक :- मुले : संजीव, संदीप, मोझेस**
**सुना : निता, जेनेट, मारीया; नातवंडे : रॉस्टन, सेरॉन, शेल्डन, मायरॉन, आयवोना, मार्सीया**

## 48th Wedding Anniversary

02/04/1978 - 02/04/2026



**Mrs. Concessao & Mr. Gregory Rozario**

Gokhivare

We thank you Heavenly father for blessing you with 48th wonderful of love, patience & togetherness. May the Lord continue to bless your union with joy, peace & good health. Wishing you A Very Happy Anniversary. May God Shower you both abundantly with his blessings.

**Lots of love : Mitchelle and Monty, Randel and Cheryl, Aarya, Anmol, Liam and Aaron**

## ७५व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिनंदन

०७/०४/१९५१ ते ०७/०४/२०२६



**श्री. मॅथ्यू मनवेल वाझ**

दारसेंग, गोम्सआळी परिसर

प्रिय पप्पा,

परमेश्वराच्या कृपेने तुम्ही दिनांक ०७/०४/२०२६ रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन! तुमचे पुढील आयुष्य निरोगी सुखी-समाधानाचे जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**-: शुभेच्छुक :-**
**नातवंडे : लिट्झी वाझ; मेगन आणि जेडन डाबरे**

## लग्नाच्या ५०व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिनंदन

२९/०२/१९७६ - २८/०२/२०२६



**श्री. बेंजामीन व सौ. जॉना फरगोज**

करमाळे, उमराळे

प्रिय बाबा आणि मम्मी,

परमेश्वराच्या कृपेने तुम्ही दिनांक २८/०२/२०२६ रोजी वैवाहिक जीवनाची ५० वर्षे पूर्ण केलीत, त्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद! परमेश्वर तुम्हां दोघांनाही उत्तम आरोग्य, आनंद आणि दीघायुष्य देवो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**शुभेच्छुक :- मुले : रेनीन, रोशन आणि फादर रॉबीन**
**सुना : जॉलीना व स्वाती**
**नातवंडे : रियान, नॅथन, वेन आणि कुटुंबीय**

**७५व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिनंदन**
**२९/०४/१९५१ ते २९/०४/२०२६**



**श्री. जोकीम जॉन डिकुना**
शेनोडी, पाली

प्रिय डॅडी,

परमेश्वराच्या कृपेने तुम्ही दिनांक २९/०४/२०२६ रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन! तुमचे पुढील आयुष्य निरोगी सुखी-समाधानाचे जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**शुभेच्छुक :- पत्नी : माग्दलेना डिकुना;**
**मुलगा : विवियन डिकुना; सून : अॅड्रीना डिकुना;**
**मुलगी : जास्मीन कर्नेलो; जावई : सेल्टन कर्नेलो;**
**नात: झियस कर्नेलो व कुटुंबीय**



**९०व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिनंदन**
**०१/०४/१९३६ ते ०१/०४/२०२६**



**श्री. इनास मनवेल घोन्सालविस**
डि आर जी एस शेजोळ, चुळणे

प्रिय डॅडी,

ईश्वरकृपेने तुम्ही दिनांक ०१/०४/२०२६ रोजी वयाची ९० वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन! तुमचे पुढील आयुष्य निरोगी सुखी-समाधानाचे व आनंदाचे जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**शुभेच्छुक :-मुले-सुना; मुलगी-जावई, नातवंडे, पणतू**
**बहीण : सि. आयरीन घोन्सालविस,** SRA


# पिटरमेरी इंडिया निधी लि.(वित्तसंस्था)

PETERMARY

पहिला माळा, बिल्डींग नं. १, न्यु श्रीजी कृपा कॉम्प्लेक्स, कार्डिनल ग्रेशियस हॉस्पीटल समोर, बंगली, सांडोर, वसई (प), पालघर - ४०१ २०१.

Registration No.: U65999MH2019PLC323412

स्थापना : २०१९

**मुख्य कार्यालय व शाखा: वसई**

**Contact Details : 8669955317 / 18** | email: petermary.nidhi@gmail.com | web: www.petermary.com

**वसईत प्रथमच !!!**

कंपनी कायदा २०१३ व कंपनी (स्थापना) नियम २०१४ अन्वये नोंदणी झालेली निधी कंपनी

**आमची वैशिष्टे :**

- आकर्षक व्याजदराच्या बचत ठेव / आवर्त ठेव व मुदत ठेव योजना.
- जेष्ठ नागरिकांसाठी ठेवींवर अधिक व्याजदर.
- कंपनी कायद्या अंतर्गत पारदर्शक व्यवहार.
- संगणकीय / मोबाईल बँकींग सुविधा.
- तत्पर सौजन्याची सेवा / घरपोच सेवा.
- वसईच्या भुमीपुत्राकडून संचलित वित्त संस्था

**DEPOSIT SCHEME**

| Sr. No. | Deposit Period | Interest % General | Interest % Sr. Citizan |
|---|---|---|---|
| 1. | Deposit for 12 Months | 9.00% | 9.30% |
| 2. | Deposit for 60 Months | 11.00% | 11.50% |
| 3. | Dam Duppat in | 72 Months | |

**अलॉयशियस परेरा**
व्यवस्थापकीय संचालक

**लिविया कोयलो**
सचिव

First Floor, New Shreeji Kripa Complex, Opp. Cardinal Gracias Hospital, Bangli, Sandor, Vasai (W). Dist. Palghar - 401 201.

## अमृत महोत्सवी (७५व्या) वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा व अभिनंदन

०८/०४/१९५१ ते ०८/०४/२०२६







**श्री. विन्सेंट गिरगोल फरगोज**

गोखिवरे, वसई

***''परमेश्वर तुला आशीर्वाद देवो आणि तुझे रक्षण करो;***
***परमेश्वर आपला मुखप्रकाश तुझ्यावर पाडो आणि तुझ्यावर कृपा करो.''***

(गणना ६:२४-२५)

प्रिय डॅडी / अंकल,

परमेश्वराच्या महान कृपेने आपण आयुष्याची ७५ वर्षे पूर्ण केलीत. ह्या सुंदर प्रवासात देवाने आपल्याला आरोग्य, प्रेम, कुटुंबाचे सुख आणि अनेक आशीर्वाद दिले, त्याबद्दल देवाचे मनापासून आभार!

आपले जीवन सदैव देवाच्या प्रेमाचे आणि विश्वासाचे सुंदर साक्षीदार राहो, ह्याच ७५व्या वाढदिवसाच्या हार्दिक प्रार्थनामय शुभेच्छा!

**शुभेच्छुक : कुटुंबीय व मित्रपरिवार**


पान मार्केटिंग चॅरिटेबल ट्रस्ट
रजि, नं. E-२५० पालघर
सहकार महर्षी डॉमणिक घोन्सालविस पुरस्कार
सन २०२४-२०२५
वसई तालुक्यातील सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी बँक, पतसंस्था, विविध कार्यकारी संस्था, मच्छिमार संस्था व कन्झ्युमर्स संस्थांना "सर्वोत्कृष्ट सहकारी संस्था" सहकार महर्षी डॉमणिक घोन्सालविस यांच्या नावाने पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.
कार्यक्रमाचे अध्यक्ष:
मा. आर्चबिशप फेलिक्स मच्याडो
प्रमुख पाहुणे:
मा. श्री. अजीवजी पाटील (महापौर, व.वि.श.म.पा.) मा. श्री. हितेंद्रजी ठाकूर (लोकनेते)
मंगळवार दि. ०७ एप्रिल २०२६ | संध्याकाळी ५.०० वा.
ठिकाण: थॉमस बॅप्टीस्टा कॉलेज सभागृह, पापडी कथिड्रलसमोर, वसई (प.)
आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
निमंत्रक:
रोहन घोन्सालविस
अध्यक्ष
विश्वस्त:
गब्रेल मच्याडो अशोक कुलास
अशोका डिसिल्वा ब्रॉन्सन घोन्सालविस


DEVELOPED BY
CHRISTINA
DEVELOPERS
CHRISTINA MIMAR
OC RECEIVED
FEW 2 BHK FLAT AVAILABLE
BOOK NOW
+91 7758963569
QR CODE
Scan To Know More

Divine Match

*Where Faith Meets Meaningful Connections*



## Welcome to Divine Match

support@divinematch.net

divinematch.net

### Why Divine Match

- Verified Profiles
- Real Connections
- Shared Values
- Marriage-Focused

Divine Match is a Catholic platform connecting singles for Marriage-focused relationships rooted in Christian values.



### How It Works

Ensure Authenticity

Create Connections

Support & Guidance

Scan to join

## एक महिन्याची आठवण



**ख्रिस्तवासी जुराण सिल्वेस्टर (शिलू) परेरा**

उत्तन, भाटेबंदर, वेलंकनी माता तीर्थ मंदिर

जन्म : २०/०२/१९६२; मृत्यू : ०७/०३/२०२६

एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक ०८/०४/२०२६

सकाळी ७.०० वाजता, दर्यामाता चर्च, उत्तन.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*



**पत्नी : जुलियाना**

**मुले - सुन : फा. जॉडमन**
**जॉडविन - शायलिन**

**मुलगी - जावई : जॉसलिना - जय**

**नातवंडे : लिसा, जोवियन, लायरा**
**जोयलन व जश**

**भाऊ - बहिणी : डॅनिएल, आलिशिन, मोजेस, फ्रिडा, सांतान, बेन्टीन**



## प्रेमळ स्मरणार्थ - भावपूर्ण श्रद्धांजली



**ख्रिस्तवासी इनास इतूर कून** **ख्रिस्तवासी माग्दलेना इनास कून**

'निरन्तर' सागरशेत रोड, टिवळी, रमेदी, वसई


| | |
|---|---|
| जन्म : १५/०२/१९३१ | जन्म : १५/०८/१९३५ |
| मृत्यू : १७/०४/२०२५ (पवित्र गुरुवार) | मृत्यू : १३/०७/२०२४ |

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक १२/०४/२०२६
सकाळी ७.३०वाजता, अवर लेडी ऑफ रमेदी चर्च, रमेदी.


***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*हे दयाळू परमेश्वरा, ख्रि. इनास इतूर कून व ख्रि. माग्दलेना इनास कून ह्यांच्या आत्म्यांना चिरंतन शांती लाभो आणि नित्य प्रकाश त्यांच्यावर पडो. त्यांच्या आत्म्यांना तुझ्या स्वर्गीय राज्याच्या आनंदात स्थान दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*



**स्मिता व शअली**
**'निरन्तर' कुटुंबीय**



## प्रेमळ स्मरणार्थ -पाच वर्षांची आठवण



### ख्रिस्तवासी मायकल व तेरेजा फोन्सेका

'परिश्रम', चुळणे

जन्म : २६/०१/१९४१ जन्म : १५/०८/१९४१

मृत्यू : १४/०४/२०२१ मृत्यू : २६/०४/२०२१

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या आई-वडिलांना सदैव चिरकाल शांती दे व अनंत तेजाने त्यांना प्रकाशित कर!*

**कुटुंबीय**

## प्रेमळ आठवण

**१०० व्या जन्मदिवसाची**

०९-०४-१९२६ ते ०९-०४-२०२६

**१० वर्षाची**

०२-०१-२०१६ ते ०२-०१-२०२६





### ख्रिस्तवासी जॉन अंतोन फर्नांडिस

### ख्रिस्तवासी रोजमरी जॉन फर्नांडिस

**गायवाडी, सांडोर**

जन्म: ०९/०४/१९२६ जन्म: १९/०८/१९३०

मृत्यू: ०९/१०/१९९० मृत्यू: ०२/०१/२०१६

**प्रभू येशू म्हणतो,**

**''जेथे मी आहे तेथे त्यांनीही असावे,अशी माझी इच्छा आहे.''**

(योहान १७.२४)

**हे प्रभू, आमच्या आई बाबांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतर शांती लाभो हीच ईश्वर चरणी विनम्र प्रार्थना!**

**- फर्नांडिस कुटुंबीय**

## पाच वर्षांची प्रेमळ आठवण



### ख्रिस्तवासी जोसेफ मार्शल डिकूना

काटोळ बेणे, मर्सिस

जन्म : १२/०७/१९५६; मृत्यू : १८/०४/२०२१

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो,तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)


*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या पप्पांना चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : लुकशिला**

**मुले-सुना : रॅकमन व प्राची; जॉर्डन व रेचल;**

**लाडकी नातवंडे : रिशॅल, प्लॅसिड, जेडन व कुटुंबीय**

## ५० वर्षांची आठवण ३३ वर्षांची आठवण





### ख्रिस्तवासी डॉमणिक जाकू सोज

### ख्रिस्तवासी मॉनिका डॉमणिक सोज

चुळणा, होंड शेजोळ

जन्म : १८/१२/१९२१ जन्म : ०१/१२/१९२३

मृत्यू : २३/०४/१९७६ मृत्यू : १५/०१/१९९३

***''आम्ही विश्वास ठेवतो की येशू मरण पावला व पुन्हा उठला तसेच देव येशूमध्ये निजलेल्यांनाही त्यांच्यासह आणील.''***

(१थेस्स. ४:१४)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना !*

**मुलगा : बोनस डिसोजा; सून : मागरिट डिसोजा**

**प्रेमळ स्मरणार्थ**



**ख्रिस्तवासी जॉना इग्नेशियस बुतेलो**

जन्म : १४/१२/१९४४
मृत्यू : २६/१०/२०१५

**सहा महिन्यांची आठवण**



**ख्रिस्तवासी इग्नेशियस अंतोन बुतेलो**

जन्म : ३१/१०/१९४३
मृत्यू : ०६/१०/२०२५

ओळंबवाडी, पापडी

सहा महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक १२/०४/२०२६
सकाळी ७.१५ वाजता, कृपामाता कथिड्रल, पापडी.


***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***
(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

---

**जन्मशताब्दीनिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली**



**ख्रिस्तवासी इनास दुमा घोसाल**

जन्म : ०५/०३/१९२६
मृत्य : ०८/०७/२००५



**ख्रिस्तवासी नाताळ इनास घोसाल**

जन्म : २२/०५/१९३०
मृत्यू : १६/०३/२०१४

चुळणा

**प्रेमळ स्मरणार्थ भावपूर्ण श्रद्धांजली**



**ख्रिस्तवासी मनवेल व्हिक्टर डिसोजा**

जन्म : २२/०९/१९५०
मृत्यू : २२/०५/२०१४



**ख्रिस्तवासी फ्लॉरेन्स मनवेल डिसोजा**

जन्म : १९/०२/१९५३
मृत्यू : ०३/०५/२०२१

चुळणा, माणिकपूर रोड

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे
जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***
(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमचे आई-बाबा व बहीण-भाऊजी ह्यांना चिरंतन शांती दे व अनंत तेजाने त्यांना प्रकाशित कर, हीच तुझ्याचरणी विनम्र प्रार्थना!*

**सौ. कॅरोलिना ॲन्थोनी कोलॅसो व कुटुंबीय**

## २५ वर्षांची प्रेमळ आठवण



**खिस्तवासी गॅब्रियल मर्यान डिसोजा**

चुळणे

जन्म : २५/०१/१९६०; मृत्यू : ०६/०४/२००१

स्मरणार्थ मिस्सा : सोमवार ०६/०४/२०२६

सकाळी ७.०० वाजता, चुळणे चर्च.

***''देवाने आपल्या नंदनवनात नजर टाकली. तेथे रिकामी जागा त्याला दिसली. मग त्याने खाली पृथ्वीवर पाहिले व तुम्हाला आपल्या बाहुपाशात घेतले आणि चिरविश्रांतीसाठी आपल्या सोबत नेले.''***

*परमेश्वराच्या नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : डॉमनिका डिसोजा**

**मुलगा व सून : सॅमसन व नातालिया डिसोजा**

**मुलगी व जावई : सिंमेथा व स्टिवन आल्मेडा**

## सहा महिन्यांची आठवण



**खिस्तवासी विन्सेंट पास्काल परेरा**

कोंडाळेवाडी, सांडोर

जन्म : २४/०९/१९५१; मृत्यू : ०५/१०/२०२५

सहा महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक १२/०४/२०२६

सकाळी ७.३०वाजता, सेंट थॉमस चर्च, सांडोर.

***येशू म्हणाला, ''आज तू माझ्याबरोबर सुखलोकांत असशील.''***


(लूक २३:४३)

*हे प्रभू, आमच्या डॅडींना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : क्लेरा; मुलगी-जावई : क्लेविया-नीलराज**

**मुले : सॅविओ व क्लाईव्ह; नातवंडे : ओझील व एस्मी**

## नववे पुण्यस्मरण



**खिस्तवासी मार्शल जॉन डिसिल्वा**

'अनुराग', लेंभाटवाडी, गिरीज

जन्म : २८/०६/१९४२; मृत्यू : २०/०४/२०१७

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या पप्पांना चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**तुमचीच शोकाकुल पत्नी : इजाबेल डिसिल्वा व कुटुंबीय**

### ३० वर्षांचे स्मरण



**ख्रिस्तवासी अति जोसेफ गोम्स**

### २० वर्षांचे स्मरण



**ख्रिस्तवासी जोसेफ ईनास गोम्स**

चुळणे

जन्म : ०९/१२/१९३५ — जन्म : ०९/१०/१९३५

मृत्यू : ०४/०४/१९९६ — मृत्यू : ११/०६/२००६

***प्रभू म्हणतो, ''तुमचा उत्साह मावळू देऊ नका, मन उत्तेजित ठेवा. तुमच्या ठायी आशा असल्याने आनंदीत असा. संकटात धीर धरा, सतत प्रार्थना करा.''***

(रोम १२:११-१२)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**क्लारा विल्यम डिसोजा व रेजीना फ्रेडी कोलासो**

### दहा वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी थॉमस मायकल डिसा**

चुळणे

जन्म : २२/१२/१९४५; मृत्यू : २३/०४/२०१६

***''देवाने आपल्या नंदनवनात नजर टाकली. तेथे रिकामी जागा त्याला दिसली. मग त्याने खाली पृथ्वीवर पाहिले व तुम्हाला आपल्या बाहुपाशात घेतले आणि चिरविश्रांतीसाठी आपल्या सोबत नेले.''***

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**तुमची शोकाकुल पत्नी : सांतान थॉमस डिसा व कुटुंबीय**

### Five years In Loving Memory Of



**Late Santan Anthony Carvalho**

Salbhatwadi, Giriz

D.O.B. : 12/12/1950; D.O.D. : 30/04/2021

5 years Mass : Sunday 3rd May, 2026

Morn. 9.00 a.m., at, Giriz Church.

***"I will not forget you see, I have engraved you on the palms of my hands."***

(Isaiah 49:15-16)

**Husband : Anthony N. Carvalho;**
**Daughters/Son-in-Laws : Tina Rupesh Dodti, Leena Darrel Correia, Sylvia Roshan Coutinho;**
**Grand Kids : Brice, Dallin, Bliss, Sidney**

### वार्षिक स्मृती



**ख्रिस्तवासी तिरेज जॉन बॅप्टीस्टा**

रायतोडी वाडी, मुळगाव

जन्म : ०७/१०/१९३९; मृत्यू : ०९/०४/२०२५

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक १२/०४/२०२६

सकाळी ७.३० वाजता, मुळगाव चर्च.


***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***

(कलस्सै. २:४-५)

*हे प्रभू, आमच्या आईला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सदैव आनंदी ठेव व तिला चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## प्रेमळ स्मरणार्थ



**ख्रिस्तवासी अनी इनास डिकोष्टा** | **ख्रिस्तवासी इनास डिकोष्टा** | **ख्रिस्तवासी रोजी स्टॅनी घोन्सालवीस** | **ख्रिस्तवासी स्टॅनी घोन्सालवीस**

चुळणा | मर्सेस

मृत्य : १२/१२/२०११ | मृत्यू : १७/०२/२०११ | मृत्यू : २०/०१/२०२० | मृत्यू : १५/०२/२०१८

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे***
***जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***
(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**डिकोष्टा कुटुंबीय**

---

**सहा महिन्यांची आठवण** | **प्रेमळ स्मरणार्थ**




**ख्रिस्तवासी सेंटजॉन डिकोष्टा** | **ख्रिस्तवासी थॉमसन मिरांडा**

चुळणा

जन्म : १९/०७/१९६९ | जन्म : २६/१२/१९९५
मृत्यू : ०८/१०/२०२५ | मृत्यू : १३/१२/२०२१

सहा महिन्यांची मिस्सा :
रविवार दिनांक १२/०४/२०२६
सकाळी ७.१५वाजता, चुळणा चर्च.



***''आम्हांसाठी सार्वकालिक निवासस्थान स्वर्गात आहे.''***
(२करिंथ ५:१)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**डिकोष्टा कुटुंबीय**

---

**एक वर्षाची आठवण** | **१० वर्षांची आठवण**

**ख्रिस्तवासी ग्रेसी डेव्हिड नरोणा** | **ख्रिस्तवासी डेव्हिड विक्टर नरोणा**

पाली, वडवली

जन्म : १८/०६/१९४२ | जन्म : २१/०८/१९३९
मृत्यू : ११/०३/२०२५ | मृत्यू : ०३/०३/२०१६

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे.***
***जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***
(योहान ११:२५)

*हे प्रभू, आमच्या आई-वडिलांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात*
*चिरंतन शांती लाभो, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## चार वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी फादर सायमन इग्नेशियस बोर्जीस**

उत्तन, डोंगरी

जन्म : १०/०७/१९४०; मृत्यू : २१/०४/२०२२

स्मरणार्थ मिस्सा : बुधवार दिनांक २२/०४/२०२६

संध्याकाळी ६.०० वाजता, बेलेन माऊली चर्च, उत्तन-डोंगरी.


***प्रभू म्हणतो, ''भल्या आणि विश्वासू दासा,तू थोड्याशा गोष्टीत विश्वासू राहिलास. मी तुझी अधिक गोष्टींवर नेमणूक करीन.''***

(मत्तय २५:२३)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या फादरांच्या आत्म्यास चिरंतन शांती लाभो, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**भाऊ, बहिणी व कुटुंबीय**

## एक वर्षाची आठवण



**ख्रिस्तवासी जोसेफ क्रिजोस डायस**

क्रिज व्हिला, तरखड, रमेदी

जन्म : २१/१२/१९४६; मृत्यू : २९/०४/२०२५

एक वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक २६/०४/२०२६

सकाळी ७.३०वाजता, रमेदी माता चर्च, रमेदी.

***प्रभू येशू म्हणतो, ''जेथे मी आहे तेथे त्यांनीही असावे, अशी माझी इच्छा आहे.''*** (योहान १७:२४)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी :शिला डायस,; मुलगी-जावई :लिसा-प्रितम रॉड्रीक्स**

**नातवंडे : कॅलन, क्लोई, डायस व घोन्सालवीस कुटुंबीय**

## 5th year death anniversary



**Late Benjamin D'souza**

Manitepar Chulna

D.O.B : 31/03/1951; D.O.D. : 13/04/2021

Remembrance Mass on : 12/04/2026

8.30 at Our Lady of Fatima Church, Chulna.

***"Blessed are the pure in heart for they shall see God."*** (Mathew 5:8)

**Tribute of love from - Wife : Monthina**

**Daughters : Dolly & Dinah;**

**Son-in-law :Agnelo**

**Grand-children : Eliana & Rafael**

**3rd Death Anniversary &**
**40th years Priesthood Anniversary**





*"I am the resurrection and the life.*
*Those who believe in me even*
*though they die, will live."*
(John 11:25)

**Missing you Forever**
**Mummy, Sister, Brothers & Sister-in-law,**
**Nephews, Uncle & Aunty**
**Fr. Adrian, Fr. Rakesh, Sr. Jacinth, Sr. Eva**



**Late Fr. Richard Marshal Pereira**
Kharbhat, St. Thomas Church, Sandor
(Baroda Diocese)
D.O.B. : 01/01/1957; D.O.D. : 03/04/2023
Priesthood Ordination : 5th April 1986

---


**जन्मशताब्दी प्रेमळ स्मरणार्थ**

२६/०४/१९२६ ते २६/०४/२०२६

२६/०५/१९२६ ते २६/०५/२०२६







**ख्रिस्तवासी फिलिप इनास डिकुना**
जन्म : २६/०४/१९२६
मृत्यू : २६/०६/१९९७

पाद्रीखानवाडी, रमेदी

**ख्रिस्तवासी जॉकिन फिलिप डिकुना**
जन्म : २६/०५/१९२६
मृत्यू : ३१/०५/२०१३

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे***
***जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''*** (मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या आई-वडिलांना सदैव सुखी ठेव, हीच तुझ्याचरणी विनम्र प्रार्थना!*

**अल्बिना फर्नांडिस**

# माध्यमांचा ताण आणि मानसिक आजार

**-सिस्टर स्टेव्हीना लोबो**
कौन्सिलिंग सायकोलॉजिस्ट, बॅण्ड्रा

आजच्या धावपळीच्या जीवनात, मीडिया जो आपला ऑक्सिजन बनला आहे तो माहितीपेक्षा जास्त आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत बातम्या, मते, मनोरंजन आणि सामाजिक घडामोडी आपापल्या स्क्रीनवर असतात. सतत संवाद साधण्याचे फायदे आपणांस मिळतात; परंतु त्यामुळे मीडियाचा ताण निर्माण होतो. डिजिटल माहितीच्या अतिरेकी प्रदर्शनामुळे मानसिक विकार होऊ शकतात. डिजिटल उपकरणांनी ग्रस्त असलेल्यांसाठी हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

डिजिटल वापरामुळे माणसाच्या मानसिकतेवर आणि शरीरावर परिणाम होतो. त्यामुळे शरीराला एक तणावपूर्ण सवय झाली आहे. मथळा, रात्री उशिरापर्यंतचा शोध आणि दुसऱ्यांच्या परिपूर्ण आयुष्याशी तुलना करणे ही एक सवय झाली आहे. तासन्‌तास स्क्रीनवर राहिल्यानंतर बऱ्यावाईट विचारांचा मानसिक आजारावर परिणाम होतो.

### मीडियास्ट्रेस म्हणजे काय?

कल्पना करा की स्क्रीन टाईममुळे सतत चिंता निर्माण होते. दिवसभर वाईट गोष्टी ऐकणे किंवा वादविवाद ऐकणे ह्याचा आपल्या मानसिकतेवर किती परिणाम होऊ शकतो? ब्रेकशिवाय मीडियाचा अती वापर करणे, हे कारणीभूत ठरते. संगणक व फोन सतत अशी माहिती सादर करतात, जी आपल्याला चिंताग्रस्त, रागावलेले, निराश किंवा भारावून टाकणारे बनवू शकतात. बातम्या पाहिल्यानंतर अनेकांना काळजी, अस्वस्थता किंवा नैराश्य येते. बातम्यांमध्ये आपत्ती, गुन्हे, वाद आणि समस्यांचा समावेश असतो. माहिती असणे महत्त्वाचे असले तरी, आपला मेंदू



इतक्या वाईट बातम्या हाताळण्यासाठी तयार केलेला नाही. सोशल मीडिया आपल्यावर ताण आणतो. कारण आपण स्वत:ची तुलना करतो, वाद घालतो व लवकर प्रतिसाद देतो. मीडिया सर्वव्यापी असल्याने परिस्थिती आणखी बिकट होते. सकाळी उठताच फोन तपासणे, नाश्त्यापूर्वी मोबाईल पाहणे, कामावर किंवा शाळेत जाताना बातम्या ऐकणे आणि झोपण्यापूर्वी व्हिडिओ पाहणे, ह्याचा अर्थ असा की आपले मेंदू सतत माहिती व भावना आत्मसात करते. आपले

> **माध्यम हे आपल्या जीवनाचे एक साधन आहे. साध्य नव्हे; त्याचा तारतम्याने वापर करावा.**

शरीर अखेर आपली सतत व्यग्र मानसिकता प्रतिबिंबित करते. मीडिया स्ट्रेस हा बऱ्याचदा हळूहळू विकसित होतो, ज्यामुळे परिस्थिती कठीण होते. शारीरिक समस्यापूर्वी मीडियाट्रेस वाढताना आपल्याला क्वचितच दिसतो. शास्त्रज्ञांच्या मते डोकेदुखी, मायग्रेन, निद्रानाश, त्वचेच्या समस्या, पोटदुखी, जास्त उद्‌भवू शकतात. जरी अनियंत्रित असले तरी, अनेक लक्षणे मानसिक ताण दर्शवतात.

### मानसिक आजार समजून घेणे : मन-शरीर संघर्ष

वैद्यकीय शास्त्रामध्ये परिभाषेत असले तरी, मानसिक आजार सोपे आहेत. मन 'सायको' आहे आणि शरीर 'सोमॅटिक' आहे. मानसिक आजार हे ताण-संबंधित शारीरिक लक्षणे आहेत. ती 'बनावट' किंवा 'सर्व काही तुमच्या डोक्यात' येत नाही. लक्षणे इतर कोणत्याही आजारांसारखी खरी आणि वेदनादायक आहेत. जेव्हा तुम्हाला ताण येतो किंवा धोका असतो तेव्हा तुमचा मेंदू तुमच्या शरीराला कृती करण्यास उद्युक्त करतो. स्नायूंचा ताण, उथळ श्वास आणि पचनाला उशीर झाल्यामुळे हृदयाची गती वाढते. वन्य प्राण्यांपासून पळून जाताना ह्या प्रतिसादाचा वापर करा. जरी 'धोका' हे तणावपूर्ण माध्यम असले तरी, तुमचे शरीरही तशीच प्रतिक्रिया देते. सतत सतर्क राहिल्याने तुमचे शरीर दिवस, आठवडे किंवा महिने थकत राहते. सतत डोकेदुखी, पोटदुखी, मान आणि खांद्यावर ताण, पुरळ किंवा मुरुमांसह त्वचेच्या समस्या, निद्रानाश आणि थकवा ही मानसिक लक्षणे आहेत. काहींना चक्कर येणे, छातीत दुखणे किंवा भूक न लागणे असे अनुभवही अवयवांची समस्या नाही; तर येथे समस्या येतात. कारण ताण ही समस्या आहे. निराशाजनक आहे. अशा स्थितीमध्ये वैद्यकीय चाचण्या सहसा नॉर्मल येतात.

पौलिन सिस्टर्स ओळखतात की माध्यमे आणि संवाद हे चांगले आणि सत्य पसरवू शकतात. ह्या सिस्टर्स कोणत्याही महान साधनाप्रमाणे सावधगिरी आणि विवेकाची मागणी करतात. आमचे संस्थापक, धन्य जेम्स अल्बेरिओन ह्यांनी देव आणि मानवतेसाठी माध्यमांचा प्रचार केला. आपण स्वत:ची शांती राखून इतरांना मदत करू शकतो. ७५ वर्षांहून

अधिक काळ, भारत प्रिंट मीडियापासून डिजिटल मीडियाकडे वळला आहे. प्रत्येक प्रगती नवीन संधी आणि अडचणी घेऊन येते. आधुनिक साधनांचा वापर करताना आपण देवाला केंद्रस्थानी ठेवले पाहिजे.

### डिजिटलायझेशनचा व्यावहारिक वापर

आमच्या संस्थेच्या ७५वर्षाच्या भारतातील सेवेनंतर जग किती विकसित झाले आहे हे पाहून मला आश्चर्य वाटते. तरीही शांती, परस्पर संबंध व आध्यात्मिक कल्याणासाठी मूलभूत मानवी गरजा कायम आहेत. आधुनिक माध्यमांचा ताण आणि मानसिक आजार ह्याकडे आपण करुणेच्या दृष्टीने पाहिले पाहिजे. इंटरनेटचा वापर शारीरिक आरोग्यावर कसा परिणाम करतो हे जाणून घेतल्याने आपल्याला असे निर्णय घेण्यास मदत होते जे आपल्याला कनेक्टेड आणि निरोगी राहण्याची गरज संतुलित करतात. तुमच्या शरीरातील मीडिया स्ट्रेसचे परिणाम हे तुमचे रक्षण करणाऱ्या संवेदनशील, बुद्धिमान प्रणालीचे सूचक आहेत. हे संकेत लक्षात घेऊन मध्यम, सातत्यपूर्ण डिजिटल प्रणालीचा सराव केल्याने शांती व शारीरिक आरोग्य मिळू शकते.

लोकांशी निरोगी संबंध निर्माण करण्यासाठी माध्यमे आणि तंत्रज्ञानाचा वापर त्याच शहाणपणाने आणि विवेकबुद्धीने करणे आवश्यक आहे ज्याचा वापर आपण जीवनाच्या इतर पैलूंमध्ये करतो जे आपल्या कल्याणावर आणि प्रेम करण्याच्या क्षमतेवर परिणाम करतात. मीडियाविषयी व्यावहारिक ज्ञान आणि आपल्या तत्त्वांचे व कल्याणाचे पालन केल्याने आपणास यश आणि शांती प्राप्त होते.

### निरोगी मीडिया संबंध

आज मीडियापासून दूर राहणे अशक्य आहे. माहिती तंत्रज्ञानाशी अधिक उद्देशपूर्ण आणि संतुलित संबंध ठेवणे पसंत केले जाते. ह्यामध्ये स्त्रोत, माहिती आणि माध्यमांची निवड करणे समाविष्ट आहे. अन्नाप्रमाणेच ज्ञान, आरोग्य आणि संबंधांसाठी आवश्यक आहे, परंतु अतिरेक हानिकारक असू शकतो. खाण्यापिण्याप्रमाणेच, मीडिया डाएट देखील महत्त्वाचे आहे. तुम्हाला अस्वस्थ किंवा दु:खी करणाऱ्या गोष्टींना जीवनातून काढून टाका. वाईट बातम्या टाळा आणि सकारात्मक, शैक्षणिक किंवा प्रेरणादायी साईट्स फॉलो करा. खळबळजनक किंवा भीतीदायक बातम्याऐवजी संतुलित बातम्या ऐका. तुम्ही तुमच्या दैनंदिन विचारांवर नियंत्रण ठेवा. निसर्गाचा शोध घ्या, मित्र आणि कुटुंबाशी गप्पा मारा, स्क्रीनशिवाय इतर गोष्टींमध्ये मन रमवा, स्वयंसेवा करा. ह्या गोष्टी तुमच्या मज्जासंस्थेला डिजिटल मीडियाच्या अतिरेकांपासून आराम देतात.

दीर्घकाळ मीडियापासून दूर राहून 'डिजिटल डिटॉक्स' वापरून पाहा. दिवसातून काही तास, आठवड्यातून एक दिवस, सुट्टी असताना मीडियाचा वापर टाळा. आठवड्याच्या शेवटी किंवा सुट्टीवर, तुमचे शरीर आणि मन शांत ठेवण्यासाठी व्यायाम करा, चित्र काढा, स्वयंपाक करा, आराम करा.

### आरोग्य सुधारणा आजपासून सुरू होत आहे

मानसिक आणि शारीरिक दृष्ट्या बरे वाटण्यापूर्वी, तुम्हाला मीडियाचा ताण आणि शारीरिक आरोग्य समजून घेणे आवश्यक आहे. तुम्हाला डोकेदुखी, पोटाच्या समस्या, झोपेच्या समस्या, थकवा आहे का? मीडियाचा वापर ह्यासाठी जबाबदार असू शकतो. ताण-संबंधित मानसिक लक्षणासाठी उपचार घेतल्यास ती लवकर बरी होतात. छोट्या बदलांचे मोठे परिणाम होऊ शकतात. तुमच्या तंत्रज्ञानाच्या नात्यामध्ये रात्रीतून बदल करू नका. जेवणादरम्यान बातम्या ऐकणे बंद करा किंवा तुमचा फोन दुसऱ्या खोलीत ठेवून झोपा. समायोजन करताना, तुमच्या शरीराचे ऐका. मीडियास्ट्रेस कमी केल्याने डोकेदुखी कमी होते, झोप सुधारते आणि चैतन्य वाढते.

वर्तन बदलताना स्वत:शी दयाळूपणे वागा. आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याला प्राधान्य देणे हे कधीही स्वार्थी नसते, जरी आपल्या संस्कृतीमुळे आपल्याला असे वाटते की आपण नेहमीच जोडलेले व माहितीपूर्ण असले पाहिजे. माध्यमांच्या ताणाचे व्यवस्थापन करून जे महत्त्वाचे आहे त्यासाठी तुम्ही तिथे असू शकता. तुम्ही अधिक सतर्क, लक्ष केंद्रित आणि संवाद साधण्यास आनंदी असाल.

जर तुम्हाला दीर्घकालीन शारीरिक तक्रारी असतील, तर डॉक्टरांना भेटा. मीडिया सवयी आणि तणाव पातळी कमी करण्यासाठी चर्चा करा. डिजिटल जीवनशैलीतील बदल शारीरिक आरोग्यावर कसा परिणाम करतात ह्याची डॉक्टरांना जाणीव होत आहे व ते सल्ला देऊ शकतात. दीर्घकालीन आरोग्य आणि कल्याणासाठी वैद्यकीय परिस्थिती व जीवनशैली घटकांना समग्रपणे संबोधित करणे बहुतेकदा सर्वोत्तम कार्य करते.

**नवजीवन पावलाईन कौन्सिल सेंटर, बॅण्ड्रा**

मोबाईल : 75 07 86 60 99

●

## शोकसमाचार व इतर जाहिरातीविषयी पाळावयाची पथ्ये

'सुवार्ता' मासिकात शोकसमाचाराची माहिती दिली जाते. लांब-दूरच्या लोकांना मृत व्यक्तीविषयी व मरणोत्तर होणाऱ्या विधीविषयी माहिती मिळते. मृत व्यक्ती त्या कुटुंबाला आणि नातेवाईकांना फार मोलाची असते. त्या व्यक्तिविषयी स्मृती उजळविण्यासाठी चांगल्या शब्दांत कुटुंबातील मंडळी त्यांच्याविषयी काव्यात्मक गुंफण करून किंवा अन्य प्रकारे भावना व्यक्त करून मजकूर पाठवत असतात. आपल्या भावनांचा आम्ही आदर करतो. तथापि सारासार विचार करता व संपादक मंडळाचा अनुभव लक्षात घेता, अशा कविता किंवा मृत व्यक्तींना वाहिलेली स्तुतिसुमने 'सुवार्ता' मासिक छापू शकत नाही. त्याऐवजी आपण बायबलमधील सुवचने अंतर्भूत करावी, ही विनंती!

**- संपादक**

# एम.आर.आय.मशीन

-थॉमस ब्रिटो
व्हा. चेअरमन - कार्डिनल ग्रेशस मेमो.हॉस्पिटल, बंगली

एम.आर.आय. म्हणजे मॅग्नेटिक रिसोर्स इमेज. ही एक चाचणी आहे. ह्यामुळे डॉक्टरांना वैद्यकीय मूल्यांकन अचूक निदान आणि निरीक्षणासाठी योग्य दिशा मिळते. आपल्याकडे एम. आर.आय.ची सुविधा नसल्याकारणाने एम.आर.आय.ची गरज असलेले रुग्ण तसेच अपघात झालेल्या रुग्णांना चांगल्या दर्जाच्या एम.आर.आय.साठी मुंबईला जावे लागत असे. त्यामुळे रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना बराच त्रास होत असे. ही अडचण लक्षात घेऊन हॉस्पिटलच्या विश्वस्तांनी सहा कोटी रुपयांची एम.आर.आय.मशीन खरेदी करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला व जगप्रसिद्ध अत्याधुनिक अशी विप्रो जीई १.५ टेस्ला, १६चॅनल एम.आर.आय. स्कॅनर ही मशीन खरेदी केली. एम.आर.आय.बरोबर कार्डियाक हृदयाच्या एम. आर. आय. सुविधाही ह्या मशीनमध्ये आहेत.

ह्या मशीनचे प्रामुख्याने तीन भाग असतात. शक्तिशाली लोहचुंबक, रेडिओ लहरी व कॉम्प्युटर. लोहचुंबक रुग्णाच्या शरीराभोवती चुंबकीय आवरण तयार करतात. आपल्या शरीरातून आलेल्या रेडिओ लहरीच्या स्पंदनाने त्यांचे कॉम्प्युटरद्वारे प्रतिमेमध्ये रूपांतर होते. ह्या प्रतिमा व्हिडिओद्वारे डिस्प्लेद्वारे बघू शकतो. ह्यामध्ये आपल्या शरीराच्या सूक्ष्म भागाचीही प्रतिमा कितीतरी पटीने मोठी व स्पष्ट दिसते. अत्यंत प्रशिक्षित अशा रेडिओलॉजिस्टच्या (किरणोत्सर्गाचे शास्त्र) साहाय्याने आपल्या शरीरातील इंद्रियांचा व त्यांच्या रचनेचा तंतोतंत अभ्यास केला जातो व त्याद्वारे ह्या इंद्रियांच्या चाचणीचा अहवाल तयार केला जातो. सदर अहवाल आपण तज्ज्ञ डॉक्टरांना दाखविला की ते रुग्णास पुढील कोणते उपचार करायला पाहिजेत (ऑपरेशन किंवा इतर औषधोपचार) हे



सुचवितात. गरोदर स्त्रियांना नॉर्मल एम.आर.आय. काढणे सुरक्षित असते. परंतु कधीकधी प्रतिमा स्पष्ट दिसण्यासाठी जे औषध देतात (गॅडोलीनियम कॉन्ट्रास्ट) त्याचा गर्भाशयातील बाळावर परिणाम होऊ शकतो. अशा वेळेस डॉक्टरांचा सल्ला घेणे चांगले असते.

एम.आर.आय.ची चाचणी मेंदूला अपघातामध्ये इजा पोहोचल्यास मेंदूमधील गाठी बघण्यासाठी मेंदू व पाठीचा कणा ह्यांमध्ये काही विसंगती आढळल्यास रोगाचा संसर्ग झाल्यास, झटका आल्यास, स्मृतिभ्रंश झाल्यास, डोकेदुखीची कारणे शोधण्यासाठी, जास्त जोखीम असलेल्या स्तनाचा कॅन्सर असलेल्या स्त्रियांसाठी, पाठीचा कणा व गुडघा ह्यांच्या सांध्यामधील विकृती शोधण्यासाठी, काही प्रकारचे हृदयरोग बघण्यासाठी, यकृत, पोट व इतर इंद्रियांचे विकार शोधण्यासाठी, आपल्या शरीराच्या विविध परिस्थितीचे निदान करण्यासाठी, स्त्रियांच्या ओटीपोटावरील फायब्रॉईडमुळे होणारे दुखणे ओळखण्यासाठी केली जाते. दिवसेंदिवस जसजसे तंत्रज्ञान वाढते तसतसा एम.आर.आय. मशीनचा उपयोग व व्याप्ती वाढत आहे.

एक्स-रे, सी.टी.स्कॅन आणि पेट स्कॅनसारखी एम.आर.आय.मशीनमध्ये उत्सर्जित किरणे वापरली जात नाहीत. म्हणून ह्या कार्यपद्धतीला 'नॉन इनव्हेसीव' असे संबोधिले जाते. त्यामुळे ही चाचणी सुरक्षित असते. साईड इफेक्ट होत नाहीत.

एम. आर. आय. करण्यासाठी आपले संपूर्ण शरीर एम.आर.आय.ट्युबमध्ये जावे लागते.

एम.आर.आय.खोलीमध्ये प्रवेश करण्याअगोदर आपल्या शरीरात कोणत्याही भागामध्ये धातूचा इम्प्लांट (कृत्रिमरीत्या बसविलेला धातूचा अवयव) बसविलेला असेल तर डॉक्टरांना तशी रुग्णांनी कल्पना द्यावी. तसेच कोणत्याही प्रकारचे दागिने, कानातील वाळ्या, अंगठी, घड्याळ, चष्मा, कमरेचा पट्टा ह्या वस्तू चुकीने जरी काढायच्या राहून गेल्या तरी शक्तिशाली चुंबकाच्या आकर्षणामुळे ह्या धातूच्या वस्तू वेगाने मशीनमध्ये आकर्षिल्या जातात व त्याबरोबर रुग्णही आकर्षिला जातो व मोठा अपघात होण्याची शक्यता असते.

एम.आर.आय. व सि.टी.स्कॅनमध्ये काय फरक आहे? दोन्ही चाचण्यांमध्ये डॉक्टर आपल्या शरीराच्या निरनिराळ्या इंद्रियांची व भागांची तपासणी करू शकतात. परंतु एम. आर.आय. हे आपल्या शरीरात असामान्य पेशी आहेत का हे बघण्यासाठी केले जाते. नाजूक पेशींच्या प्रतिमा एम.आर.आय.मध्ये सविस्तर व स्पष्ट दिसतात. त्या सी.टी.स्कॅनमध्ये दिसत नाहीत. म्हणून काही वेळा डॉक्टर सी.टी.स्कॅननंतर एम.आर.आय. काढण्याचा सल्ला देतात. तसेच फाटलेल्या, दुखापत झालेल्या स्नायूंची प्रतिमा एम.आर. आय.मध्ये स्पष्ट व चांगली दिसते.

माहे डिसेंबर २०२०पासून आतापर्यंत एम.आर.आय. विभागामध्ये एकूण ९४४४रुग्णांनी चाचण्या केल्या.

**संपर्क : कार्डिनल ग्रेशस मेमो.हॉस्पिटल**

मोबाईल : 74 47 72 42 40
73 50 77 24 24 / 78 75 32 50 81

## व्ही.एम्. टूर्स अँन्ड ट्रॅव्हल्स

**आयोजक : टोनी डायस,** ओळंबवाडी–पापडी

**वेलंकनी नोव्हेना : २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६**

रू. १०,२५०/– ३ दिवस नोव्हेना, ए.सी. रूम + जेवण
रू. १३,५००/– ५ दिवस नोव्हेना, ए.सी. रूम + जेवण
रू. १८,०००/– संपूर्ण नोव्हेना, नॉन.ए.सी. रूम + जेवण
रू. २२,५००/– संपूर्ण नोव्हेना, नॉन.ए.सी. प्रवास + नॉन.ए.सी. रूम + जेवण
रू. २३,०००/– संपूर्ण नोव्हेना, ए.सी. रूम + जेवण
रू. २८,५००/– संपूर्ण नोव्हेना, ए.सी. प्रवास 3AC (वसई/मुंबई ते वेलंकनी व रिटर्न) + ए.सी. रूम + जेवण (४ शेअरींग)
रू. ३९,०००/– संपूर्ण नोव्हेना, विमान+ए.सी. रूम + जेवण

निवासव्यवस्था : हॉटेल होली सँड, मुख्य देवळाच्या समोर (एक मिनिटभराच्या अंतरावर)
*(वेलंकनी येथे घरगुती जेवण दिले जाईल. रोटी/चपाती/व्हेज/नॉनव्हेज. जेवण)*
भाविकांसाठी खुशखबर : सर्व यात्रेकरूसाठी लोअर बेसिलिका (मुख्य देवळाच्या मागे) या ठिकाणी सकाळी ८.४० वाजता मराठीमध्ये मिस्सा होते.

**सेंट ज्यूड नोव्हेना, झाँसी**
**(२४ ते ३० ऑक्टोबर २०२६)**

रू. २१,०००/– जाता–येता राजधानी 3AC + ए.सी. रूम+ जेवण+ १ दिवस– आग्रा सिटी/ताजमहाल/लाल किल्ला, १ दिवस– ग्वाल्हेर सिटी, २ दिवस– झाँसी सिटी/ किल्ला व शॉपिंग (सर्व एन्ट्री समाविष्ट) (४ जणांसाठी १ रुम)
निवासव्यवस्था : हॉटेल यात्रिक एसी डायनिंग हॉल+लिफ्ट+वायफाय
(स्पॉट प्राईजसह स्पेशल गेट टुगेदर– २७ ऑक्टो.) (पाच मिनिटे पायी अंतरावर)

**महाबळेश्वर–पाचगणी–प्रतापगड टूर** २८ मे ते १ जून २०२६

२x२ एसी बस, डिलक्स हॉटेल (मुख्य मार्केटमध्ये) • एकूण खर्च रू. १३,५००
स्थलदर्शन : प्रतापगड, स्ट्रॉबेरी गार्डन, वेण्णा लेक, मॅप्रो गार्डन, सनसेट पॉईंट, टेबलटॉप, पाचगणी
निवास : डिलक्स हॉटेल, लिफ्ट व वायफाय सुविधेसह. (४ जणांसाठी १ रुम)
*कमीत कमी नफा ठेवून जास्त लोकांना पर्यटन सुविधा देता यावी म्हणून हे दर मर्यादित ठेवले आहेत.*

**Contact : 8485890360 / 9320385977 / 9766398405 9011890360 / 9765443414 / 8766589780 / 9960107733**

## AQUA CLEAN

**Laundry & Cleaning Services**

Keep your clothes and home **fresh, clean & hygienic!**

*** Our Services :-**

- Blanket, Curtains & Daily Wear Wash and Fold.
- Premium Dry Cleaning
- Shoe Cleaning
- Sofa Cleaning
- Home Deep Cleaning.

**" Pickup & Delivery available in Vasai- Virar region "**

Call / WhatsApp : **7558664749**
Near Gass Church.

## INNOVATIVE CLASSES

Since 2011

**Std. I to Std. VII**
**ENGLISH MEDIUM SECTION**

**MARATHI & HINDI SPECIAL BATCHES**
**(S.S.C. / ICSE / CBSE Board)**
**For STD. I TO X**

**Maths (SSC Board) Special Batches**
**Std I to VII**

**Enroll yourself now!**
Contact : Lawrence Sir

Walston-Villa, House No. 209/3, Sonar Allie, Papdy, Vasai Road (W), Dist. Palghar, Pin 401 207.
**Mobile: 9545377597 / 9049264102**

## ग्लोरिया मंडप डेकोरेटर

Prima 4003 १वर्षे वापरलेली खुर्ची
रु. ३३०/- मात्र.
जुने व नवे नेट कार्पेट व ताडपत्री उपलब्ध.
मंडप डेकोरेशनमध्ये ३०% सूट.
**मुदत : १ एप्रिल ते ३० नोव्हें. २०२६**
**संपर्क : ग्लोरिया मंडप**
मुसारवाडी, गिरीज
**98 22 60 88 98**

## Ganesh academy (Estd. 1987)

## COMMERCE

**F.Y.J.C. to T.Y.B.COM**

**S.Y.J.C. Result : March 2025**


Smit Ghadge 92.33 %
1st in NES BK 99
Maths 95 Eco-97 OC 96 IT 93


Jewel Corvalho 91.17 %
1st in St. Thomas Eco-97
BK 93 Maths 92 OC 90 IT 94


Renee Rebello 91%
2nd in St. Thomas OC 95
BK 92 Maths 90 IT 95


Hritvi Chaudhari 90.33 %
3rd in NES IT 97
Maths 91 Eco-92 OC 91


Krupa G. 89.17%
Eco-96 OC 96 IT 92


Srushti N. 88.33%
Eco-92 OC 97


Harsh P. 87.83%
OC 94 IT 92


Risa C. 87.33%
Maths 93 OC 97



Zeah G. 85.5%
OC 97 SP 94

**Admissions in progress for SYJC (Std 12th) for 2026-27**

**Contact : Milind Mhatre**
**9822683850 / 9850076252 / 9011209235**
**Head Office :** First Floor, Vasai Tower, Opp. S. T. Depot, Parnaka, Vasai Gaon.

प्रासंगिक

# युद्ध नको; शांती हवी



**-रॉबर्ट लोबो**
नंदाखाल

आपण हा लेख वाचत असाल तेव्हा कदाचित अमेरिका आणि इराकमधील युद्ध थांबले असेल अशी अपेक्षा!

१९८०मध्ये इराण आणि इराक युद्धाच्या काळात टांझानियाच्या अध्यक्षांनी युद्ध पार्श्वभूमीवर एक आफ्रिकन म्हण उद्धृत केली होती.

''दोन हत्ती भांडतात तेव्हा नाश धरतीवरच्या गवताचा होत असतो.'' हाच संदर्भ घेऊन हिंदीतील प्रसिद्ध कवी उदय प्रकाश ह्यांनी १९८४मध्ये पुढील कविता लिहिली होती :-

*''दो हाथियों का लड़ना सिर्फ दो हाथियोंके समुदायसे संबंध नही रखता।*
*दो हाथियों की लढाईमें सबसे ज्यादा कुचली जाती है घास,जिसका हाथीयोंके समुचे कुनबेसे कुछ भी लेना-देना नही ।*
*जंगलसे भूकी लौट जाती है गाय*
*और भुखा सो जाता है घरमें बच्चा ।*
*चार दातों और आठ पैरोंद्वारा सबसे*
*ज्यादा घायाल होती है बच्चेकी नींद,*
*सबसे अधिक असुरक्षित होता है,*
*हमारा भविष्य ।*
*दो हाथियों के लढाईमे सबसे ज्यादा*
*टूटते है पेड, सबसे ज्यादा मरती है चिडिया, जिनका हाथियों के पुरे*
*कबीलेसे कुछ भी लेना-देना नही ।*
*दो हाथियोंकी लढाईको हाथियोसे*
*ज्यादा सहता है जंगल ।*
*और इस लढ़ाईमे जितने घाव बनते है*
*हाथियोके उन्मत शरीरोपर,*
*उससे कही ज्यादा गहरे घाव बनते है*
*जंगल और समय की छाती पर ।*
*जैसे भी हो दो हाथियों को लढ़नेसे रोखना चाहिए।''*

('अबूतर कबूतर' कवितासंग्रह)

एकंदरीत काय? दोन लढणाऱ्या उन्नत हत्तींशी काहीही संबंध नसलेल्या जंगलातील गवत, सरपटणारे जीवजंतू, झाडे, घरट्यातील पक्षी, मुले, माणसे ह्यांच्या जगण्यावर युद्धाचा किती विपरित परिणाम होतो हे सांगणाऱ्या सुमारे ४० वर्षे अगोदर लिहिलेल्या ह्या कवितेचा वर्तमानाशी किती जवळचा संबंध आहे बघा!

युद्ध सुरू करणे सोपे असते; पण ते थांबवणे कठीण असते. रशियन-युक्रेन युद्धाला तब्बल चार वर्षे झाली तरी ते थांबायची चिन्हे दिसत नाही. लाखो लोक बेघर झाली. तेवढीच अनाथ आणि तेवढ्यात अमेरिका आणि इस्त्राएलने २८ फेब्रुवारीला इराणवर हल्ला केला आणि सारे जग अशांत झाले. युद्धाच्या पहिल्याच दिवशी इराणच्या मिनाब शहरातील १६८ शाळकरी मुली शिकत असलेल्या शाळेवर बॉम्ब हल्ला झाला.

**युद्ध सुरू करणे सोपे असते; पण ते थांबवणे कठीण असते.**

हजारो प्रवासी पर्यटक अडकून पडले. परदेशी शिक्षण घेत असलेल्या मुलांमध्ये आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. कित्येकांच्या डोक्यावरील छप्पर कायमचे उडून गेले. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीत वाहतुकीला अटकाव केल्यामुळे भारतासह अनेक देशांची जहाजे अडकून पडली. युद्ध लवकर न संपल्यास अभूतपूर्व टंचाई निर्माण होईल आणि महागाई गगनाला भिडेल. अलीकडे समाज माध्यमावर युद्धाची एक व्याख्या आली होती. ती वाचल्यास युद्धातील फोलपणा आपल्या डोळ्यांसमोर येईल.

"War is a place where young people who don't know each other and don't hate each other kill each other by the decision of old people who know each other and hate each other but don't kill each other."

दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. जेणेकरून भविष्यात युद्ध होऊ नयेत; पण आज संयुक्त राष्ट्र संघटना प्रभावहीन झाली आहे. जगाला युद्धाची गरज नसून शांततेची गरज आहे.

**मायकल वाझ, दारसेंग, गोम्स आळी मो. : 9209803602**

**१) मे महिन्यातील वेलंकनी मातेचा नोव्हेना** :दिनांक ६ मे ते १५ मे २०२६. प्रवास - ३ए.सी. - वसई ते चेन्नई-नागापट्टीनम. वास्तव्य डिलक्स ए.सी.रूम, प्रमुख चर्चच्यासमोर, व्हेज - नॉनव्हेज बुफे घरगुती जेवण. एकूण खर्च प्रत्येकी रु. १८,५००/- (तीन जणांस एक रूम).

**२) संपूर्ण केरळ दर्शन सहल** :दिनांक १७ मे ते २७ मे २०२६. प्रवास - जाता-येताना ३ए.सी., वास्तव्य ए.सी. स्टार हॉटेल, ए.सी. पुश बॅक बसने स्थळदर्शन, कोचीन-मुन्नार-टेकडी-ॲलप्पी, हाऊस बोट स्टे, त्रिवेंद्रम, कन्याकुमारी सहल. एकूण खर्च प्रत्येकी रु. ३८,०००/- मात्र

**३) दुधनी मातेच्या सणानिमित्त दुधनी-खानवेल सहल :** शनिवार दिनांक ३० मे ते रविवार दिनांक ३१ मे २०२६. वास्तव्य - ए.सी. हॉटेल, ए.सी. पुश बॅक बसने, साईटसीन व गेट-टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. ४,८००/-.

**४) महाबळेश्वर-पांचगणी-प्रतापगड सहल :** गुरुवार दिनांक ४ जून ते रविवार दिनांक ७ जून २०२६. दिवसा प्रवास, डिलक्स ए.सी. हॉटेल, ए.सी.पुश बॅक बस. सर्व साईटसीन, जेवण व गेट टुगेदर पार्टीसह एकूण खर्च प्रत्येकी रु. १२,५००/-.

**देश व विदेशात स्वतंत्र ग्रुप, चर्च, स्कूल, कॉलेज ग्रुप तसेच ज्येष्ठ नागरीकांच्या सहली आणि वेगवेगळ्या हनिमुन पॅकेजेससाठी संपर्क करा. लग्न, कुमसार, बर्थडे पार्टीच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.**

**संपर्क :** प्रितम आल्मेडा, भुईगाव : 9271938211
क्लिफर्ड वाझ, गोम्सआळी : 8149208027
ॲलीयन डाबरे, मांडलय : 9987336830
शिला डिसोजा, रमेदी : 9049248799

# आमचा उपवासकाळ

**-आशा / उषा कुबेर**, गास

आमच्या लहानपणी आम्हांला ओढ असायची ती म्हणजे उपवासकाळात प्रत्येक रविवारी पासाच्या भक्तीला जायची. पवित्र मिस्सा आणि पासाची भक्ती झाल्यानंतर देवळाच्या बाहेर बसलेल्या फेरीवाल्याजवळ आम्हां मुलांची झुंबड उडायची. पूर्ण मिस्सा होईपर्यंत आम्हांला खाऊ मिळेल की नाही? हे संपेल का? ह्या विचारात आम्ही असायचो. फेरीवाल्याकडे सरबत, बर्फाचे गोळे, लिमटेडच्या गोळ्या, ऊसाचे कांडे, आयस्क्रुट, नाना प्रकारची कुल्फी अशा अनेक पदार्थांवर आम्ही सर्व मुले तुटून पडायचो. खाऊसाठी पुरतील इतके पैसे आठवड्यात जमा करायचो. ५ पैसे, १० पैसे, २० पैसे... आईने कधी २५ पैसे दिले तर ते न घेता १० पैसेच मागायचो. कारण त्या काळी १० पैशाचा आकार हा २५ पैशापेक्षा मोठा होता. त्यामुळे १० पैसे हे मोठे वाटायचे. ही वेडी समज होती.

उपवासकाळातील 'शुभ शुक्रवार' हा दिवस उगवायचा. ह्या दिवशी दिवसभर ऊन पडत नसे. सर्वत्र ढगाळ वातावरण असायचे. मरिया मातेबरोबर दिवसही रडायचा. सर्वत्र दु:खाचे वातावरण असायचे. गावात भयाण शांतता. सर्व दुकाने बंद. वाहतूक बंद. शेतीची कामे बंद. रस्त्यावर शुकशुकाट असायचा. मुलांचा आवाज नाही की गोंगाट नाही. घरातील बाई कपडे धुताना कपडे दगडावर आपटत नसे. सुतार हातोडीने कुठलेही काम करत नसे. येशूच्या दु:खाचे प्रतीक म्हणून घाव बसेल अशी कुठलीही कामे त्या दिवशी करीत नसत.

आपले वाडवडील खूप धार्मिक असल्याने शुभशुक्रवारी आजारी माणसे सोडून सर्व भाविक ह्या पवित्र भक्तीसाठी घरून दुपारी २.३० वाजता देवळात जायला निघायचे. देवळाच्या आवारात भाविकांची तुफान गर्दी व्हायची. बरोबर दुपारी तीन वाजता भक्तीला सुरुवात व्हायची. पुरुष मंडळी डोक्यावर टोपी न घालता येत असत. आपल्या मातांच्या डोक्यावरून ते पायापर्यंत मोठ्या रुमालाची घडी (मात) बांधायचे. चर्चमध्ये धर्मगुरू डोक्यावर काळा कपडा आणि अंगावर काळा झगा परिधान करायचे. सर्वजण कडक उपवास करायचे. खरोखर प्रभू येशूचे कालवारी डोंगरावरचे दु:खसहन आम्ही प्रत्यक्षात अनुभवायचो. सर्वजण एक चित्ताने ह्या पवित्र विधीत तल्लीन व्हायचे. आजही ह्या विधीवेळी आमच्या डोळ्यांसमोर त्यावेळचे ते दृश्य उभे राहते आणि नकळत आमच्या डोळ्यांतून अश्रू ओघळतात.

सर्व विधी शांततेत पार पडून जड पावलांनी जो तो घरी जात. त्या रात्री कोणी धड जेवतही नव्हते. दोन दिवस मरिया मातेबरोबर प्रार्थनेत घालवायचे आणि मग शनिवारी रात्री ईस्टर सणाची मिस्सा बारा वाजता साजरी व्हायची. प्रभूच्या जिवंत होण्याचा प्रकाश सगळीकडे पसरायचा आणि मग रविवारी सणाच्या दिवशी प्रत्येक घरोघरी बकरीचे मटण आणि तांदळाच्या पिठाचे सानने हे पदार्थ जेवणात हमखास असायचेच.

असा हा उपवासकाळ खरोखरच अर्थपूर्ण होता.

मोबाईल : 83 90 06 45 59 ●


## FRIENDS TOURS & TRAVELS

**मार्शल कोरिया**

**9673995052 / 9172280450 / 9764006052**

***२०२६ च्या आमच्या आगामी सहली ***

**१) सिमला-कुलू-मनाली, चंदिगड, अमृतसर सहल :** दि.२ ते १२ मे, एकूण खर्च रु. ४२,५००/-. (रेल्वे तिकीटसहीत. राजधानी ३ टायर एसी.)

**२) कोलकत्ता, दार्जिलिंग, गँगटोक, पेलिंग, सहल :** दिनांक १२ मे २३ मे. एकूण खर्च रु. ४१,०००/-. (रेल्वे किंवा विमान प्रवास खर्च अतिरिक्त.)

**३) बँगलोर, म्हैसूर, उटी, कुर्ग, वायनाड सहल :** दि. १४ ते २४ मे २०२६. एकूण खर्च रु. ३६,५००/ मात्र. (रेल्वे प्रवाससहित ३ टायर एसी.)

**४) दुधनी मातेच्या सणासाठी दुधनी - खानवेल सहल :** दिनांक ३० ते ३१ मे २०२६. रु. ५,५००/- (४ जणांस एक रूम).

**५) महाबळेश्वर, पाचगणी, प्रतापगड सहल :-** दिनांक २७ ते ३० मे २०२६, ३० मे ते २ जून व २ जून ते ५ जून २०२६. एकूण खर्च रु. १३,०००/- (४ जणांस एक रूम).

**६) मालवण, गोवा सहल** :- दिनांक ५ मे ते १० मे २०२६. एसी लक्झरी २×२ बस, निवास व्यवस्था. ४ जणांसाठी शेअरिग रूम. सहल खर्च रु. १७,०००/-.

*** वसईतील टुर्स क्षेत्रातील एक विश्वासपात्र नाव**

**-: अधिक माहितीसाठी संपर्क :-**

विकी घोन्सालवीस, मर्सेस : 9923213752
पिटर परेरा, भुईगाव : 9423908663
सुभाष नाईक, गास : 7559365923
लॉसन कोरिया, आगाशी : 8698710284
आल्बिनो घोन्सालवीस, राणेभाट : 9637504445

२० वर्षांपेक्षा जास्त अनुभव

ELECTRO SOLAR & SECURITY SYSTEM

- Per Day per KW **8 units** power generation
- World's Latest Technology Panels
- Zero Maintenance Batteries
- Use all electrical appliances without MSEB connection




**सौर ऊर्जा देईल आपल्याला वाढत्या वीज बिलापासून मुक्ती**

- सर्व प्रकारच्या सोलार यंत्रणा रिपेअर.. अपग्रेडेशन.. AMC ची सर्व्हिस उपलब्ध
- इन्व्हर्टर रिपेरिंग.... बॅटरी Regeneration सेवा उपलब्ध
- इन्व्हर्टर / बॅटरी सिस्टम भाड्याने उपलब्ध




**Lifetime Service Warranty**

**सर्व प्रकारची सोलार उत्पादने :**

- HDT क्वालिटी पॅनल्स -३५ वर्षांचे आयुर्मान
- इन्व्हर्टर - ५ वर्षांची वॉरंटी
- बॅटरीस - ५ -१० वर्षांची वॉरंटी
- चार्ज कंट्रोलर - ५ वर्षांची वॉरंटी
- एसी – 80% कमी वीज वापर
- इलेक्ट्रीक कुकवेअर
- इलेक्ट्रीक शेगडी
- सोलार वाटर पंप
- सोलार स्ट्रीट लाईट
- पवनचक्की
- BLDC फॅन

अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा!!

**ELECTRO SOLAR & SECURITY SYSTEM**

Shir Kuber Co-op Hsg, shop No 5, Papdy Bangli Rd, Brahman Ali
Dist: Palghar, Vasai (W), Pin: 401207
Website: www.electrosolar.in
Email: electronunes@yahoo.com;
Mob: 9022098008 / 9890298008
Office – MONDAY TO SUNDAY
Time : 9:30am to 6:00pm

# सि. ल्युसी डिसोजा : पापुआ न्यू गिनीत राष्ट्रीय योगदान

- डॉमिनिका डाबरे
गिरीज

सिस्टर ल्युसी ह्यांचा जन्म १४ डिसेंबर १९६३ रोजी नांदवनवाडी, गिरीज येथे एका ख्रिस्ती कुटुंबात झाला. 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात' ह्या उक्तीप्रमाणे लहानपणापासूनच सिस्टरांचा मनमिळाऊ, धार्मिक स्वभाव, गरिबांविषयी कणव, चेहऱ्यावर स्मितहास्य! वागण्या-बोलण्यावरून 'ल्युसी सिस्टर व्हायला जाणार' असे अनेक जण बोलायचे. शाळा-कॉलेजातील शिक्षण चालू असताना चर्चसंलग्न लिजन ऑफ मेरी, गायन मंडळ, संडेस्कूल शिक्षिका, पवित्र आत्म्याठायी नवजीवन प्रार्थनासंघ, विन्सेंट डी पॉल सोसायटी, युवा चळवळ अशा संघटनांत त्या सक्रिय होत्या.

वसई पातळीवरील 'युवदर्शन' ह्या संघटनेतील त्यांचा सहभाग वाखाणण्याजोगा होता. फा. हिलरी फर्नांडीसलिखित 'अंधारातून प्रकाशाकडे' ह्या येशू ख्रिस्ताच्या जीवनावरील नृत्यनाट्याच्या महाराष्ट्रभर झालेल्या ३३ प्रयोगात सि.ल्युसी ह्यांचा सहभाग होता. ख्रिस्ताची सुवार्ता जनतेपर्यंत पोहच-विण्यासाठी गावोगावी झालेल्या कीर्तनात तसेच जीवन ज्योती संघटनेमार्फत झालेल्या प्रशिक्षणात त्यांचा सहभाग होता.

कॅथलिक श्रद्धेत वाढत असतानाच सि. ल्युसीचे आध्यात्मिक सल्लागार फा. जोएल डिकुना, फा. ग्रेग परेरा व फा. बार्थोल मच्याडो ह्यांनी वर्सोवा येथे आयोजित केलेल्या नेतृत्व शिबिरात प्रभूच्या हाकेला प्रतिसाद देण्यासाठी शिक्कामोर्तब केला. कलाशाखेची पदवी पूर्ण केल्यानंतर २२ ऑगस्ट १९८६ रोजी त्यांनी 'मिशनरी सिस्टर्स ऑफ इम्यॅक्युलेट' ह्या संस्थेत प्रवेश केला.

१६ जुलै १९९० रोजी विजयवाडा येथे त्यांनी प्रथम व्रत घेतले. ९ जून १९९६ रोजी गिरीज चर्चमध्ये त्यांनी अंतिम व्रत स्वीकारले. MSI-PIME व्रतस्थ सिस्टरांच्या हैद्राबाद प्रांतातील खम्मम, गाजियाबाद, गोवा कॉन्व्हेंटमध्ये



त्यांनी कार्य केले. आंध्रप्रदेशातील विजयवाडा येथून त्यांनी MSWकरून विशेषत: समाजकार्याच्या माध्यमातून सुवार्तेचा प्रसार करत विविधांगी सेवा बजावली.

२० एप्रिल २००१ रोजी त्या त्यांच्या मिशन भूमीत, पापुआ न्यू गिनी येथे पोहोचल्या. सुरुवातीच्या कालावधीनंतर त्यांची वानिमो येथे नियुक्ती झाली. २००८ ते २०११ ह्या काळात त्यांनी पापुआ न्यू गिनीच्या रिजनल सुपिरिअर म्हणून तसेच डायोसिझन फॅमिली लाईफ अपोस्टोलेटच्या सचिव म्हणून सेवा सुरू केली. विशेषत:, गरीब आणि असुरक्षित कुटुंबांच्या सेवेकडे त्यांचे विशेष लक्ष होते.

फेब्रुवारी २०११मध्ये त्यांची 'एम. एस.आय.पी.एन.जी. डेलिगेशनच्या प्रशासक' म्हणून नियुक्ती झाली. ही जबाबदारी त्यांनी समर्थपणे पार पाडली. त्याचबरोबर तेथील पापुआ न्यू गिनीच्या मुलींच्या वसतिगृहाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली. मातेसमान प्रेम, स्थानिक संस्कृतीचा आदर आणि प्रसन्नचित्ताने त्यांनी अनेक तरुणींचे जीवन घडवले.

१ मे २०२० रोजी त्यांनी **पापुआ न्यू गिनी व सॉलोमन बेटे ह्या कॅथलिक बिशप्स परिषदेमध्ये राष्ट्रीय कुटुंब आयोगाच्या संचालिका** म्हणून जबाबदारी स्वीकारली. त्या हे कार्य पूर्ण निष्ठेने व आवडीने शेवटच्या श्वासापर्यंत करीत राहिल्या. लोकांच्या हक्कांसाठी उभे राहून त्यांनी अनेक आव्हानांना धैर्याने तोंड दिले. त्या देशातील धर्मप्रांतीय कुटुंब जीवनावर एक संयोजक म्हणून संपूर्ण देशभर प्रशिक्षण देत. परिषदेतील कुटुंब जीवनाच्या विकासावर त्यांनी विशेष भर दिला. त्यांचा आनंदी, मनमिळावू स्वभाव आणि निरागस हास्य सर्वांना आपलेसे वाटत असे. गायनाची त्यांना विशेष आवड होती.

२४ जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या पायाला दुखापत झाली आणि संसर्ग झाला. रुग्णालयात औषधोपचार करण्यात आले. परंतु प्रकृतीत सुधारणा झाली नाही. ४ फेब्रुवारी रोजी त्यांना पोर्ट मोरेस्बी येथील पॅसिफिक इंटरनॅशनल ह्या अद्ययावत हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले; परंतु त्यांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली नाही.

१ मार्च २०२६ सकाळी त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला व भारतीय वेळेनुसार पहाटे ३.००वाजता त्यांनी ह्या जगाचा निरोप घेतला. गुरुवारी ५ मार्च रोजी त्यांच्यासाठी पवित्र मिस्सा पोर्ट मोरेस्बी येथील संत जोसेफ चर्चमध्ये, तेथील बिशप्स परिषदेचे अध्यक्ष बिशप ऑत्तो सेपारी ह्यांच्यासह इतर बिशप्स, धर्मगुरू, धर्मभगिनी व भाविकांच्या उपस्थितीत पार पडले. त्यानंतर शुक्रवारी ६ मार्च रोजी दुपारी ३.३० वाजता अलोटाउ येथील कथिड्रलमध्ये बिशप जासेक तेंदेज ह्यांनी अंत्यविधीची मिस्सा अर्पण केली व सायंकाळी ५.००वाजता त्यांच्या अलोटाउ कॉन्व्हेंटच्या परिसरातील दफनभूमीत अंत्यसंस्कार पार पडला त्यावेळी त्यांचा चुलत भाऊ डॉमनिक डिसोजा उपस्थित होता.

बिशप थॉमस डिसोजा ह्यांनी ४ मार्च रोजी संत झेविअर चर्च, गिरीज येथे त्यांच्या स्मरणार्थ मिस्सा अर्पण केली. त्यावेळी बिशपांच्या परिषदेतर्फे तेथील कार्डिनल व बिशपांनी पाठविलेल्या संदेशांचे वाचन फा. (डॉ.) जोएल डिकुना ह्यांनी केले.

सि. ल्युसी, तुमच्या आत्म्याला शांती लाभो. ●


EDUGUIDE
Your Trusted Guide For International Success
FREE IELTS Coaching
WE OFFER UP TO
100%
SCHOLARSHIP
The registration fee will be fully refunded if no scholarship is awarded.
COUNTRIES OFFERED
Germany
UK
Canada
New Zealand
Italy
USA
Australia
Many more...
SERVICES OFFERED
• IELTS Coaching
• Education Loan
• Uni. Admissions
• Uni. Shortlisting
• Counseling
• Forex
• Accommodation
• Visa Assistance
Scan to get free counseling.
+91 8530849111/222/333
www.eduguide.co
info@eduguide.co
3rd Floor, Eva Apartment CHS., Vartak School Road, Platform No. 1, Anand Nagar, Vasai West, Maharashtra 401202

स्मरण

# फादर हिलरी फर्नांडीस : एक अगम्य माणूस

-जो.मा.पिठेकर, एस.जे.



मी फादर हिलरी ह्यांना १९७० पासून ओळखतो. तरी तो माणूस काही अंशी अनोळखीच राहिला. मी २०२६ जानेवारीच्या २,३ तारखेला उत्तनला त्यांच्या सहवासात दोन दिवस काढले. त्या दोन दिवसांत मला जो माझा मित्र हिलरी कळला तो गाभ्यातला हिलरी होता. तसे माझे आकलन मी त्यांच्यापुढे मांडले आणि तीन दिवसांसाठी पुन्हा भेटायचे असे ठरले. पण ते दिवस उगवले नाहीत.

रात्रंदिवस ते काम करत. ते एकदा मला म्हणाले होते की, मी झोपताना टी. व्ही. लाईट ऑन ठेवतो. ते काळोखाला घाबरायचे असे नाही; तर ते रात्रीचा दिवस करायचे. त्यांना रात्र मान्य नव्हती. ते नाईलाज म्हणून पहाटे पहाटे ३-४ तास झोपायचे. म्हणजे डिप्रेशन (हताशपणा) त्यांनी ओढवून घेतला होता का? मला हो असेच म्हणावे लागेल.

कोणताही माणूस जीवनापेक्षा मोठा नाही. जीवनापुढे आपल्याला नमावेच लागते किंवा जीवनाशी आपल्याला समरस व्हावेच लागते. जीवनाच्या घटनांमध्ये आपल्याला शिरावेच लागते. आपण वाकलो नाही; तर आपण मोडतो, शरीराने आणि मनाने. तसे काही फादर हिलरीचे झाले काय?

फादर हिलरी ह्यांची सर्जनशीलता त्यांच्या मित्रांच्या आणि सहकाऱ्यांच्या आवाक्याबाहेरची होती. मी अनेक वेळा त्यांना समजण्याचा प्रयत्न केला. पण मी असमर्थ ठरलो. त्यांनी 'गीत बायबल' लिहिण्याचा मानस सहज बोलून दाखवला, तेव्हा मी त्यांना उत्स्फूर्तपणे म्हणालो, आपले वय झाले आहे. त्यावेळी ते वयाच्या ८४च्या आसपास होते. ते सहज म्हणाले, ''वेळ लागेल पण मला ते सहज जमेल. बायबल वाचता वाचता मला काव्य स्फुरते...'' आणि त्यांनी ते महाकाव्य पूर्ण केले. लिखाण हा त्यांचा प्राण झाला होता.

वयाप्रमाणे शरीरावर काही मर्यादा येतात. आपले मन कधी म्हातारे होत नाही; मेंदू वाढायचा थांबतो. पण मौनामध्ये माणसाच्या मेंदूची झीज होत नाही; तर त्याचा आकार वाढू शकतो. हे आज शास्त्रीय दृष्ट्या सिद्ध झाले आहे. पण त्यासाठी निर्विचार व निर्विकार अशा प्रकारच्या मौनात जाण्याची अति आवश्यकता आहे. अशी प्रार्थना रोज १५-२०मिनिटे करणे आवश्यक आहे. आपला मुद्दा वयानुसार शरीरावर येणाऱ्या मर्यादेविषयी आहे.

वरील वस्तुस्थिती आपण मान्य केली नाही; तर आपण जणू काय फाटतो. आपल्या व्यक्तीला तडा जातात. आपण दुभंगतो! दुभंगलेल्या परिस्थितीत वस्तु-स्थिती मान्य करणे आणि तिला तोंड देणे अशक्य होते. आपण आपलेच जग निर्माण करतो. इतरांबरोबर संतुलित व्यवहार करणे माणसाला जमत नाही.

फादर हिलरी ह्यांचे जग आभासी नव्हते. ते जग वस्तुनिष्ठ होते. मग त्यांची जगाची समीकरणे अर्धवट होती असेही मला म्हणता येणार नाही. तरीपण काही समीकरणांचा त्यांनी पूर्ण स्वीकार केला नाही असे म्हणावे लागेल. हरित वसईच्या आंदोलनाबद्दल असे म्हणता येईल. कारण त्या दरम्यान मी वसईला शनिवार-रविवारी येत असे. माझे वास्तव्य अंधेरीला 'विनयालय' ह्या संस्थेत होते. मीही तरुण व बंडखोर धर्मगुरू होतो. म्हणून मला त्यांचा विरोध समजू शकला नाही. माणसाचे वैयक्तिक स्वातंत्र्य त्यांना मान्य होते. ते सर्व प्रकारच्या दडपणाविरुद्ध होते. वसईची हानी त्यांना जाणवत होती. तरीही त्यांनी ह्या योग्य व नैतिक आंदोलनाला विरोध का करावा हे न उकलणारे कोडेच होते?

**फा. हिलरी ह्यांचे जग आभासी नव्हते. ते जग वस्तुनिष्ठ होते.**

त्यांचे एक समीकरण निसर्ग नियमाविरुद्ध होते. त्यांना रात्र नकोच होती. काळोखात असंख्य निर्मिती होत राहते. ती सर्व निर्मिती माणसाच्या आकलना-पलीकडची आहे. माणूस उजेडातच निर्माण करू शकतो.

फादर हिलरी सतत कार्यमग्न असत. जणू त्यांच्या निर्मितीला अंतच नव्हता. त्यांच्या जीवनाबद्दल ते काही अंशी नाराज दिसले. म्हणून मी म्हणालो, तुम्ही आपल्या निर्मितीबद्दल नुसते देवाचे आभार मानले तरी तुम्हाला दिवस पुरणार नाही. कृतज्ञता मान्य नव्हती असे नाही. ह्या भावनेचा त्यांनी निराळा अर्थ लावला होता. तो अर्थ म्हणजे काहीतरी लिहीत राहणे. पण शरीराच्या मर्यादेपलीकडे आपल्याला जाता येत नाही. काही अशक्य नाही हा मंत्र म्हातारपणी जपता येत नाही. मर्त्य माणसाला कधीतरी शरण जावेच लागते; पण उच्च शक्तीला, देवाला शरण जाण्यात मोठेपणा आहे. शरण जाण्यात माणूस आपली असहाय्यता मान्य करतो. ती मान्य करण्यात एक शहाणपण आहे. नम्रता आहे. पारदर्शकता आहे. मनाचा प्रांजळपणा आहे. ह्या सर्व गुणात आपल्याला देवाचे, सर्वेश्वराचे दर्शन घडते. हीच खरी आध्यात्मिकता!

फादर हिलरी अज्ञेयवादी होते का? मला तसे वाटत नाही. त्यांनी सापडलेल्या परमेश्वराचा ध्यास घेतला होता. आपल्या लिखाणातून देव अवतरतो, इतरांपर्यंत पोहचतो, हे उघडपणे मान्य करायला ते विसरले का? तसे मानायला जागाच नव्हती. ते मरणाला का घाबरायचे ह्याचे उत्तर मला बोलता बोलता मिळाले. निर्मिती न करणे म्हणजे मरण! झाडे म्हातारपणी फळे देत नाहीत. स्त्री-पुरुष ठरावीक वयानंतर बाळाला जन्माला घालू शकत नाहीत. प्रत्येक स्त्री-पुरुषाला अनेक स्थित्यंतरातून जावे लागते. म्हणजे बालपणातील मनाला व शरीराला मरावे लागते तेव्हाच आपण प्रौढ होऊ शकतो. तसे झाले नाही; तर आपण शरीराने व मनाने खुंटतो. म्हणून फादर हिलरी हे 'गीतबायबल'नंतर खुंटले का? त्यांनी 'गीतबायबल'चा प्रकाशन सोहळा साजरा केला नाही!

जाता-जाता मला एवढेच म्हणावे लागेल, फादर हिलरीविषयी माझ्या मनात विस्मय आणि आदर कायम राहील. त्यांच्या लिखाणावर कोणीतरी पीएच.डीसाठी प्रबंध लिहील; पण तो माणूस एक अगम्य कोडेच राहील. ह्या भावनेला शेवट नाहीच नाही!

मोबाईल : 77 56 93 54 57 •

# ''तुझे उपकार मी कसे फेडू''- फा. हिलरी

- मारिया जोजप बॅप्टीस्टा
मुक्तिसागर केंद्र कर्मचारी, उत्तन

सर्वप्रथम मी देवाचे आभार मानते. एवढ्या महान व प्रसिद्ध फादरांची सेवा करण्याचे भाग्य मला लाभले. फा. हिलरी हे सच्चे व समाधानी असे फादर होऊन गेले. आध्यात्मिक कार्य हे त्यांचे धोरण होते. लोकांना एकत्र आणणे, समितीच्या साहाय्याने चर्चची कामे करणे, सर्वांना विश्वासात घेऊन बांधकाम करणे हा त्यांचा हेतू असायचा. कोर व सुकाणू समिती ही त्यांनी प्रत्येक पॅरीशमध्ये तयार केलेली एक ढाल होती. त्यानुसार ते कामे करीत असत. त्यांना साथ देणारे, त्यांच्या घरची मंडळी व मित्रपरिवार ह्यांच्या साहाय्याने त्यांनी 'गीत बायबल'ची छपाई केली. 'जबतक चर्च के कार्य मे मराठी रहेगा तब तक, फा. हिलरी का नाम रहेगा'' असे कार्डिनल ग्रेशस म्हणाले होते.

भाटेबंदरला असताना फा. हिलरी ह्यांच्याविषयी लोक म्हणत, ''आमची मुले सुट्टीत खूप मस्ती करतात, बंदरावर जातात, वाया गेली आहेत; पण फा. हिलरी ह्यांच्यामुळे ती रोज देवळात जातात व मिस्सात भाग घेतात, वेदीसेवकांचा वेदीवर घोळका असतो, फा. हिलरी ह्यांना भाटेबंदरलाच राहू द्या.''

फा. हिलरी जिवंत असताना जीवनाला एक वळण, अर्थ होता. ते शांत, कुणावर राग न करणारे, कोणाविषयी मनात द्वेष न बाळगणारे असे होते. त्यांना लहान मुले खूप आवडायची, कोणी कधीही आपले गाऱ्हाणे किंवा दु:ख सांगत असतील तर ते प्रेमाने ऐकत.

फादरांकडे मी कुणाविषयी तक्रार केली तरी त्यांना काही फरक पडत नसे. चांगल्या श्रीमंत घरातले असून साधी राहणी ते जगत असत. मुक्तिसागरच्या खोलीत ते राहत होते. सतत लेख लिहिणे किंवा व्हिडिओमार्फत वैज्ञानिक ज्ञान घेत असत. कधी कोणी त्यांना दुखावले किंवा अपमान केला तरी त्या व्यक्तीशी ते प्रेमाने वागत. कोणी कितीही आपल्याबरोबर वाईट वागले तरीही ते जणू काही घडलेच नाही असे वागायचे.

त्यांना एकांत आवडत असे. ते विचारवंत व ज्ञानी होते. बुद्धिमत्ता ही त्यांना बालपणापासून लाभलेली देवाची देणगी होती. त्यांना वाचनाची आवड होती. ते तासन्‌तास वाचन करत, शब्द नि शब्द वाचून आनंदित होत असत. एकटेच गुणगुणत, गीत लिहून चाल लावणे, गीत गाणे, भजन गाणे त्यांना आवडे. नाटक लिहिणे, नाटकातील प्रत्येक पात्रे शब्दांनी जिवंत करणे हा त्यांचा छंद होता. लोकांना वाटे की ते खोलीत आहेत; पण ते आपल्या लेखनाचा किंवा गाण्यांचा सराव करत. त्यांचे सुप्रसिद्ध संगीत नाटक 'अंधारातून प्रकाशाकडे' ४० प्रयोगांपलीकडे सादर झाले. त्यांचा ठाम निश्चय होता, 'मरेन तर इथेच' कोणाला त्रास न देता.

अर्थात, ते मिस्सा करत तेव्हा मिस्साग्रंथातून शब्द नि शब्द वाचून मिस्सा करत. त्यांचे एकच ध्येय असे, फादरांनी ओव्हर कॉन्फीडंट होऊ नये, बायबलमध्ये जे शब्द लिहिले आहेत, त्याप्रमाणे वाचावे.

वसईतून बिशप, फादर्स, महिला संघ, विधवा संघ, वृद्ध संघ, त्यांनी घडविलेला तरुण वर्ग, स्त्रियांची सोड्यालिटी त्यांना भेटण्यास येत. त्यांच्याशी ते वसईच्या जुन्या गोष्टी, आठवणी ताज्या करत.

मी स्वातंत्र्यवीर बॅरिस्टर काका जोजप बॅप्टीस्टा ह्यांच्या पाचव्या पिढीतील. १४ वर्षे मी, फा. हिलरी ह्यांच्याबरोबर कार्य करीत होते. ८ वर्षे मी त्यांच्या आजारावेळी सेवेत घालवली. १८ डिसें. ते २५ डिसें. २०२५ ते होली फॅमिली हॉस्पिटलमध्ये चेकअपसाठी ॲडमिट होते. अगदी २५ डिसेंबरला फा. हिलरी, फा. कॅलिस्टस व मी मुक्तिसागरमध्ये उत्तनला पोहोचलो. नंतर मी घरी जाताना त्यांचे शब्द माझ्या कानी पडले ते म्हणजे ''तुझे उपकार मी कसे फेडू'' मी म्हणाले, ''माझे भाग्य की मी तुमच्याबरोबर आहे. देवाने माझ्यावर खूप मोठे उपकार केले आहेत, तुमची सेवा करण्याचे भाग्य मला मिळाले.'' तेव्हा ते बोलले, ''बरोबर! देवाने प्रोव्हिजन आधीच केले होते की मी तुला मुक्तिसागरला नोकरी द्यावी व शेवटी तू माझ्याबरोबर १४ वर्षे नोकरी करून ८ वर्षे माझी सेवा करावी. शेवटी देवाची इच्छा, माणसाचे काही चालत नाही, देवाचे माझ्यावर खूप प्रेम होते, हे तुझ्यामार्फत मला साफ दिसून येते. देव सर्वांवर समान माया करतो हे माहीत आहे, पण माझ्यावर त्याची खूप माया आहे. खूप लोक मला आयुष्यात भेटले, माझे भाऊ-बहिणी माझ्यावर खूप माया करतात. रॉबर्ट दादाचे माझ्यावर खूप प्रेम आहे.''

फादर नेहमी म्हणत, ''निंदकाचे घर असावे शेजारी''.


त्यांचे वय ८५ होते. त्यांची ८३ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ते लेखक, कवी, गीतकार, संगीतकार, प्रवचनकार, प्रहसनकार, नाटककार, नाट्यनिर्माते, समुपदेशक, धर्मविवेचक धर्मगुरू होते. सतत लिहीत राहणे हे चांगल्या अर्थाने त्यांचे व्यसन होते. ते उत्तम कीर्तनकारही होते. कीर्तनकार आचार्य स.ना. सूर्यवंशी ह्यांच्याशी त्यांचे घनिष्ठ नाते होते. 'प्रवचनमाला' ह्या शीर्षकाखाली 'जनपरिवार'मधून दर आठवड्याला ते लेख लिहीत होते. १ मार्च २०२६पर्यंत त्यांचे १०५०लेख प्रसिद्ध झाले आहेत. ते ख्रिस्ती राजहंस व मराठी पंडित होते.

बायबलमधील १५० स्तोत्रे 'तोच जगी ह्या सुखी' ह्या नावाने त्यांनी काव्यबद्ध केली आहेत. त्यांनी संपूर्ण बायबल काव्यबद्ध केले आहे. मराठीत वाचनग्रंथ व मिस्साग्रंथ, इतरांच्या मदतीने त्यांनी साकार केले. प्रभूच्या गौरवास्तव दु:खाची, पवित्र आत्म्याची, पवित्र मारियेची व आगमनकाळातील गाणी त्यांनी मराठी भाषेत लिहिली आहेत.

२१ जानेवारी २०२६ रोजी फा. हिलरी ह्यांचा अंत झाला. फा. हिलरी नेहमी मरणावर चर्चा करत. मी व फा. ज्यो पिठेकर, फा. मायकल डिसोजा नेहमी त्यांना सांगत, ''मृत्यू अटळ आहे, तो रोखू शकत नाही; पण तुमच्या आठवणी पुसू शकत नाही.'' असे हे आमचे आवडते फा. हिलरी फर्नांडीस.

शेवटी, मी एवढेच सांगेन की, फादरांनी मला घडविले म्हणून मी लिहू शकले. त्यांची प्रेरणा माझ्यात उतरली. त्यांचे अनंत उपकार माझ्यावर आहेत. त्यांच्या स्मृतीला माझे वंदन!

मोबाईल : 88 98 65 00 96



## पुनरुत्थान प्रभूचे

तो उठला, प्रभू उठला
सूर्यतेज पांघरुनी उठला

अंधारावर मात करूनी
मृत्यूवर विजय मिळवुनी

धवल वस्त्रे धारण करूनी
ध्वज विजयाचा हाती घेऊनी

कबर ती कंपित झाली
तेजोमय अवनी जाहली

नभी तारे लखलखले
दिव्यधाम प्रमोदे भरले

सैतानाला करुनी वश
दुःखाचा केला विनाश

प्रभू अमुचा मृत्युंजयी झाला
स्वर्गामध्ये आरोहीत झाला.

- **जेन ग्रेगरी मच्याडो,** पाली
मोबाईल : 99 23 71 41 54

## पुनरुत्थित ख्रिस्त



पुनरुत्थित ख्रिस्त आला आम्हां भेटायला
मानवी कल्याणासाठी घेतला जन्म भूमी.
प्रभुदेव असूनी झाला मानवरूपी
आम्हांसाठी क्रुसी दिले बलिदान.
तिसऱ्या दिनी पुनरुत्थित झाला
आमोसी वाटेवरी भेटला शिष्यास.

विश्वासी जनांस आजही भेटतो ख्रिस्त ह्या जगी
भुकेल्यांना दिले नाही अन्न ह्या जगती
जल दिले नाही प्यावयास प्यासेल्यांना
आपल्या धर्मग्रामी नाही भेटलो आजारी जनांस
शत्रूस केली नाही क्षमा आपल्या समाज जीवनी
गरजू गरजवंतांस नाही केली मदत-सहाय्यजगी

प्रभू ख्रिस्त आला आपल्या भेटी नानारूपी
नाही ओळखले आम्ही आमच्या पापी मनी
पैसे संपत्तीची धुंदी होती आमुच्या नयनी
गर्विष्ठ हृदयी नाही जाणले आम्ही प्रभुख्रिस्ता
आम्हांस शोधितो प्रभू येशू ख्रिस्त ह्या जगती
पुनरुत्थित ख्रिस्त आला आम्हां भेटायला.

- **फ्रान्सिस अंतोन गावद्या,** अर्नाळा
मोबाईल : 97 30 15 07 73



## माझी 'सुवार्ता'

गाठले वर्ष एकाहत्तर
करितसे सेवा निरंतर
लहान-थोरांचा सोबती
श्रद्धेचा वाहता निर्झर.


लेख, व्याख्याने, कविता
एक अनमोल शिदोरी
वाचावे तितकेच थोडे
'सुवार्ता'ची किमया न्यारी.

हृदयातील स्पंदन तू
श्रद्धेचे बलस्थान तू
वाळवंटातील गारवा
नि निर्जिवांचा प्राण तू

तुझ्याच सोबत केला
श्रद्धेचा हा प्रवास सुरू
तूच अमुचा मार्गदर्शक
अन् तूच अमुचा गुरू

भरला तुझा हा मेळावा
करण्या तुझेच कौतुक
जमले आहेत सारे वितरक
प्रभू येशूचे संदेशवाहक.

- **फादर स्टीवन किका**
संचालक, मुक्तिसागर प्रबोधन केंद्र, उत्तन
मोबाईल : 72 08 54 82 80



## वाट

उजाड अशा माळरानातूनी
वाट पसरूनी जाते दूरवर
पावले अडखळती ह्या वाटेवर
बळही पावलास मिळे ह्याच वाटेवर.

झाडा-झुडुपांतूनी, खाच-खळग्यांतूनी
वाट सरसावते मार्गक्रमण करुनी
डोंगर-दऱ्यांतूनी, कडे-कपारींतूनी
वाट घेते मग स्वयं आखडुनी.

स्वच्छंदी वाढण्या रानटी झुडुपांस
आहार सकस मिळे वाटेच्या कडेने
फायदा संधीचा मध्येच पुरा घेऊनी
लुटती लुटारू वाटसरूंस अधूनमधुनी.

वाट वाटेने साऱ्यांस दाखवुनी
वाट ही वाटेने काहींची लाविली
डोळे वाटेत सदा घालूनी
वाट सदा गेली विस्मरूनी.

चढ-उतार, वाकडी-नागमोडी
सारी असती आमची लक्षणे
पायवाट, वाट, रस्ता, हमरस्ता
वाढतो आम्ही पूर्ण खाऊनी खस्ता.

अंश वाटेत असे रस्त्याचा
अंकुर जणू वटवृक्षाचा
अवघेची धरू सुपंथ सारे
विकास वाटेने होई निश्चिंत.

एक वाट कालवारीची
दुष्ट, गुन्हेगारांच्या देहान्ताची
पावन बनूनी प्रभू बलिदानाने
दाखवी वाट अमरत्वाची.

- **मॅथ्यू आलेक्स परेरा,** नंदाखाल
मोबाईल :89 75 35 43 61

## अभिनंदन



जागतिक कविता दिनानिमित्त (२१ मार्च) ‘दिव्य मराठी’ ह्या वर्तमानपत्राने कविता स्पर्धेचे आयोजन केले होते. ह्या स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक ह्या राज्यांमधील १०९३ कवींनी सहभाग घेतला होता. त्यात कवयित्री डॉ.सिसिलिया कार्व्हालो ह्यांना रु. २१०००/- चे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

‘सुवार्ता’ परिवारातर्फे **डॉ. सिसिलिया कार्व्हालो** ह्यांचे अभिनंदन!

## वेदना समेवर आली आहे

वेदनेने सीमा गाठली आहे
सामुद्रधुनीचे गळे घोठले गेले आहेत...

वाळूची वादळे आकाशापर्यंत
पोहोचली आहेत...
साऱ्याच सीमा धूसर... धूसर...

समुद्रात घुमणाऱ्या वडवानलांचे कल्लोळ
खळखळून हसणाऱ्या लाटांचे हास्य
विदीर्ण करताहेत...

धुळवड सुरू आहे...
फुलपांखरांच्या पंखावरचे रंग
ओळखू येईनासे झाले

कोणती होळी खरी मानायची?
रंगांची उधळण करणारी? की
आखातांतून उडालेल्या धुरळ्याची?

तुडवल्या गेलेल्या पृथ्वीचा ऊर
इतका का धपापत आहे?
गाडल्या गेल्या शाळकरी
बालिकांच्या कोंडल्या श्वासांनी?

श्रवणाऱ्या हातांवर तोलली गेलेली
धरणी डुचमळू लागली आहे...
रक्ताळल्या फवाऱ्यांनी माणूस
थिजू लागलाय...

काळ्याकुट्ट लोळात माणूस
ओळखू येईनासा झालाय...
हा होलिकोत्सव आहे; की रक्ताच्या
चिरकांड्या उडताहेत?

सीमा सुन्न आहेत... असीम वेदनेत
होरपळणाऱ्या यातनांचा सन्नाटा
पसरला आहे सरहद्दीवर

होळीचे रंग निघून जातील कालांतराने
फुटलेल्या काळजात रुतलेले दु:खाचे
रंग कसे काढता येतील खरवडून?

दाही दिशांच्या सरहद्दी शांत... शांत...
की वेदना समेवर आलेली आहे?

**AVINASH RODRIGUES : 7875325628**

# HOUSE DRESSING INTERIORS

Merbhat Wadi, Digha Cross, Holi Road, Vasai (W.) 401 201.

**Our Speciality**

MODULAR KITCHEN MATTRESSES, SOFAS, CURTAINS

All Types of blinds



* Acrylic Finish
  Glass Finish
  P.U. Finish
  Laminate Finish
* Soft closing tandem steel basket trollys profile shutters


As per your choice.

* We make new sofas and repair your old sofas in your Budget.
* We make all types of mattresses and curtains.
* We are doing all types of house interior works.



## संवेदनगर्भ काव्यधारा

'तेतेलेस्टाय' हा ग्रीक शब्द. त्याचे मराठी भाषांतर म्हणजे 'पूर्ण झाले आहे' किंवा 'संपूर्ण झाले आहे.' क्रुसावर आपला प्राण सोडण्याआधीच प्रभू येशूचा हा शेवटचा शब्द. कवी रिचर्ड नुनीस ह्यांचा ह्याच नावाचा कवितासंग्रह नुकताच ग्रंथालीने प्रकाशित केलेला आहे. कवितासंग्रह वाचताना कविता करणे म्हणजे गांभीर्याने, विचारपूर्वक करायची गोष्ट आहे ह्याची प्रचिती येते. अमेरिकन कवी रॉबर्ट पेन वॉरेन ह्यांच्या 'कविता म्हणजे स्वत:ला समजून घेण्याचा धोकादायक प्रयत्न' ह्या वाक्याने 'तेतेलेस्टाय' ह्या कवितासंग्रहाची सुरुवात होते. त्याच वेळी मराठी कवी केशवसुत ह्यांच्या शब्दांत सांगायचे म्हणजे 'कविता म्हणजे वीज आहे आणि जो हातात घेण्याचा प्रयत्न करतो तो नव्याण्णव टक्के भाजल्याशिवाय राहत नाही' ह्याचे स्मरण होते.



ह्या कवितासंग्रहात ती, तू, मी, स्वामी ह्या चार उपविभागांत एकूण १०२ कवितांचा हा संच आहे. ह्या कवितासंग्रहास प्रस्तावना देताना कवी किरण येले लिहितात, 'तेतेलेस्टाय' संग्रहातील कविता, ती, तो आणि त्यांच्या आयुष्यातील ऐवज आहे. बहुतांशी कवितांचा रूपबंध मुक्तछंदात्मक आहे. ह्या कवितांत जशा प्रेमकविता आहेत, तशा सामाजिक कविताही आहेत. ह्या सगळ्या कवितांत कवी आत्मा आणि परमतत्त्वाचा अनुबंध शोधतो, हे ह्या कवितांचे वैशिष्ट्य आहे.

वर्तमानपत्रांतील हुंडाबळींच्या बातम्यांनी कवीचे मन अस्वस्थ होते. अश्राप जिवांचा नाहक बळी जातो. सरण-१, सरण - २ ह्या कवितेत त्याचे प्रतिबिंब उमटलेले दिसते.

*'पेटवलीस चिता माझी*
*ती शांत व्हायला*
*आईबाबांचे चार अश्रूच*
*तेवढे कामी आले.'*

ह्या कविता वाचत असताना राम गणेश गडकरी ह्यांच्या 'राजसंन्यास' नाटकातील 'स्टोव्हचा भडका होऊन प्रत्येक वेळी महिलेचीच साडी कशी पेट घेते, पुरुषांचे धोतर का पेटत नाही?' ह्या संवादाचे स्मरण होते. ह्या कवितासंग्रहातील कवितांचे वाचन केवळ वरवरून करून चालत नाही. वाचताना वाचकांना सजग आणि सतर्क राहावे लागते. एखादा शब्द असा येऊन कानावर टपकतो की वाचकांना विचार करण्यास प्रवृत्त करतो. कविता एकदा वाचून त्याचा अर्थ, भावार्थ, मथितार्थ कळत नाही. त्यासाठी खोलात जाऊन डुबकी मारावी लागते तेव्हा कुठे कवितेचा अर्थ उमगतो.

बायबल संदर्भ आणि वास्तव दर्शन ह्यांचा सुरेख समन्वय कवींनी साधलेला दिसून येतो. मग तो 'उजवीकडचा चोर', 'पुनरुत्थान', 'एक वेरोनिका', 'पारादिस' ह्या कवितेत दिसून येतो. गालांवरून ओघळणाऱ्या आसवांत कवीला 'उदयाची किरणं' दिसताहेत; तर भाळावरून वाहणाऱ्या घामाच्या धारेत 'इवलासा ओहोळ' दिसतोय. निष्पर्ण झाडाला कवी 'मुक्तिदाता' संबोधितो. मिस्साबलिदानाच्या वेळी येशूच्या रक्ताचे प्रतीक म्हणून द्राक्षारसाचे अर्पण करताना धर्मगुरू त्यात दोन थेंब पाणी मिसळतात. हे दोन थेंब कवीला 'अभागीनीचे दोन अश्रू' वाटतात.

'डोळ्यांत अश्रू येतात हे दु:ख नाही; परंतु ते पुसायला कोणी नाही हे मोठे दु:ख आहे', हे आजवरचे पठीत तत्त्वज्ञान. मात्र कवी 'आसवमाया' ह्या कवितेत ह्या विचाराला तिलांजली देऊन सहज लिहून जातात :

*'अश्रू पुसायला कोणी नसलं,*
*तर आपणच पुसायचे*
*नाहीतर सुकू द्यायचे गालावर*
*पण कधी जिरवायचे नाहीत ते*
*पापण्याआड.'*

'स्वप्न' ह्या कवितेत एक अवलिया रस्त्यातच थेट स्वप्नांचे दुकान थाटतो. मात्र त्याला *'सागराची गाज, रुपेरी वाळू*
*डुंबणारं सूर्यबिंब, गुंफलेले बाहू*
*नि:शब्द डोळे, स्तब्ध वारे*
*राजा, हे विकाऊ कधीच नसते*
*काही स्वप्नांना स्वत:ची इज्जत असते...'*

ह्या शब्दांत सबुरीचा सल्ला द्यायला कवी विसरत नाहीत.

एकंदरीत ह्या कवितेत स्वप्न आहे तसे वास्तव आहे, प्रेयस आणि श्रेयस आहे. द्वैत आणि अद्वैत आहे. सामाजिक आशय आणि आध्यात्मिक अर्क आहे. कलात्मकता आहे तशी काव्यात्मकता आहे. वैचारिकता आहे तशी भावनात्मकता आहे.

वाचकांच्या माहितीसाठी काही कवितेच्या खाली तळटिपा दिलेल्या आहेत. त्यामुळे संदर्भ कळून वाचकांना कवितेचे आकलन होण्यास सुलभ जाते. मात्र काही तळटिपांची पुनरावृत्ती झालेली दिसून येते.

कवी दिलीप पुरुषोत्तम चित्रे म्हणतात, 'कविता म्हणजे कवीचे आत्मचरित्र असते' ह्या कवितेमधून कवी रिचर्ड नुनीस ह्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. 'दुवा' ह्या कवितेत कवी म्हणतात,

*'गंधाची एक भाषा असते*
*फुलपाखरांना कळणारी*
*मातीचीही एक भाषा असते*
*उडाणटप्पू ढगांना उमगणारी*
*किनाऱ्याला देखील एक भाषा असते*
*अवखळ लाटांना भावणारी.'*


ह्या काव्यसंग्रहात कवीची एक भाषा आहे ती वाचकांना कळणारी! त्यासाठी हा कवितासंग्रह वाचायला हवा.

**- जॉन गोन्सालविस,** उमराळे

**'तेतेलेस्टाय'**
कवी : रिचर्ड नुनीस
ग्रंथाली प्रकाशन
मूल्य रु. २५०/-.

# रिम्पल बोअरवेल्स

- आर.सी.सी. रींग बोरिंग
- आर.सी.सी. विहीर
- रेन हार्वेस्टींगसाठी रींगांची विहीर



संपर्क साधाः

रिचर्ड बार / राजेश बार
रिम्पल बोअरवेल्स
नायगांव (प.)
ख्रिश्चन आळी, पाली,
वसई.

मो.: 98 23 83 02 76
98 23 58 69 03
90 75 75 27 27

# DIVINE LIFE HIGH SCHOOL

**(ENGLISH MEDIUM)**

INDIRA NAGAR, VIRAR RAOD,
NEAR VASAI VIRAR MUNCIPAL HOSPITAL,
NALLASOPARA (E).

## REQUIRED

Primary & Secondary Section Teachers
Qualification Required :
D.Ed., B.A. - B.Ed.; B.Sc. - B.Ed,
B.PED & Computer Teachers with Knowledge of Computer Fluency in English must.

**CONTACT NO's :**

**7276465111 / 9890266435.**

Drop your Bio-Data with latest passport size photo & Attached Photo copies of certificates in School Office.

**Between 9:00 AM to 1:00 PM**

# CHEM-TECH केम-टेक



## पेस्ट कंट्रोल सर्विसेस

*** सरकारमान्य ***


**(ISO 9001 : 2015) (LIC NO : LAID-35020075)**


* आम्ही सोसायटी, बंगलोज, फ्लॅट्स, हॉटेल्स, कारखाने, दवाखाने, शाळा, महाविद्यालये इत्यादींचे पेस्ट कंट्रोल सर्विसेसचे कॉन्ट्रॅक्ट घेतो.
* नवीन व जुन्या कोणत्याही बांधकामाच्या वेळी वाळवी तसेच झुरळ, मुंग्या, उंदीर, ढेकूण ह्यांच्या त्रासापासून मुक्त होण्यासाठी संपर्क साधावा.

(डहाणू ते चर्चगेट वाजवी दरात सेवा उपलब्ध)

**प्रो. : रोनाल्ड क्रॉस्टा**

**आमच्या शाखा :** विरार । नालासोपारा । वसई ।
नायगाव । सफाळे । पालघर ।





**- : संपर्क :-**

**M. : 7558355880 / 8855869080**

# GHM TRAVELS

GHM TRAVELS, Office. 8, Divine Residency,
Opp. Mulgaon Church, Mulgaon, Vasai West, Vasai – 401201
Ruth: 9730421602 / Gavin: 7709661700 / 9890214681
https://ghmtravels.my.canva.site

** Customised Domestic Tours **

* Goa - 3N/4D * Vadodara with Statue of Unity - 3D
* Kerala - 5N/6D * Velankanni / Pondicherry * Konkan - 5N/6D
* Hyderabad - 3N/4D * Mahableshwar / Panchgani * Kashmir
* Himachal with Shimla / Kullu Manali - 5N/6D * Andaman Island ...

** International Tours **

* Nepal * Sri Lanka * Maldives * UAE (Dubai) * Vietnam
* Singapore * Malaysia * Thailand (Bangkok / Phuket / Pattaya) ...

** We Offer **

Train Booking / Bus Booking / Airline Tickets / Hotel Booking
(Best Hotels with Good Deals)
Passport (New & Renewal) / Tourist Visa / Customized Tours
Car – Mini Bus Rental / Honeymoon Package

BOOK NOW

वृत्तविशेष

# ‘सुवार्ता’ वितरक मेळावा : धारावी डिनरी





जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रविवार दिनांक ८ मार्च रोजी ‘मुक्तिसागर प्रबोधन केंद्र’, उत्तन येथे ‘सुवार्ता’ वितरक मेळावा आयोजित केला होता. प्रारंभी दर्यामाता चर्च, उत्तन येथे मुंबई सरधर्मप्रांताचे आर्चबिशप जॉन रॉड्रिग्ज ह्यांनी मिस्सा अर्पण केली.

‘सुवार्ता’ वितरक मेळाव्याची सुरुवात मेबल बडीखाद्या ह्यांच्या प्रार्थनेने झाली. मुक्तिसागर प्रबोधन केंद्राचे संचालक फादर स्टीवन किका सर्वांचे स्वागत करताना म्हणाले, ‘‘सुवार्ता वितरक सुवार्तासाठी संदेशवाहक आहेत. न थकता, न दमता प्रत्येक महिन्यात प्रभूचा संदेश देण्याचे कार्य हे वितरक करीत आहेत. धारावी विभागात अनेक वर्षांपासून ‘सुवार्ता’ वाचली जात आहे. त्याची गोडी कमी होत नाही. आमचे नाखवा बांधव मच्छीमार करण्यासाठी जाताना बोटीवर आपल्या बरोबर ‘सुवार्ता’ अंक घेऊन जातात. त्यामुळे कार्य करण्यासाठी प्रत्येक महिन्यात त्यांना शिदोरी मिळत आहे.’’

त्यानंतर डोंगरी चर्चचे प्रमुख धर्मगुरू फा. ऑस्कर ह्यांनी मेळाव्याला शुभेच्छा देताना सांगितले, ‘‘येशूची खरोखर ओळख झाल्यावर शोमरोनी स्त्री सुवार्तिक झाली. आपलेही कार्य असेच सुंदर आहे.’’

प्रास्ताविक करताना ‘सुवार्ता’ मासिकाचे संपादक फा (डा.) जोएल डिकुना म्हणाले, ‘‘३१ऑगस्ट २०२५ रोजी वेलंकनी माता तीर्थक्षेत्र, भाटेबंदर येथे वितरकांची एक सभा घेतली होती. त्या सभेत आलेल्या सुचनेनुसार आजच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. उत्तन विभाग आणि ‘सुवार्ता’ ह्यांचे ऋणानुबंध आहे. ‘सुवार्ता’ मासिकाचे पहिले संपादक बिशप डॉमणिक आब्रिओ प्रथम उत्तन चर्चला साहाय्यक धर्मगुरू म्हणून कार्य करीत होते. तेथून त्यांची बदली पापडी चर्चला १९५५ मध्ये झाली. ते ‘सुवार्ता’ मासिकाचे संपादक होण्यासाठी. नुकताच ख्रिस्तवासी झालेले फा. हिलरी फर्नांडीस ह्यांनी अनेक वर्षे ‘सुवार्ता’ मासिकातून ‘शंकासमाधान’ हे सदर चालवले. १९८६मध्ये सुवार्ता ट्रस्ट तयार करण्यात आला, त्यावेळी फा. हिलरी ह्यांनी ख्रिस्ती कॅथलिक वाङ्मय मंडळाबरोबर समन्वयकाची भूमिका निभावली होती. ‘सुवार्ता’च्या जडणघडणीत भंडारी सर, आगुस्तीन कोळी, पीटर सांकुल (पेद्रू मास्तर) ह्यांचाही सिंहाचा वाटा आहे. तुम्ही ‘सुवार्ता’ मासिक घरोघरी वाटता त्याचबरोबर ‘सुवार्ता’साठी बातम्या, लेख, कविता, संपादकास पत्रे, साद-प्रतिसाद, यशस्वी कथा, विनोद ह्यामार्फत आपले विचार तुम्ही पाठवू शकता.

‘अनुभव कथन’ ह्या सत्राचे संयोजन जॉन्सन भाटकर ह्यांनी केले. ह्या प्रसंगी ऑर्थर लोबो (मढ आयलंड), मेबल बडीखाद्या, लविना डुंगा, जॉन अंद्रात, ग्लेन फोन्सेका, सिरिल डिसिल्वा ह्यांनी आपले अनुभव कथन केले. त्यात पुढील सूचना करण्यात आल्या.

* नवचैतन्य आणण्यासाठी आजचा ‘सुवार्ता’ वितरक मेळावा आहे.
* ‘सुवार्ता’ वाटप दीड-दोन तास करतो. मात्र महिन्याभराचा आनंद मिळतो.
* ‘सुवार्ता’ वाटप करताना किती कमिशन मिळते? असा काही लोकांचा अनपेक्षित प्रश्न असतो. मात्र त्याचे उत्तर आत्मिक समाधान हे आहे.
* ‘सुवार्ता’कडून देणगीदारासाठी कॅलेंडर छापून द्यावे.
* बायबल वाचून जो आनंद मिळतो, तोच आनंद ‘सुवार्ता’ वाटून मिळतो.
* वर्गणी देण्यासाठी वाचकांना वारंवार आठवण करावी लागते.
* लोकसंपर्क वाढतो. आजारी लोकांशी वार्तालाप करता येतो.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी फा. मायकल डिसोजा होते. ते आपल्या मनोगतात म्हणाले, सुवार्ता संपादक होणे म्हणजे देवाचा एक मोठा आशीर्वाद आहे. ‘सुवार्ता’ मासिकातून राजकारण यावे की येऊ नये, हा वादाचा विषय आहे. मात्र ह्या धारावी विभागाचे काही प्रश्न आहेत, त्याविषयी वेळोवेळी वाचा फोडावी अशी सूचनाही त्यांनी केली.

जॉन गोन्सालविस ह्यांनी सर्वांचे आभार मानले. रिटा डाबरे आणि रेजिना अथाईत ह्यांनी उपस्थित वितरकांना भेटवस्तूचे वाटप केले. प्रार्थनेने मेळाव्याची सांगता झाली.

•

## Wanted bride

33/5'6", a BCA graduate working in IT Company Mumbai. He is our only son, well settled with his own house and a farmhouse. We are looking for an employed/self employed "life partner" from a cultured family. He uses hearing aid to assist with communication but is leading a full active professional life.

Contact on Email :
**gogreenbuddy30@gmail.com**

## वधू पाहिजे

**वर :**रोमन कॅथलिक वसईतच वास्तव्य, वय वर्षे : ३४, शिक्षण : B.Com , नोकरी : नामांकित बँकेत मॅनेजर. Permanent Job.

**अपेक्षित वधू :** रोमन कॅथलिक, वरास अनुरूप.

**: संपर्क मोबाईल :**
**82 08 69 80 05**

## वर पाहिजे

**वधू :** जन्म - दिनांक ३ मार्च १९९४, उंची : ५'-५'', शिक्षण : M.Sc. Chemistry, B.Sc. Computer Science, B.Ed., D.Ed., इंग्लिश मिडियम, नोकरी : शिक्षिका.

**अपेक्षित वर :** रोमन कॅथलिक, अनुरुप.

**संपर्क : 8261025865**

## M. P. Investment

जुने फिजिकल व मयत व्यक्तींच्या नावे असलेले व हरवलेले **शेअर्स सर्टीफिकेट** व IEPF मध्ये जमा झालेले शेअर्स रिकव्हर करून डिमॅट करण्यासाठी तसेच मॅच्युअल फंडात SIP व Lumsump Investment साठी संपर्क करा :
**8424023678/ 9821849001**

## वधू पाहिजे

**वर :** रोमन कॅथलिक वास्तव्य-वसई, वय ४४वर्षे, निर्व्यसनी, कुटुंबवत्सल, स्वत:च्या मालकीचे घर, १५हून जास्त वर्षे परदेशी नोकरी, आता स्वत:चा व्यवसाय, आर्थिक स्थिती उत्तम.

**अपेक्षित वधू :** कॅथलिक, वरास अनुरूप. विधवा वा घटस्फोटीत नको.

**संपर्क : 73 50 03 39 92**

## वधू पाहिजे

**वर :** रोमन कॅथलिक, वय वर्षे ३२, उंची ५'-४'' शिक्षण : I.T.I., B.Com. (Bachelor of Commerce), स्वत:चा व्यवसाय.

**अपेक्षित वर :** रोमन कॅथलिक, अनुरूप.


**: संपर्क :**
**90 49 21 31 10**

## वेलंकन्नी माता यात्रेकरूंकरिता आनंदाची बातमी !
## वेलंकन्नी मातेच्या दर्शनासाठी जाणाऱ्या सर्व भाविकांकरिता खास सुविधा

**खुशखबर**



**खुशखबर**



## हॉटेल विल्सन आता नवीन व्यवस्थापनाखाली !
### आता व्यवस्थापन करत आहेत-रायन रेसिडेंन्सी वेलंकन्नी (रायन केटरस - उत्तन डोंगरी)

हॉटेल विल्सन वेलंकन्नी बसस्टँड जवळ, वेलंकन्नी, नागपट्टिनम, तामिळनाडू - 611111

**आमच्या विशेष सुविधाः**

- स्वच्छ व आरामदायी रुम्स.
- कुटुंबांसाठी सुरक्षित व शांत वातावरण.
- चर्चपासून कमीत कमी अंतरावर.
- स्विमिंग पूल उपलब्ध.
- मोफत पार्किंगची सुविधा.
- ४ स्वतंत्र बंगलो स्वयंपाकगृहासह उपलब्ध आहेत.
- डिलक्स रुम्समध्ये २४ तास गरम पाण्याची सुविधा.
- ग्रुपसाठी स्वतंत्र स्वयंपाकाची जागा उपलब्ध.
- भाविकांसाठी रेस्टॉरंट लवकरच सुरू होत आहे.

**ग्रुप यात्रा, कुटुंब सहल आणि मंडळांसाठी विशेष व्यवस्था उपलब्ध।**
**आपणा सर्वांची वेलंकन्नी यात्रा सुखकर व आनंददायी करण्यासाठी आजच बुकिंग करा !**

**बुकींग माहितीसाठी संपर्क करा - 9076482336 / 7338860539**
**9987080007 / 8898578959 / 7977832861 / Email : ryanresidencyvelankanni@gmail.com**

- झेविअर डिमेलो

## आपल्या सेवेची ज्योत तेवत ठेवा-पोप लिओ

**व्हॅटिकन :** ‘‘तुम्ही करीत असलेल्या सेवाकार्यात लगेच यश



लाभले नाही तरी उत्साहाने आपले कार्य सुरू ठेवा’’, पोप लिओ संत पॉल सहावे सभागृहात रोममधील धर्मगुरूंपुढे बोलत होते. ते म्हणाले, ‘‘सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नकारात्मक विचारांपासून दूर रहा. तुमच्या समस्या जे तुम्हाला मार्गदर्शन करू शकतात अशा धर्मगुरूंना सांगा.’’ पोप आणखी म्हणाले, ‘‘आपल्या कार्यात सर्जनशीलता जपा. निष्क्रिय राहू नका. तरुणांच्या संपर्कात रहा. त्यांच्याबरोबर संवाद साधा. आपल्या सेवेची ज्योत तेवत ठेवा.’’

## ट्रम्प ह्यांचा तो आदेश चर्चला अमान्य



**वॉशिंग्टन :** कायदेशीर कागदपत्रांशिवाय अमेरिकेत वास्तव्य करणाऱ्या किंवा तात्पुरता व्हिसा असणाऱ्या पालकांना होणाऱ्या मुलांना अमेरिकेचे जन्मजात नागरिकत्व देता येणार नाही, असा कार्यकारी आदेश अध्यक्ष ट्रम्प ह्यांनी जारी केला आहे. अमेरिकन कॅथलिक बिशपांच्या परिषदेने त्याविरुद्ध कोर्टात याचिका दाखल केली आहे. हा आदेश अनैतिक, अनादर करणारा आणि कॅथलिक शिकवणुकी विरुद्ध असल्याने सर्वोच्च न्यायालयाने तो रद्द करावा, अशी विनंती बिशपांनी कोर्टाला केली.

## त्या वीस हजार मुलांचे काय झाले?

**सिडनी (ऑस्ट्रेलिया) :** युक्रेन-रशिया युद्धाला चार वर्षे पूर्ण झाली. ह्या पार्श्वभूमीवर येथील सेन्ट मेरीज कथिड्रलच्या प्रांगणात कार्डिनल मायकोला बिचोक ह्यांनी भाविकांना संबोधित केले. ते म्हणाले, ‘‘उभय देशांमधील युद्धात जखमींना बळी गेलेल्या युक्रेनियन सैन्याची संख्या सुमारे ५ लाख असून रशियन सैन्याची संख्या १२लाख आहे. सुमारे ५० लाख युक्रेनियन नागरिक घर-दार सोडून देशाबाहेर निघून गेले. युद्धात ठार झालेल्या युक्रेनियन नागरिकांची संख्या १५ हजार आहे. युक्रेनच्या साधनसंपत्तीची अपरिमित हानी झाली ही गोष्ट वेगळी. युद्धकाळात रशियाने युक्रेनमधील सुमारे ३०हजार मुले पळवून नेली आहेत. ती मुले कुठे आहेत? ह्या बालकांकडे जगाचे दुर्लक्ष झाले आहे का?’’

## दोन देशांच्या ऐक्यासाठी

**सेऊल (दक्षिण कोरिया) :** दक्षिण व उत्तर कोरिया हे दोन देश पुन्हा एक व्हावेत ह्यासाठी गेल्या ३१ वर्षांपासून दर मंगळवारी येथील कथिड्रलमध्ये विशेष मिस्सा केली जाते. गेल्या



महिन्यात आर्चबिशप पीटर चंग सून-तैक ह्यांनी १५००वी मिस्सा अर्पण केली. ह्या प्रसंगी आर्चबिशप म्हणाले की, ह्यापुढेही आम्ही ही विशेष मिस्सा व प्रार्थना करणे सुरू ठेवणार आहोत. सदर मिस्सामध्ये मंत्री व इतर मान्यवरही सहभागी झाले होते. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी कोरियाचे विभाजन होऊन दोन देश निर्माण झाले.


## पोप लिओ ह्यांचे आगामी प्रेषितीय दौरे

**व्हॅटिकन :** दिनांक १३ ते २३ एप्रिल ह्या दरम्यान पोप आफ्रिका खंडातील अल्जेरिया, कॅमेरून, अंगोला आणि इक्वेटोरियल गिनी ह्या देशांना भेट देतील. अल्जेरिया ह्या मुस्लिमबहुल देशात ख्रिस्ती लोकांची संख्या अत्यल्प आहे. कॅमेरूनमध्ये गेल्या दहा वर्षांपासून सरकारी सैन्य व फुटिरतावादी ह्यांच्यात संघर्ष सुरू आहे. अंगोला आणि इक्वेटोरियल गिनीमध्ये कॅथलिक लोक जास्त आहेत. जून ६ ते १२ ह्या दरम्यान पोप स्पेनला भेट देणार आहेत.

## आम्हाला न्याय हवाय - फादर फर्नांडो

**कोलंबो (श्रीलंका) :** सात वर्षांपूर्वी २१ एप्रिल, २०१९ रोजी ईस्टर संडेच्या दिवशी येथे झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणी श्रीलंकन पोलिसांनी माजी गुप्तचर प्रमुख जनरल सुरेश सॅले ह्यांना अटक केली आहे. तीन चर्च आणि तीन लक्झरी हॉटेल्सवर झालेल्या ह्या बॉम्बस्फोटात २७९ लोक मृत्युमुखी पडले, तर सुमारे ५०० जखमी झाले होते. कोलंबो सरधर्मप्रांताचे प्रवक्ते फा. फर्नांडो ह्यासंदर्भात म्हणाले, ‘‘आम्हांला नि:पक्षपाती न्याय हवा असून बॉम्बस्फोटामागे कोणाचा हात होता, हे सत्य बाहेर आले पाहिजे.’’ नवीन अध्यक्ष दिस्सनायके ह्यांनी शेधमोहिमेमध्ये पुढाकार घेतला आहे.

## फुल्टन शीन ह्यांचे संतपद दृष्टिपथात



**पिओरिआ (अमेरिका) :** आर्चबिशप फुल्टन शीन ह्यांची संतपदाची प्रक्रिया सुरू झाली असल्याचे पिओरियाचे बिशप लुईस तिल्का ह्यांनी जाहीर केले. अमेरिकन रेडिओ अणि दूरदर्शनवरील प्रख्यात प्रवचनकार, लेखक, विचारवंत व धर्मगुरू असलेले फुल्टन शीन ह्यांनी चर्चसाठी दिलेले योगदान खूप मोठे होते. त्यांनी सुमारे ३०० पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या दूरदर्शनवरील 'Life is worth living' कार्यक्रमाचे सुमारे ३कोटी दर्शक होते. संप्रेषण कौशल्याबद्दल त्यांना दोन वेळा 'Emmy Award' लाभला होता.

## झायद अवॉर्ड वितरण समारंभ

**अबुधाबी :** संयुक्त अरब अमिरातीचे संस्थापक पिता, दिवंगत शेख झायद बिन सुलतान ह्यांच्या स्मरणार्थ मानवी बंधुत्व आणि ऐक्यासाठी दिला जाणारा 'झायद अवार्ड' यंदा तिघांना देण्यात आला. आर्मेनया आणि अझरबैझान ह्यांच्यात ३०वर्षांच्या संघर्षानंतर शांती करणारे उभय देशांचे नेते, अफगाणिस्तानध्ये मुलींच्या शिक्षणासाठी कार्य करणाऱ्या जरका याझाली आणि पॅलेस्टाईनमध्ये मदतकार्य करणारी संस्था 'तावोन' हे पुरस्काराचे मानकरी होते. पोप लिओ आणि अल-अजहरचे ग्रॅन्ड हमाम अहमद अल तैनाब हे ह्या पुरस्काराचे समर्थक आहेत. ह्या समारंभाला पोपचे प्रतिनिधी कार्डिनल तोलेनतिनो हजर होते.

## मार्कुस जयविरा ह्यांना सर्वोच्च नागरी पुरस्कार

**नेगोंम्बो (श्रीलंका) :** मार्कुस जयविरा ह्यांच्या साहित्य सेवेतील योगदानाबद्दल श्रीलंकन सरकारतर्फे दिला जाणारा 'कला भूषण स्टेट अवॉर्ड' पंतप्रधानांच्या हस्ते देण्यात आला. जयविरा हे श्रद्धा, सामाजिक न्याय, पर्यावरण, मच्छीमार समाज हे विषय आपल्या लिखाणांतून हाताळतात. ते दररोज सर्वांच्या अगोदर चर्चमध्ये येतात. चर्चमुळे आपल्या जीवनाला आकार लाभलेला आहे, असे ते म्हणतात.

## स्पेनमध्ये निर्वासितांचे नियमितीकरण

**माद्रिद (स्पेन) :** स्पेन सरकारने देशात वास्तव्य करणाऱ्या हजारो अवैध निर्वासितांना कायदेशीर निवासाची परवानगी देणारा निर्णय घेतल्याची माहिती जेज्वीट निर्वासित सेवेने दिली आहे. ह्या संदर्भात स्पॅनिश पंतप्रधान पेड्रो सॅनचेझ ह्यांनी सांगितले की, ह्या निर्णयामागचा हेतू नैतिक आहे, आर्थिक नाही. देशातील निर्वासित स्पॅनिश समाजाशी समरस झाल्याने त्यांना चांगली वागणूक मिळणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीचे स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व, प्रतिष्ठा आहे, ज्याचा आदर केला पाहिजे. पंतप्रधानांनी आणखी सांगितले की, कॅथलिक चर्चचा ह्या निर्णयाला पाठिंबा आहे.

•


# डिसिल्वा टूर्स अँड कॅटरर्स

**आयोजक : क्लेमेंट एलायस डिसिल्वा,** गास चर्चसमोर.

**९८६०५६८५५३, ९५७९०२४६२०, ८४४६४३१९६९**

**१) मे महिन्याच्या सुट्टीमध्ये खास शिक्षक -विद्यार्थी व इतर भाविकांसाठी वेलंकनी मातेचा नोव्हेना :** दिनांक ६ ते १५ मे २०२६. नॉन ए. सी. रूम, रेल्वेप्रवास + जेवण. रू. १४,५००/- ए.सी. रूम, ए.सी. तिकीट + जेवण. रू. १८,५००/- ए.सी.

**२) श्रीनगर काश्मिर, पहेलगाम, गुलमार्ग, सोनमार्ग सहल :** दिनांक ४ ते १४ मे २०२६.(११ दिवस.) एकूण खर्च प्रत्येकी रु. ४०,०००/- व (५ ते ११ वर्षे) मुलांस रु. ३५,०००/-. बॅन्ड्रा ते कटारा व कटारा ते श्रीनगर. वदं भारत ट्रेन ए.सी. प्रवास व येताना श्रीनगर ते कटारा व कटारा ते मुंबई एसी ट्रेनने प्रवास. साईटसीनसाठी पुशबॅक मिनी बस. कटारा २ रात्री व श्रीनगर ६ रात्री हॉटेल वास्तव्य.

**३) काश्मिर डिलक्स हायफाय सहल :** दिनांक ६ ते १२ मे २०२६. मुंबई ते श्रीनगर व श्रीनगर ते मुंबई, विमान प्रवास,साईट सीनसाठी पुश बॅक मिनी बस. खर्च २८,०००/- + विमान खर्च. मुलांसाठी रु. २३,०००/- + विमान खर्च.

**४) सिमला, कुलू, मनाली, रोहतांग पास, धरमशाळा, डलहौजी, चंदीगड सहल :** दिनांक १६ मे ते २७ मे २०२६. खर्च ४२,०००/-. मुलांस रु. ३५,०००/-. जाता-येताना राजधानी, साईटसीनसाठी ए.सी. बस., ए.सी हॉटेल, सर्व एन्ट्री फी समावेश.

**५) महाबळेश्वर, प्रतापगड, पाचगणी सहल :** अ) दि. २८ ते ३१ मे २०२६. खर्च रु. १२,५००/-. एसी बस, एसी हॉटेल मार्केटमध्ये. ब) **महाबळेश्वर, प्रतापगड, पाचगणी, दापोली सहल :** दि. २ जून ते ७ जून २६.खर्च रु. १६,०००/-. मुलांस रु. १२,०००/- एसी बस, एसी हॉटेल. गेट टुगेदर पार्टी, मार्केटमध्ये हॉटेल.

**६) दुधनी मातेच्या सणासाठी दुधनी-खानवेल सहल :** दि. ३० ते ३१ मे २०२६. खर्च रु. ५,०००/- (४ जणांसाठी रूम)

**७) कोळी बांधवासाठी वेलंकनी माऊलीचा नोव्हेना :** दि. ०४ जुलै ते १८ जुलै २०२६. नॉन एसी पॅकेज, रु. १७,०००/- व एसी रूम व एसी तिकीट रु. २४,०००/-. पाच दिवसाचा नोव्हेना नॉन एसी पॅकेज रु. १२,५००/- व एसी पॅकेज रु. १७,०००/-.

* **सर्व सहलींमध्ये रु. ५,०००/- ॲडवान्स भरून नांवनोंदणी करणे. सर्व सहलीमध्ये बुकीग चालू आहे.**

१) वेलंकनी भुजींग सेंटर, किरावली : 8552009748,9049110595 २) सुनिता पोसा, उत्तन : 9833801263, 9222111269

३) स्वाधिना परेरा, मारीभाट, गिरीज : 9823614664 ४) क्लेरा आल्मेडा, माणिकपूर : 9892252117

५) ॲन्ड्र्यू रूमाव, नंदाखाल : 9788592847, 9284106936 ५) कॅरोल बडी, उत्तन : 9221311122

**धार्मिक**

## वेदीसेवक मेळावा

**तलासरी :** ज्ञानमाता सदन, तलासरी येथे शताब्दी वर्षानिमित्त संत पॉल डिनरीतर्फे दिनांक ७ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.०० ते ५.०० ह्या वेळेत वेदीसेवक मेळावा घेण्यात आला. फा. सिझर डाबरे व फा. ज्यो घोन्सालविस ह्यांनी उत्तमरीत्या आयोजन केले होते. वेगवेगळ्या मिस्सा सेंटरमधून इयत्ता ४थी ते ९वीच्या एकूण १४२मुला-मुलींनी भाग घेतला होता. मिरवणुकीने संत गोन्सालोच्या गीताने सुरुवात करून प्रार्थनेनंतर सि.लविना, फा.प्रशांत, फा. लुईस, फा.ज्यो, फा.सॅबी आणि डीन फा. निलम ह्यांनी आपापल्या पाचारणाची कथा सांगितली. संत गोन्सालो गार्सियाच्या जीवनावर व्हिडिओ दाखवण्यात आला. फा. ज्यो ह्यांच्या कृतिगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**- फा. ज्यो घोन्सालविस,** ये.सं., तलासरी

## क्रुसाची वाट

**भुईगाव :** बुधवार ४ मार्च रोजी वेलंकनी माता चर्च, भाटेबंदर येथे ज्येष्ठ नागरिक सेवा संस्था, भुईगावतर्फे उपवासकाळानिमित्ते क्रुसाच्या वाटेच्या भक्तीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ९.३०वाजता चर्चजवळ असलेल्या डोंगरावर क्रुसाची स्थाने असलेल्या ठिकाणी  दु:खसहनाची आठवण करून परिवर्तनासाठी प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर पापनिवेदन झाले. ११.३० वाजता उत्तन येथे फा.लेस्ली माल्या ह्यांच्या पौरोहित्याखाली पवित्र मिस्सा साजरी करण्यात आली. त्यानंतर सेंट ॲण्ड्र्यू चर्च, उत्तन-चौक; लुर्ड्स माता चर्च, उत्तन-पाली ह्या चर्चेसना भेटी दिल्या. ह्यावेळी १६० ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.

**- इनास मेन,** भुईगाव

## कुटुंब आयोगाचा वार्षिक मेळावा - २०२६

**वसई :** वसई धर्मप्रांतीय कुटुंब आयोगाचा वार्षिक मेळावा गुरुवार १९ मार्च रोजी पापडी येथील कृपामाता हॉलमध्ये पार पडला. ह्या मेळाव्यास धर्मप्रांतातील ५००हून अधिक पती-पत्नी व भाविकांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या प्रारंभी पापडी कुटुंब सेवा समितीने उपस्थितांची नोंदणी करून त्यांचे स्वागत केले. सांडोरच्या सभासदांनी प्रार्थनेचे नियोजन केले. आयोगाचे संयोजक फा. मिल्टन ह्यांनी प्रास्ताविकातून मेळाव्याच्या ‘ख्रिस्ती दांपत्याची आध्यात्मिकता’ ह्या विषयाची ओळख करून दिली.

मुळगाव समितीने कुटुंब हे प्रत्येक व्यक्तीचे श्रद्धास्थान आहे, ह्या विचारावर आधारित पथनाट्य सादर केले. मुख्य मार्गदर्शक



म्हणून बिशप थॉमस डिसोजा ह्यांनी सांगितले की दांपत्य जीवनातील आज्ञाधारकता ही गुलामी नसून प्रेमातून निर्माण होणारी समर्पणाची भावना आहे. ख्रिस्ती विवाह हा एक दैवी करार असून पती-पत्नीची निवड देवाने केलेली असते. जीवनातील कठीण प्रसंगात पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनानुसार निर्णय घेणे, हाच खरा आध्यात्मिक मार्ग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नंदाखाल समिती व कोर कमिटीच्या स्वयंसेवकांनी गटचर्चेचे आयोजन केले. ‘दांपत्याची आध्यात्मिकता’ ह्या विषयावर आधारित गटांमध्ये सखोल चर्चा झाली. टॉक शोचे संचलन फा. जॉनी निग्रेल व मार्शल तुस्कानो ह्यांनी केले.  तीन दांपत्यांनी  संकटांना सामोरे जाताना परस्पर आदर, प्रेम व ख्रिस्ती मूल्यांच्या आधारे जीवन कसे जगले, ह्याचे त्यांनी प्रभावी सादरीकरण केले.

झकारिया तुस्कानो ह्यांनी आभार मानले. बिशप साहेबांच्या आशीर्वादाने मेळाव्याची सांगता झाली.

## दुखटन क्रॉसचा सण

**पालघर :** मान-बोईसरच्या अवर लेडी ऑफ हेल्थ चर्चने दिनांक १५ फेब्रुवारी रोजी दुखटन क्रॉसच्या सणाचे मोठ्या उल्हासाने आयोजन केले. बिशप थॉमस डिसोजा ह्यांच्या मुख्य पौरोहित्याखाली आणि फा. रॉबिन घोन्सालविस, फा. फिलीप घोन्सालविस, फा. किंग्सली कुटिनो आणि फा. पीडी कॅस्टिलिनो (एस.व्ही.डी.) ह्यांच्या सहपौरोहित्याखाली पवित्र मिस्सा बलिदान साजरे करण्यात आले. दुकटनच्या ३०० हुतात्म्यांच्या बलिदानाचे स्मरण करून देणाऱ्या ह्या उत्सवात सुमारे ५०० भाविकांनी सहभाग घेतला.

बिशप थॉमस ह्यांनी आपल्या प्रवचनात, केवळ नियमबद्ध पालनापलीकडे जाणाऱ्या हृदय केंद्रित नीतिमत्तेसाठी प्रभू येशूच्या आवाहनावर भर दिला. सर्व धर्मांच्या लोकांना आकर्षित करणाऱ्या दुखटनच्या टेकडीवरील क्रॉसच्या सणासाठी सुंदर सजावट करण्यात आली होती.

**- फा. रॉबिन घोन्सालविस,** मान-बोईसर

# एक्स्ट्रीम हॉलिडेज तुस्कानो टूर्स

*** आमच्या आगामी सहली ***

**१) काश्मीर, गुलमर्ग, सोनमर्ग व पहेलगाम, श्रीनगर सहल :**
दिनांक ६ मे ते १२ मे व २४ मे ते ३० मे २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. ३०,०००/- (ट्रेन अथवा विमान प्रवास अतिरिक्त).

**२) सिमला-कुलू-मनाली-चंदीगड-अमृतसर सहल :**
दिनांक २ मे ते १२ मे २०२६. एकूण खर्च रु. ४२,५००/- (रेल्वे तिकीटासहीत. राजधानी श्री टायर ए.सी.)

**३) कलकत्ता-गँगटोक-दार्जिलिंग-पेलिंग सहल :**
दिनांक १३ ते २३ मे २०२६. एकूण खर्च रु. ४१,०००/- (रेल्वे किंवा विमान प्रवास अतिरिक्त).

*** मागील १५ वर्षांपासून दार्जिलिंग येथील यशस्वीरीत्या आयोजित करणारे वसईतील एकमेव अनुभवी टूर आयोजक**

**४) बँगलोर, म्हैसूर, उटी, कुर्ग, वायनाड सहल :**
दिनांक १३ मे ते २२ मे २०२६. एकूण सहल खर्च प्रत्येकी रु. ३२,०००/- मात्र (रेल्वे प्रवासासहित श्री टायर ए.सी.)

**५) दुधनी मातेच्या सणासाठी दुधनी-खानवेल सहल :**
दिनांक ३० मे ते ३१ मे २०२६. एकूण सहल खर्च प्रत्येकी रु. ५,५००/- (चार जणांस एक रूम).

**६) महाबळेश्वर-प्रतापगड-पाचगणी सहल :**
दिनांक २७ ते ३० मे, ३० मे ते २ जून व २ते ५ जून २०२६. (दिवसा प्रवास) एकूण खर्च रु. १३,०००/- (चार जणांस एक रूम) सर्व साईटसीन, एन्ट्री फी व गाईड खर्च समाविष्ट.

**७) आरोग्यदायी माता तीर्थक्षेत्र वेलंकनी (मद्रास मावली)**
दिनांक २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर २०२६. बुकींग सुरू आहे. संपूर्ण नोव्हेना / पाच दिवसांचा नोव्हेना / ट्रेन प्रवास / विमान प्रवास/ ए.सी.रूम / नॉन ए.सी.रूम / फक्त रूम व जेवण इत्यादी पर्याय उपलब्ध.
**हॉटेल रेहा पार्क :** दोन्ही चर्च समान अंतरावर, निसर्गरम्य परिसर
**हॉटेल पिकनिक :** नवीन चर्चच्या बाजूला, नवीन रूम्स, उत्कृष्ट भोजन व्यवस्था.

*** सहल क्रमांक २, ४ मध्ये प्रवास खर्च समाविष्ट. सर्व सहलींमध्ये भोजन, निवास, साईटसीन, एन्ट्री तिकीट इत्यादी खर्च समाविष्ट.**

*** मागील १५वर्षांपासून यशस्वीरीत्या टूर्स आयोजित करणारे वसईतील एक विश्वासपात्र नाव.**

*** अधिक माहितीसाठी संपर्क ***
**न्यूमन तुस्कानो, नंदाखाल**
**9222337051, 8007621516**

# GOOD SHEPHERD CLASSES

UNLOCK YOUR CHILD'S POTENTIAL

**ADMISSION OPEN FOR 2026-27**

- Innovative learning ideology.
- Personalised attention & guidance and counseling.
- Weekly Tests & Regular exams.
- Efficient & Experienced faculty.
- Audio & Visual Facility.

**Admission open for**
**SSC (V.III to X) & CBSE - VIII**

Above Velankanni Cyclinic,
opp Metro Cycles, Tarkhad, Vasai (w) 401201
For more details contact: 9764023787, 9637867207, 9619183088

**प्रेमळ स्मरणार्थ**



**ख्रिस्तवासी मागरिट फ्रान्सिस कार्लोस**

कोकरमवाडी, दिघा, पापडी

जन्म : ०१/०५/१९५४; मृत्यू : १९/१२/२०२०

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंतःकरणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***
(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, आमच्या आईला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभू दे हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुले, सून, मुलगी, जावई व नातवंडे**

## सामाजिक

# रक्तदान शिबिर

**भुईगाव :** ‘जाणीव’ सामाजिक संस्था, खालघर गावपरिवार, भुईगाव ह्यांच्या सौजन्याने व विजयी रक्तपेढी सेंटर, पापडी ह्यांच्या सहकार्याने दिनांक २२फेब्रुवारी रोजी दहाव्या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरात एकूण ९२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. ह्या शिबिरासाठी अनंत परेरा, गास व जॉर्डन डाबरे, भुईगाव प्रमुख अतिथी म्हणून हजर होते. भुईगाव चर्चचे प्रमुख धर्मगुरू फा. विजय लोपीस, बँकेचे संचालक एव्हरेस्ट डाबरे व गावीत सर ह्यांनी शिबिराला भेट देऊन रक्तदात्यांना प्रोत्साहित केले. शिबिरात लुकस परेरा व नवनिर्वाचित नगरसेवक अरुणा डाबरे ह्यांना संस्थेच्या वतीने सन्मानित करण्यात आले. लुईस डायस ह्यांनी आभार मानले.

**- लुईस डायस,** भुईगाव

* **चुळणे :** यंग मेन्स मेडिकल रिलीफ फंड, चुळणे ह्या ट्रस्टने ‘जे.जे.ब्लड बँक’, मुंबई व ‘यंग मेन्स असोसिएशन’, चुळणे ह्यांच्या सहकार्याने दिनांक २२फेब्रुवारी रोजी फातिमा माता कॉन्व्हेंट, चुळणे येथे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. ह्या शिबिरास नवनिर्वाचित नगरसेवक अजय रॉड्रिग्ज उद्घाटक म्हणून तर नवनिर्वाचित नगरसेविका सुवर्णा अजित पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. एकूण १५० रक्तदात्यांनी सहभाग घेतला व १३० रक्तदात्यांनी रक्तदान केले. अंतोन डिसोजा ह्यांनी प्रास्ताविक केले. इजाबेल मिरांडा ह्यांनी आभार मानले.

* **सांडोर :** दिनांक २२फेब्रुवारी रोजी लोकसेवा मंडळ, बंगली येथे स्पोर्ट्स क्लब व रेजिना फाऊंडेशन ह्यांच्या वतीने सरला ब्लड बँकेच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ह्या शिबिरासाठी १२१ जणांनी सहभाग नोंदविला होता. १०१ लोकांनी प्रत्यक्षात रक्तदान केले.

* **उमराळे :** ८मार्च रोजी उमराळे येथे फा.ऑस्कर कोलासो मेमोरियल मेडिकल संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त व्हिन्सेंट डी पॉल संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिलादिनी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण २६८ जणांनी उपस्थिती दर्शविली व २३० रक्तपिशव्या संकलित करण्यात आल्या. महिला दिनानिमित्त महिला रक्तदात्यांचा सन्मान करण्यात आला.


# रक्तदात्यांच्या मेळावा

* **बंगली :** दिनांक ७ फेब्रुवारी रोजी लोकसेवा मंडळ, बंगली येथे रक्तदात्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. ह्यावेळी डॉ. नीता रवी, दिशा फर्नांडीस व लीला परेरा ह्यांनी रक्तदात्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक व मान्यवरांची ओळख गॉडफ्री कोरिया ह्यांनी केली.

* **सांडोर :** दिनांक १९ फेब्रुवारी रोजी लोकसेवा मंडळात रक्त तपासणी शिबिर घेण्यात आले. ह्यावेळी एफबीएस., सेरिम क्रिएटीन, लिपिड प्रोपाईल, इसीजी, युरिक ॲसिड ह्या १०८० रुपयांच्या टेस्ट २००रुपयांत करण्यात आल्या. लोकसेवा मंडळ व कार्डिनल ग्रेशस मेमोरियल हॉस्पिटल ट्रस्टच्या वतीने हे तपासणी शिबिर घेण्यात आले. ह्या तपासणी शिबिरात १०५जणांनी सहभाग नोंदविला.

## साहित्यिक

# सामवेदी-कुपारी शब्दकोशाचे प्रकाशन




**वसई :** १५वी कोकण इतिहास परिषद संत गोन्सालो गार्सिया महाविद्यालयात ७ फेब्रुवारी म्हणजे संत गोन्सालो गार्सिया ह्यांच्या सणाच्या दिवशी संपन्न झाली. ह्या परिषदेत पहिल्या सत्रात कोकण इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ. सदाशिव टेटविलकर, डॉ. विद्या प्रभू (युनिव्हर्सिटी चेअरमन बोर्ड ऑफ स्टडी), डॉ. नारायण भोसले व आर्चबिशप (डॉ.) फेलिक्स मच्याडो, मॉन्सि. फ्रान्सिस कोरिया, व्हिकर जनरल फा. (डॉ.) जोएल डिकुना, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विभूते, उपप्राचार्या प्रा. कुरियन उपस्थित होते. त्या सर्वांच्या शुभहस्ते ‘सामवेदी-कुपारी शब्दकोश’ हे तुषार पब्लिकेशनतर्फे, डॉ. ट्रिझा लोपीस-परेरा लिखित पुस्तकाचे प्रकाशन झाले. हार्दिक अभिनंदन!

# पुस्तक प्रकाशन



**मुळगाव :** ‘सुवार्ता’ मासिकाचे ज्येष्ठ चित्रकार फ्रान्सिस कोळी ह्यांच्या ‘दुलाई’ (कवितासंग्रह) व ‘आठवींवर बोलू काही’ (कथासंग्रह) ह्या दोन पुस्तकांचे प्रकाशन गुरुवार १९ मार्च रोजी संत मेरी मॅग्दलेना चर्च सभागृह, मुळगाव येथे झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फा. विजय आल्मेडा होते. प्रमुख वक्ते म्हणून कवी सायमन मार्टिन व साहित्यिक रेमंड मच्याडो ह्यांनी मनोगत व्यक्त केले. ‘सुवार्ता’ परिवारातर्फे फ्रान्सिस कोळी ह्यांचे अभिनंदन!

# लेखनातील घोडदौड



**उमराळे :** ‘सुवार्ता’ मासिकाचे उदयोन्मुख लेखक फ्रँक मिरांडा, जोसघर ह्यांचे ‘लोकसत्ता’ आणि ‘महाराष्ट्र टाइम्स’ ह्या मान्यवर वृत्तपत्रांतून संपादकास पत्रे, अनुभव कथन, इतर लेख मिळून १००लेख प्रकाशित झालेले आहेत. ‘सुवार्ता’ परिवारातर्फे अभिनंदन आणि पुढील लेखनकार्यास शुभेच्छा!

## शैक्षणिक

# डॉ. विभूते ह्यांना पुरस्कार



**वसई :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि माहिती तंत्रज्ञान साहाय्यता केंद्र ह्यांच्या वतीने आयोजित 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा २०२५-२६ पार पडली. ह्यात गोन्सालो गार्सिया कॉलेजचे प्राचार्य डॉ. सोमनाथ विभूते ह्यांना 'उत्कृष्ट जिल्हा स्तरीय प्राचार्य' ह्या पुरस्काराने गौरविण्यात आले. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

# महाराष्ट्र सुपर शाळा पुरस्कार



**आगाशी :** येथील काशिदास घेलाभाई हायस्कूल शाळेला 'निपुण महाराष्ट्र सुपर शाळा' हा मानाचा पुरस्कार जिल्हा परिषद, पालघरतर्फे प्राप्त झाला आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

## सांस्कृतिक

# मराठी भाषा गौरवदिन

**तलासरी :** दिनांक २६ फेब्रुवारी रोजी तलासरी तालुक्यातील झरी येथील 'ज्ञानमाता विद्या मंदिर हायस्कूल'मध्ये मराठी भाषा गौरवदिन साजरा करण्यात आला. ह्या कार्यक्रमाचे आयोजन वसई मराठी ख्रिस्ती साहित्य मंडळाने केले होते. ज्ञानमाता आदिवासी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सि. बॅस्टीयन फर्नांडीस ह्यांना उत्कृष्ट मुख्याध्यापिका पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांना सन्मानित केले.

मंडळाचे उपाध्यक्ष लेस्ली डिसिल्वा ह्यांनी कुसुमाग्रजांच्या साहित्यसंपदेचा परिचय करून दिला. मंडळाचे अध्यक्ष रेमंड मच्याडो ह्यांनी सांगितले की मराठी भाषा ही विचार व्यक्त करण्याचे, भावना जागृत करण्याचे आणि सामाजिक जोडणीचे प्रभावी साधन आहे.

कार्यकारी सदस्य दीपक मच्याडो ह्यांनी प्रमाणभाषा व बोलीभाषेतील नातेसंबंध विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. सिडनी मोरायस ह्यांनी मराठीला मिळालेल्या अभिजात भाषा दर्जाचा गौरव केला. स्वागत व आभार अमित मालकरी ह्यांनी केले. सूत्रसंचालन लेनी परेरा ह्यांनी केले. दुपारच्या सत्रात हा कार्यक्रम उपलाट, धोंधडपाडा येथेही सादर करण्यात आला. उपमुख्याध्यापक राजेंद्र सर व सि. दीपिका पाचुलकर आणि शिक्षक ह्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

- **रेमंड मच्याडो,** होळी, रमेदी

## उपवासकालीन व्याख्यानमाला

# ख्रि. बिशप डॉमणिक आब्रिओ व्याख्यानमाला

**निर्मळ :** जीवन विकास मंडळ आणि चेतना पुस्तकालय, निर्मळ आयोजित ख्रि. बिशप डॉमणिक आब्रिओ व्याख्यानमालेत एकूण तीन पुष्प गुंफण्यात आले. पहिले पुष्प १मार्च रोजी झाले. 'वाचन संस्कृती'विषयी प्रा. मॅक्सवेल लोपीस, 'वैज्ञानिक दृष्टिकोन' ह्याविषयी फ्रान्सिस आल्मेडा सर ह्यांनी प्रबोधन केले. दुसरे पुष्प ८ मार्च रोजी मर्देस  चर्च येथे झाले. त्यात 'स्त्रियांचे आरोग्य'ह्याविषयी डॉ. प्रियांका चौधरी ह्यांनी मार्गदर्शन केले. तिसरे पुष्प २२ मार्च रोजी गोम्सआळी चर्च येथे चिन्मय गव्हाणकर ह्यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' ह्या विषयावर उद्‌बोधन केले.

## प्रबोधन प्रतिष्ठान

**नंदाखाल :** प्रबोधन प्रतिष्ठान उपवासकालीन व्याख्यानमालेचे हे अकरावे वर्ष आहे. नंदाखाल अब्राहाम नाका, कार्मेल कॉन्व्हेंट स्कूल येथे संपन्न झाले. पहिले पुष्प १ मार्च रोजी 'कोविडनंतरचे मानसिक आरोग्य' ह्याविषयी डॉ. वृषाली राऊत ह्यांनी मार्गदर्शन केले. ८ मार्च रोजी 'महिलांपुढील आव्हाने आणि महिला सक्षमीकरण' ह्याविषयी झालेल्या परिसंवादाचे अध्यक्षा डॉमिनिका डाबरे होत्या. ह्याप्रसंगी उद्योजिका सोफिया परेरा, समुपदेशक मेबल फर्नांडीस, आहारतज्ज्ञ रोशन लोपीस, बँकिंग तज्ज्ञ लता फोस ह्यांनी परिसंवादात आपले विचार मांडले. तिसरे पुष्प डॉ. संजय कळमकर ह्यांनी 'जगण्याच्या आनंदी वाटा' कथन केल्या; तर २२ मार्च रोजी 'जीवन सुंदर आहे' ह्याविषयी प्रसाद कुलकर्णी ह्यांनी आपले विचार मांडले.

## लोकसेवा मंडळ

**बंगली :** लोकसेवा मंडळ, बंगली ह्यांचे हे उपवासकालीन व्याख्यानाचे बारावे वर्ष आहे. हे व्याख्यान त्यांच्या ख्रि. फ्रान्सिस डिसोजा सभागृह, बंगली येथे संपन्न झाले. १ मार्च रोजी वसई धर्मप्रांताचे चॅन्सलर फा. (डॉ.) जॉन फरगोज ह्यांनी 'विवाह संस्थेपुढील आव्हाने' ह्याविषयी उद्‌बोधन केले. दुसरे पुष्प ८ मार्च रोजी 'आनंदी जीवनाची गुरुकिल्ली' ह्या विषयावर मेघा जेरे ह्यांनी श्रोत्यांशी संवाद साधला. तर १५ मार्च रोजी तिसरे पुष्प चिन्मय गव्हाणकर ह्यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता सोबत जगताना' ह्याविषयी प्रबोधन केले.

**सहवेदना**

## सि. ल्युसी डिसोजा ह्यांचे निधन



**गिरीज :** येथील नंदनवन गावपरिवारातील सि. ल्युसी फ्रान्सिस डिसोजा ह्यांचे १ मार्च रोजी पापुआ, न्यू गिनी येथे वयाच्या ६२व्या वर्षी निधन झाले. त्यांचा अंत्यविधी शुक्रवार दिनांक ६ मार्च रोजी अलोटाउ येथील कथिड्रलमध्ये करण्यात आला.

## सि. शिला मच्याडो ह्यांचे निधन



**नंदाखाल :** नंदाखाल, कोलभाग येथील सिस्टर शिला फ्रान्सिस मच्याडो (प्रेषितांची राणी SRA) ह्यांचे जर्मनी येथे ७ मार्च रोजी वयाच्या ७६व्या वर्षी निधन झाले. शुक्रवार दिनांक १३ मार्च रोजी त्यांचा अंत्यविधी जर्मनी येथे करण्यात आला. तेथे त्यांनी शाळेत ज्ञानदान, मुख्याध्यापिका पदावरून सेवानिवृत्त तसेच चर्चमधील पाळकीय कार्य केले. त्यांचा हसरा चेहरा, आनंदी स्वभाव व मैत्रीमय वृत्ती ह्यामुळे सर्वांना त्या हव्याहव्याशा वाटत.

## सिने छायाचित्रकार तन्मय वनमाळी ह्यांचे निधन



**वसई :** नव्या दमाचे आश्वासक सिने छायाचित्रकार तन्मय राजेंद्र वनमाळी (वय वर्षे ३१) ह्यांचे ९ मार्च रोजी अकस्मात निधन झाले. महेश लिमये ह्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हिंदी आणि मराठी चित्रपटासाठी छायाचित्रण केले होते. 'हंबीरराव मोहिते', 'फुलवंती' ह्या चित्रपटांचे त्यांनी छायाचित्रण केले आहे.

## कवयित्री आसावरी काकडे ह्यांचे निधन



**पुणे :** साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ कवयित्री आसावरी काकडे ह्यांचे वयाच्या ७७व्या वर्षी १६ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. काकडे ह्यांच्या कविता महाराष्ट्र आणि कर्नाटक येथील शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. त्यांनी मराठी आणि हिंदी ह्या दोन्ही भाषांत काव्यलेखन केलेले आहे. त्यांचा 'मेरे हिस्से की यात्रा' हा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे.



**रमेदी :** 'सुवार्ता' वितरक लिली कर्व्हालो ह्यांचे पती व्हिक्टर फ्रान्सिस कर्व्हालो ह्यांचे दिनांक १६ मार्च रोजी वयाच्या ८६व्या वर्षी निधन झाले.

**'सुवार्ता' परिवारातर्फे सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली!**


Sophia
BEAUTY PARLOUR
"HIGHLIGHT YOUR NATURAL BEAUTY"
SOPHIA ANDRADES
9823301327
7744000333
9049000555
◈ अपॉईन्टमेंन्ट स्विकारल्या जातील ◈



**डि. डि. ट्रॅव्हेल्स, चुळणे, वसई**

एप्रिल व मे महिन्यातील महाबळेश्वर सहली
१. दि.११-१४ एप्रिल २०२६
२. दि.१८-२१ एप्रिल २०२६
३. दि.२२-२५ मे २०२६
४. दि. २-५ जून २०२६

वरील सर्व सहली तव्हेरा एसी बसने आयोजित करीत आहोत प्रवास+निवास+जेवण खर्च प्रत्येकी रु १३,३००/-
(एका रूममध्ये चार जणांच्या राहण्याची सोय)

संपर्क: लॉरेन्स डिकोस्टा, मो.९८९२७१०२३४



**युनिक पेस्ट कंट्रोल**



**प्रो. : थॉमस वर्गिस**
माळुंगी, मुळगाव, वसई.
**7770026783,**
**9320032074**

१) २६ वर्षे कार्यरत असलेली.
२) सेवाभावी संस्था, हॉस्पिटल्स, कार्यालये, हाऊसिंग सोसायटी, हॉटेल्स, बंगलोज, फॅक्टरी यांसारखे संतुष्ट ग्राहक.
३) नवीन बांधकाम, नूतनीकरण व राहत्या घरासाठी वाळवी प्रतिबंधक योजना.
४) झुरळ, मुंग्या, कोळी, रांगणारे किटक, उंदीर, पाली ह्यांच्यासाठी जनरल प्रतिबंधक योजना.
५) नॉन टॉक्सीन केमिकल हर्बल व जेलमध्ये सर्विस उपलब्ध.

**-: संपर्क :-**
**9323232074, 7768000260**
**ऑफिस :** डिकुनावाडी, मुळगाव, वसई.



* रोज Rs.99 फक्त 15 वर्षे बचत करा आणि Rs. 9 करोडची Property बनवा.
*बचत करा रोज Rs.333 व Rs.1,40,000 दरवर्षी आयुष्यभर, टॅक्स फ्री घ्या. सोबत Rs. 40 लाखांची **Maturity** पण मिळवा. तसेच Rs. 80 लाख **Family** साठी देखील.
*ही Offer मर्यादित कालावधीसाठीच उपलब्ध.
* Contact For Mediclaim Policy, Cancer Cover Plan, Pension, SIP & SWP.
**Jayesh Chaudhari**
**9422483785**



**पाहिजे**

खिस्ती कुटुंबात (वसईमध्ये) स्वयंपाकासहीत घरकाम करण्यासाठी पूर्ण वेळ महिला कामगार पाहिजे. वयोमर्यादा : ४५ वर्षांखालील.

**: संपर्क :**
**9869139928 / 7058826951**

# ‘सुवार्ता’ला प्रेमाचे दान

| | | |
|---|---|---|
| पॅट्रिक फ्रान्सिस ब्रिटो | पापडी | ११००/- |
| अनामिक | मुळगाव | १०००/- |
| बेरल विन्सेंट घोन्सालविस | उत्तन | १०००/- |
| मेबल अगस्टीन घोन्सालविस | रमेदी | १०००/- |
| स्टीफन निकोलस फरेरा | गिरीज | ७००/- |
| हिलरी डाबरे | भुईगाव | ६००/- |
| सिसिलिया थॉमस लोपीस | नानभाट | ५००/- |
| मार्शल संज्याव रॉड्रिग्ज | नंदाखाल | ५००/- |
| लेविस पेगाडो | उमराळे | ५००/- |
| डॉ. राजीव डॉ. डिसिल्वा | मर्सेस | ५००/- |
| मर्सी विन्सेंट डिसिल्वा | रमेदी | ५००/- |
| रूबी चार्लस फलकाव | पापडी | ५००/- |
| सांतान साल्वादोर आल्मेडा | नानभाट | ५००/- |
| जोसेफ जॉन दालमेत | भुईगाव | ५००/- |
| डेनिस डायस | रमेदी | ५००/- |
| फेथ/एझ्रा मेलरॉय बुतेलो | पापडी | ५००/- |
| जॉस्टन थॉमस डिसोजा | पापडी | ५००/- |
| मेबल बुतेलो | पापडी | ५००/- |
| बाबु कोलासो | चुळणा | ५००/- |
| विल्यम सायमन डिसोजा | सांडोर | ५००/- |
| सांतान सालोमन मच्याडो | नंदाखाल | ५००/- |
| प्रमिला जोसेफ रॉड्रिग्ज | पाली | ५००/- |
| अपलान अगस्टीन फर्नांडीस | निर्मळ | ५००/- |
| फिलोमिना विल्यम डिकोष्टा | चुळणा | ५००/- |
| ग्रेगरी डॉ. घोन्सालविस | पापडी | ५००/- |
| तेरेजा जॉन डिकुना | नानभाट | ५००/- |
| जोसेफ डॉमणिक लोपीस | माणिकपूर | ५००/- |
| विवियन अंड्राडीस | मर्सेस | ५००/- |
| इस्परान्स रुपर्ट डिसिल्वा | सालोली | ५००/- |
| विलास जॉन धांगडा | शिसणे | ५००/- |
| फ्लॉरी पॅट्रिक कर्वालो | रमेदी | ५००/- |
| मारिया पीटर लोपीस | गिरीज | ५००/- |
| ख्रिस्ताबेल डिमेलो | उत्तन | ५००/- |
| गिल्बर्ट डी. आल्मेडा | गिरीज | ५००/- |
| रेमंड फ्रान्सिस परेरा | रमेदी | ५००/- |
| अनामिस | सांडोर | ५००/- |
| वसंत आबन सांबार | कोदाद | ३००/- |
| वंदना अशोक | वरखंडा | ३००/- |
| गिल्डस सेलेस्टीन परेरा | रमेदी | ३००/- |
| फिलीप डिसोजा | चुळणा | ३००/- |
| मेल्वीन मिरांडा | रमेदी | ३००/- |
| थॉमस कोलासो | गिरीज | ३००/- |
| फिलोमिना फोन्सेका | उत्तन | ३००/- |
| आग्नेस डी. लोपीस | गिरीज | ३००/- |
| लिली विजय सिरवेल | रमेदी | २५०/- |
| शर्मिला बॉनी सिरवेल | रमेदी | २५०/- |
| सायमन बावतीस कोरिया | नंदाखाल | २२२/- |
| प्रकाश सत्या शनवार | शिसणे | २००/- |
| जॉना कॅजिटन रॉड्रिग्ज | नंदाखाल | २००/- |
| ट्रिजा फ्लोरियन फरगोज | भुईगाव | २००/- |
| रॉबी सेलेस्टीन परेरा | रमेदी | २००/- |
| विल्यम डिकुना | रमेदी | २००/- |
| रुझार लोपीस | ज्योती | २००/- |
| ब्लेस फ्रान्सिस सिक्वेरा | गिरीज | २००/- |
| क्रिस्तोफर मा. घोन्सालविस | बरामपूर | २००/- |
| जगदीप गजभिये | बरामपूर | २००/- |
| मेरी राफायल डिसिल्वा | रमेदी | २००/- |
| निकोलस मिंगेल डिकुना | आगाशी | २००/- |
| फ्रेडी गॅब्रिएल कोलासो | गिरीज | २००/- |
| बेरॉन/बेअर्ली फर्नांडीस | मर्देस | २००/- |
| दिवाण चैत्या गोदाले | बारगपाडा | २००/- |
| राजेश अल्फान्सो | मर्सेस | २००/- |
| गॉडफ्री जॉन अंड्राडीस | मर्सेस | २००/- |
| थेदुअस रिंजड | शिसणे | २००/- |
| रेणू सुभाष धांगडा | शिसणे | २००/- |
| लिना नाझरेथ गोम्स | चुळणा | २००/- |
| नरेश हेमंत चव्हाण | गिरीज | २००/- |
| जो कर्व्हालो | गिरीज | २००/- |
| फ्लॉरी राफायल डिसोजा | गिरीज | २००/- |
| मेरी कुस्तीन मर्ती | भुईगाव | २००/- |
| पीटर फ्रान्सिस घोन्सालविस | मर्सेस | २००/- |
| राफायल पीटर मच्याडो | पाली | २००/- |
| रेन्डल लोपीस | गोखिवरे | २००/- |
| तेरेजा फिलीप आल्मेडा | भुईगाव | २००/- |
| विल्यम डिकुना | नानभाट | २००/- |
| अजित नाझरेथ डिआब्रिओ | गिरीज | १००/- |
| स्तेला डिसोजा | गिरीज | १००/- |
| पावलुस ठाकरे | करजगाव | १००/- |
| वेरोणिका ए. आल्मेडा | भुईगाव | १००/- |
| जोसेफ लॉरेन्स डाबरे | वाघोली | १००/- |
| वॉल्टर पीटर कोलासो | गिरीज | १००/- |
| आग्नेस फरेरा | गिरीज | १००/- |
| आग्नेस एस. बर्मन | बरामपूर | १००/- |
| लिली सेलेस्टीन कर्व्हालो | मुळगाव | १००/- |
| जॉन लोपीस | माणिकपूर | १००/- |
| सालोमन मॅथ्यू तुस्कानो | नंदाखाल | १००/- |
| पॅट्रिक बेंजामिन डिमेलो | नंदाखाल | १००/- |
| बेंजामिन रॉड्रीग्ज | निर्मळ | १००/- |
| मार्तीन मिंगेल लुद्रिक | निर्मळ | १००/- |
| फ्रान्सिस झुज्या डाबरे | भुईगाव | १००/- |
| मार्शल डी. डाबरे | गिरीज | १००/- |
| सांतान तियाग परेरा | आगाशी | ५०/- |
| पास्कोल मर्यान आल्मेडा | माणिकपूर | ५०/- |
| ज्युलेटा विजय फलकाव | पापडी | ५०/- |
| वेरोणिका सेबेस्टियन डिसोजा | सांडोर | ५०/- |

**व्हॅलेरियन नुनीस, उत्तन-डोंगरी**

| | |
|---|---|
| अनतिरेज आर. बोर्जेस | ६००/- |
| व्हिक्टर एम. घोन्सालविस | ५००/- |
| शेविन व्ही. डायस | २००/- |
| इविन नून | २००/- |
| सुनिता ए. मुनिस | १५०/- |
| वनिता आर. डायस | १००/- |
| गिल्बर्ट ए. फर्नांडिस | १००/- |
| डेझी जी. फर्नांडिस | १००/- |
| अनामिक | १००/- |
| आगोस्तीन ए. मेन्डोंसा | १००/- |
| जोकिम जे. पाटील | १००/- |
| वेनिसा ए. घोन्सालविस | १००/- |
| केल्विन जे. मुनिस | १००/- |
| मेबल पी. मुनिस | १००/- |
| एडविन बी. नुनीस | १००/- |
| वॉल्टर एफ. परेरा | १००/- |
| फ्रेडी एल. मेन्डोंसा | १००/- |
| ट्रिजा पीटर नुनीस | ५०/- |
| हेन्री व्ही. परेरा | ५०/- |
| कॉनर (जॉन) मेन्डोंसा | ५०/- |

**लविना डुंगा, उत्तन-करईपाडा**

| | |
|---|---|
| ज्युलियन जे. कोलास | १०००/- |
| पीटर अंतोन घावट्या | ५००/- |
| पीटर कासूघर | ५००/- |
| ग्रेटा मळेकर | ५००/- |
| नेल्सन डेनिस डुंगा | ५००/- |
| रुफिना कोलासो | ३००/- |
| चिंचक | ३००/- |
| सॅण्ड्रा थोपेल्या | ३००/- |
| मेल्विन कोलासो | २००/- |
| व्हलेरीन डुंगा | २००/- |
| आलांसन डोकालकर | २००/- |
| शैला आग्नेलो कोलासो | २००/- |
| चार्ली बोर्जेस | १००/- |
| घावट्या | १००/- |
| रुपेश गौऱ्या | १००/- |
| मॅल्कम घोसाल | ५०/- |
| अनामिक | ५०/- |

**एडना रॉड्रिग्ज, उत्तन-करईपाडा**

| | |
|---|---|
| पालमिरा दालमेत | ५००/- |
| सॅनल फर्नांडिस | ५००/- |
| ब्लॉसी भंडारी | ३००/- |
| सेवन स्टार बोट | ३००/- |
| टेसी मिल्टन रॉड्रिग्ज | २००/- |
| महिमा बोट | २००/- |
| कार्मेलिन मेन्डोंसा | १५०/- |
| दिलीप टेंबुरकर | १०१/- |
| रायशा रंजित भक्ता | १००/- |
| ऑस्टीन थोपेल्या | १००/- |
| माल्कम रॉड्रिग्ज | १००/- |
| सबिनो रॉड्रिग्ज | १००/- |

**मेबल बडीखाद्या, उत्तन-देवतलाव**

| | |
|---|---|
| सारा व केनन बडीखाद्या | ५५५/- |
| होली सी बोट | ५००/- |
| वनिता ब्रुनो बुनकवली | ४००/- |
| रिना रॉक्सी किना | ३००/- |
| स्टेला पॉल पोसा | २००/- |
| एलिटा मेल्वीन बडीखाद्या | १००/- |
| लोरा कलमेथ किणी | १००/- |
| आलेक्सा मॅल्कम सांबऱ्या | १००/- |

**टायपी रु. पोसा ,उत्तन-देवतलाव**

| | |
|---|---|
| ब्रिजल पोसा | ५००/- |
| रायडन इग्नेस गोजी | ५००/- |
| बर्नड झेवियर पोसा | ५००/- |
| कारवेल गोजी | ३००/- |
| डायरस आल्फ्रेड कोलासो | २००/- |
| ब्लॉसी इग्नेस गोजी | २००/- |
| डेमियन जॉन्सन पोसा | २००/- |
| जॉन जसिन पोसा | २००/- |
| लिसा हॅरल पोसा | २००/- |
| कॅमेलस रुफीनो पोसा | १००/- |
| वजिना इजिदोर सांबऱ्या | १००/- |
| मार्तिन झुजे हारूक | १००/- |
| सिझर एडवर्ड लानगी | १००/- |
| मॅटिल्डा कौरू | ५०/- |

**सिंड्रेला चकवली, उत्तन-देवतलाव**

| | |
|---|---|
| ग्रिलो डेनिस जिओ | ५००/- |
| शॉन लिओ कोलासो | ५००/- |
| स्टॅनी मोझेस जिऊ | ३००/- |
| वायलेट गौऱ्या | २००/- |
| संदीप हारूक | २००/- |
| नेल्सन जिऊ | २००/- |
| प्रेस्टन स्टिव पोसा | २००/- |
| अनिता मॅक्सी जिऊ | १५०/- |
| रायमन बडीखाद्या | १००/- |
| आब्राहाम बोट | १००/- |
| डेविड सांबऱ्या | १००/- |
| फुलोमिना पोसा | १००/- |
| फुलोमिना चकवली | १००/- |
| ऑस्टीन जिऊ | १००/- |
| व्हॅलेरीन जिऊ | १००/- |
| मॉरस जिऊ | १००/- |
| सनी कौरू | ५०/- |

**आयवी गंडोळी, उत्तन-देवतलाव**

| | |
|---|---|
| स्वप्निल अनिल कोळी | ५००/- |
| फ्रेडी पेद्रीन डिमेकर | ३००/- |
| हेलेना मार्शल गौऱ्या | ३००/- |
| संगीता डिक्सन गंडोळी | २००/- |
| ब्रॅण्डा प्लासिट पोसा | २००/- |
| अमोल कोलासो | २००/- |
| रेमंड गंडोळी | १००/- |
| जॉक्सन कौलीघर | १००/- |
| सेबेस्टिन गौऱ्या | १००/- |
| जॉन गऱ्या | १००/- |
| सचिन विल्यम सांबऱ्या | १००/- |
| जोजफ पोशापीर | १००/- |
| जोजफ डिमेकर | १००/- |
| पॅमला कावळ्या | ५०/- |

**शेखर पारवे, मालवणी**

| | |
|---|---|
| डेन्झिल फर्नांडिस | ५००/- |
| केनेथ घोन्सालविस | ५००/- |
| लॉरेटा ऑल्विन पटेल | ५००/- |
| रिचर्ड मेन्डोंसा | ३००/- |
| सिंन्ड्रेला सुतारी | ३००/- |
| अनिता रोझारिओ | ३००/- |
| नोएल ग्रेशियस | ३००/- |
| मोझेस पीटर पटेल | २००/- |

**जॉन्सन कोळी, नायगाव-पाली**

| | |
|---|---|
| चंद्रकांत खाटीककर | २००/- |
| उमा पॉल कोळी | १००/- |
| नेट फ्रान्सिस कोळी | १००/- |

**फ्लेविया कोयलो, रमेदी**

| | |
|---|---|
| लिली नेल्सन कोयलो | ५००/- |
| मेबल रॉजर कोयलो | ५००/- |
| बेन्सी सिल्वेस्टर कोयलो | ३००/- |
| सिबल सिरील कोयलो | ३००/- |
| ऑल्विन फ्रान्सिस डिमेलो | ३००/- |
| कॅलेट राफायल सेरेजो | २००/- |
| जसिंटा सिझर डिकुन्हा | १००/- |
| स्विटॉन वॉल्टर डिमेलो | १००/- |

**ग्रेसी घोन्सालविस, रमेदी**

| | |
|---|---|
| रंजना किशोर वर्तक | ५००/- |
| नितेश पॉली घोन्सालविस | ३००/- |
| रूबी जॉन घोन्सालविस | १००/- |
| सानिका प्रशांत धापशी | ५०/- |

**अनिल डाबरे, भुईगाव**

| | |
|---|---|
| सांतान डाबरे | २००/- |
| लवेट फ्रान्सिस डाबरे | १००/- |
| अनिल जॉकी डाबरे | १००/- |
| जोसेफ शिलू डाबरे | १००/- |
| जसिंता पास्कोल डाबरे | १००/- |
| वॉल्टर जॉकी डाबरे | १००/- |
| डॅरल डॉमणिक डाबरे | १००/- |
| मरशा बी. डाबरे | १००/- |

**जॉन डाबरे, भुईगाव**

| | |
|---|---|
| छाया फ्रान्सिस डाबरे | ५००/- |
| मेल्विन मायकल फिगेर | १००/- |
| अजिंक्य डाबरे | १००/- |
| डायगो संज्याव डिसोजा | १००/- |
| जॉन पास्कोल डाबरे | ५०/- |
| जेरी डाबरे | ५०/- |

**जेकब तुस्कानो, भुईगाव**

| | |
|---|---|
| जेकब पास्कोल तुस्कानो | २००/- |
| शितल मॅथ्यू डाबरे | २००/- |
| रेजिना संकेत डाबरे | २००/- |
| सांतान मिंगेल डाबरे | २००/- |
| जोसेफ बावतीस डाबरे | १००/- |
| सायमन इनास डाबरे | १००/- |
| रोझी सिमांव कर्वाल | १००/- |
| रेमंड बावतीस डाबरे | १००/- |
| सुजाता डाबरे | १००/- |
| थॉमस फिलीप डिकुना | १००/- |
| संज्याव ॲण्ड्र्यू आल्मेडा | १००/- |
| वेन्सी डाबरे | १००/- |
| कॅथरिन डाबरे | ५०/- |
| बस्त्याव ॲण्ड्र्यू आल्मेडा | ५०/- |
| पीटर शिलू डाबरे | ५०/- |

**लुईस डायस, भुईगाव**

| | |
|---|---|
| आलेक्स इग्नेशियस डाबरे | २००/- |
| मेल्वीन मायक डायस | २००/- |
| राहूल लुईस डाबरे | १००/- |

**आल्बर्ट रोझारिओ, नाळा**

| | |
|---|---|
| मायकल फिलिप लोपीस | २००/- |
| लुजान फेलिक्स लोपीस | १००/- |
| मार्तिन डॉमणिक लोपीस | १००/- |
| क्लॅरिन राफायल आल्मेडा | १००/- |
| जेम्स निकोलस कोरिया | १००/- |
| ओनिल ॲन्थनी रोझारिओ | १००/- |
| विल्यम डायगो डिसिल्वा | ५०/- |

**अनिता डेनिस परेरा, सांडोर**

| | |
|---|---|
| लेस्ली फ्रान्सिस परेरा | १०००/- |
| लिली जॉन परेरा | २००/- |
| संजय फेलिक्स परेरा | १००/- |

**जॉन बा. घोन्सालविस, उमराळे**

| | |
|---|---|
| मायकल बा.घोन्सालविस | २००/- |
| सिल्वेस्टर घोन्सालविस | २००/- |
| इग्नेशियस घोन्सालविस | १००/- |
| श्वेता डॅनियल वाझ | १००/- |
| पीटर घोन्सालविस | १००/- |
| लॅरिसा स्टिफन गोम्स | १००/- |
| शैला जोसेफ लोपीस | १००/- |
| सिसिलिया लोपीस | १००/- |
| ॲण्ड्र्यू पी. घोन्सालविस | ५०/- |

**व्हॅलेरियन वाझ, पापडी**

| | |
|---|---|
| डॉनल वाझ | ३००/- |
| रोहन वाझ | ३००/- |
| संगीता डिमेलो | ३००/- |
| उल्हास वाझ | ३००/- |
| अनामिक | २००/- |
| अनामिक | १००/- |

**सॅल्वीन वॅलेंटाईन रुझारियो,राजोडी**

| | |
|---|---|
| मेरी शावेर रॉड्रिग्ज | ३००/- |
| स्वप्निल इनूस रॉड्रिग्ज | ३००/- |
| जोसेफ मॅथ्यू रुझारियो | २००/- |
| ॲलन पास्कोल रॉड्रिग्ज | २००/- |
| ग्लेन जॉनी लोपीस | २००/- |
| विनायक पारधी | २००/- |
| ग्रेटा डिसोजा | ११०/- |
| सरोज डिसोजा | १००/- |
| व्ही. जे. डिसोजा | १००/- |
| हेलन जॉनी रॉड्रिग्ज | ५०/- |

**सायमन डिमेलो, आगाशी**

| | |
|---|---|
| इनास घोन्सालविस | ५००/- |
| निकलस जॉन मुर्झेलो | ५००/- |
| सचिन निकलस मुर्झेलो | ५००/- |
| सिडनी निकलस मुर्झेलो | ५००/- |
| अजित पास्काल डायस | ५००/- |
| इजाबेल मुर्झेलो | ५००/- |
| आंजेलिन मिनेझीस | ५००/- |
| अंतोनी फ्रा. घोन्सालविस | ५००/- |
| दीपक लखमा सनवार | ५००/- |
| सांतियागो पॉल डायस | २५०/- |
| बाप्तिस्ता फ्रान्सिस डायस | २००/- |
| फ्रान्सिस पॉल डायस | २००/- |
| जोसेफ पॉल डायस | २००/- |
| जोसेफ डायस | २००/- |
| मकारियुस एडवर्ड कोयलो | २००/- |
| जेसी नाझरेथ डिसोजा | २००/- |
| विलास डायस | २००/- |
| जोसेफ संज्याव डिमोन्टी | १००/- |
| रूबेन आलेक्स डायस | १००/- |
| वनिता पीटर डिसोजा | १००/- |
| स्तेला डिसोजा | १००/- |
| रिटा डिसोजा | १००/- |
| लुईस पीटर डायस | १००/- |
| स्टीफन डायस | १००/- |
| स्वप्निल डायस | १००/- |
| अनिता रिचर्ड डिसोजा | १००/- |
| मॅटिल्डा डिसोजा | १००/- |
| जॉन चिमु मुर्झेलो | १००/- |
| जॉना जेकब डिमेलो | १००/- |
| कैतान डिमेलो | ५०/- |
| पास्कोल डायगो डायस | ५०/- |
| विल्यम दुमिंग डायस | ५०/- |
| ग्रेसी डिसोजा | ५०/- |
| ऑल्विन मायकल डायस | ५०/- |

- *(उर्वरित नावे आगामी अंकात)*

# ‘सुवार्ता’ शब्दकोडे क्रमांक - ८

**रचना : अनिल डायगो गोन्साल्वीस**
उमराळे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | ३ | ✕ | ४ | ५ |
| | ✕ | ✕ | ६ | | ✕ | ७ | |
| ८ | ९ | १० | ✕ | ११ | १२ | | |
| १३ | | | ✕ | १४ | | ✕ | ✕ |
| ✕ | ✕ | १५ | | | ✕ | १६ | |
| १७ | | | ✕ | १८ | | | १९ |
| | ✕ | २० | | ✕ | ✕ | २१ | |
| २२ | | | ✕ | २३ | | | ✕ |

**आडवे शब्द :-** १) मराठी भाषेचे आद्य व्याकरणकार (पाणिनी) दादोबा पांडुरंग ××××× (५)
४) संघ, चमू, टोळी ×× (२)
६) संघ, पथक, गट (इंग्रजी) ×× (२)
७) दडून रहा ×× (२)
८) एक उभयचर प्राणी ××× (३)
११) भाजीपाला, सब्जी ×××× (४)
१३) घाव ××× (३)
१४) कळपाने राहणारा एक तृणभक्षी प्राणी ×× (२)
१५) अंकुश, ताबा, नियंत्रण ××× (३)
१७) शूकर, डुक्कर ××× (३)
१८) खड्ग, समशेर ×××× (४)
२०) साप ×× (२)
२१) नाडी ×× (२)
२२) वंदन, नमस्कार ××× (३)
२३) महाराष्ट्र आणि गुजरातमधील एक पारंपरिक चर्मवाद्य ××× (३)

**उभे शब्द :-** १) कुशल, निपुण, पटाईत, पारंगत ×××× (४)
२) कंबर ×× (२)
३) आरामात, निवांतपणे ×××××× (६)
४) गोंगाट, कोलाहल ××× (३)
५) पत्र्याचे शेड, छोटे दुकान ××× (३)
९) ‘खडू’ शब्द उलट करा ×× (२)
१०) ‘एक दुजे के लिए’ चित्रपटातील नायक ×××××× (६)
१२) ×× हा शब्द गव्हाच्या इतर जातीतील घटक आणि काही वेळा जसे की तांदूळ किंवा कॉर्न ह्यांच्यासाठी वापरला जातो (२)
१६) प्रस्थान, पाठवणे ×××× (४)
१७) भार, ओझे ××× (३)
१९) आवड, गोडी, रूची ×× (२)

### ‘सुवार्ता’ शब्दकोडे क्रमांक -७चे उत्तर

**आडवे शब्द :-** १) हिलरी फर्नांडिस ५) खाट १३) डर १४) यमक १८) शिस्त १९) अजित दादा पवार २३) वानर २४) दर

**उभे शब्द :-** २) ललकारी ३) फड ४) सखा ६) दक्ष ८) सय १०) कडक १२) लय १५) मसुदा १६) बिस्तर १७) वतन १८) शिवार २०) जिवा २१) दार २२) पद

# हास्यरंग

## स्वप्न

नवरा : अगं ऐकलंस का?
बायको : काय ते?
नवरा : तुझी ती सुंदर मैत्रिण काल माझ्या स्वप्नात आली होती.
बायको : तुमच्या स्वप्नांत ती एकटीच आली असेल नं!
नवरा : हो, पण तुला कसं कळलं?
बायको : तिचा हँडसम नवरा काल माझ्या स्वप्नात आला होता नं! स्वप्नं मलाही पडतात म्हटलं...

* * * *

## लेखन

आई : ‘‘बंड्या, आज शाळेत काय शिकवले?’’
बंड्या : ‘‘लिहायला शिकवले!’’
आई : ‘‘अरे व्वा छान! काय लिहिलेस?’’
बंड्या : ‘‘काय माहीत! अजून वाचायला नाही शिकवले!’’

## युगंधरा

एकदा कादंबरीकार ना.सी.फडके नाशिकात व्याख्यानाकरिता गेले असता त्यांना एक तरुणी भेटायला आली. फडक्यांनी साहजिकच तिचे नाव विचारले. तिने तिचे नाव ‘युगंधरा’ असे सांगितले.

‘‘फारच कठीण नाव! तुम्हाला हाक मारताना पंचाईतच होईल की!’’ इति फडके

त्यावर ती तरुणी म्हणाली, ‘‘सर्वजण मला ‘युगाबाई’च म्हणतात.’’ तेव्हा फडके लगेच म्हणाले, ‘‘तरी बरं, तुम्हाला कोणी ‘धराबाई’ म्हणत नाहीत.’’

## दोरी

एक माणसाला पोलिसांनी पकडले आणि हातकड्या घालून पोलीस चौकीवर नेले. वाटेत त्याला त्याचा एक मित्र भेटला. त्याने विचारले, ‘‘तुला कशासाठी पकडले?’’

तो म्हणाला, ‘‘एक दोरी चोरली.’’ ‘‘काय म्हणतोस, केवळ दोरीसाठी हातकड्या!’’ मित्राने विचारले. त्यावर तो उत्तरला, ‘‘नुसती दोरी नव्हती, पण कुणीतरी दोरीला एक म्हैस बांधली होती.’’

मनन-चिंतन मंथन



# धर्मांतर की परिवर्तन

**रम्य कथा :** आफ्रिका खंडात ५४ देश आहेत आणि ते विविध वैशिष्ट्यांसाठी ओळखले जातात. त्या देशातील एका कार्डिनल महोदयांच्या तोंडून रोमच्या बसिलिकामध्ये मी ऐकलेली घटना : एकदा कार्डिनल काही कामानिमित्ताने त्यांच्या देशात गेले होते. तेव्हा त्यांच्या भावाने त्यांना एका पौल्ट्रीच्या आशीर्वादविधीसाठी आमंत्रण दिले नि त्यांना तेथे तो घेऊन निघाला. आशीर्वादठिकाणी पोहचल्यावर कार्डिनलना चित्र विचित्र वाटले. संपूर्ण एकरभर जमिनीत विशाल, विस्तृत मैदानाला नाममात्र कुंपण होते. तेथे अगणित कोंबड्या मनसोक्त फिरत होत्या आणि अंडी घालण्याच्या ठिकाणी कोंबड्यांची जणू काही 'रांग' लागली होती. तसेच त्या ग्राऊंडभर अंडीच अंडी इतस्तत: पडलेली दिसत होती...

**व्यापक विचार :** पौल्ट्रीचे हे दृश्य पाहून कार्डिनलनी आपल्या भावाला विचारले, ''नेहमीप्रमाणे पौल्ट्रीला दारे, खिडक्या, वगैरे का नाहीत? तुमच्या कोंबड्या पळून जाण्याचा धोका आहे.'' त्यावर भाऊ म्हणाला, ''उलट आमच्याकडे इतर ठिकाणच्या कोंबड्या येतात आणि खाऊ खाऊन परतसुद्धा जातात....'' ''ते कसे?'' अशी विचारणा केल्यावर भावाने पुष्टी जोडली, ''ह्या ठिकाणी आम्ही कोंबड्यांना त्यांच्या आवडीचे आणि पौष्टिक खाद्य ठेवतो. ते खाण्यासाठी आजूबाजूच्या कोंबड्यादेखील येतात. त्यांना आम्ही अडवत नाहीत. भुकेल्या-तहानलेल्या-अडचणीत असलेल्या कोंबड्यांनासुद्धा आम्ही आमच्या पौल्ट्रीची सेवा खुली ठेवली आहे. त्यामुळे आमच्या पौल्ट्रीच्या उत्पादनाला खूप मागणी आहे.''

**ख्रिस्तसभेचे धोरण :** चर्चचे, ख्रिस्तसभेचे असेच काहीसे आहे. प्रभू ख्रिस्ताच्या मरणानंतर त्याची 'दया-क्षमा-न्याय-शांती-सेवा' ही सर्वांगीण शिकवण अंगीकारून शिष्यांनी, संत पॉलसारख्या विरोधकांनी सुद्धा, त्याच्या पावलांवर पाऊल टाकत देशा-विदेशात जाऊन तेथे हाडाची काडे करून, जिभेच्या कण्या करून विपरित परिस्थितीत येशूचा तारणदायी संदेश आपल्या जीवनाने घोषित केला. त्याकाळी त्यांना मूलभूत गरजादेखील उपलब्ध नव्हत्या. घरदार, खानदान कुटुंब नि ऐश्वर्य त्यांनी मागे ठेवले नि ते जेथे गेले तेथले झाले, होतात. त्यामुळेच स्वातंत्र्य, समता व बंधु-भगिनिता हा त्यांचा पिंड होता, आहे. स्थानिक संस्कृतीशी एकरूप होणे (संस्कृतिकरण Inculturation) हा त्यांचा वसा असतो.

**मिशन व मिशनरी :** समस्त समाजाचे सर्वांगीण विकासाचे येशूचे 'मिशन' ('ध्येय') पटले ते फक्त सेवा (Ministry) करीत राहिले नाहीत, त्यांनी मिशनरी ह्या नात्याने येशूच्या जीवनप्रणालीशी अतूटपणे संबंधित अशी शिक्षण, प्र-वचन, आरोग्यदान (Teaching, Preaching, Healing) आदी अस्पर्शित क्षेत्रे (Apostolate) धुंडाळून काढली. त्यानुसार शैक्षणिक संस्था, आध्यात्मिक केंद्रे व विविधांगी आरोग्यसेवा जारी आहेत. ह्या सेवा आध्यात्मिक (परमेश्वरी कृपेमुळे बाप्तिस्मा-ख्रिस्तशरीर आदी सात कृपासंस्कारांची ऊर्जा, प्रार्थनेचे बळ, स्वार्थत्याग, धीर, सहनशीलता, सर्वसमावेशकता, आजारी-दिव्यांग-गरीब-गरजवंत ह्यांच्यात आलेला/येणारा ख्रिस्तानुभव, इत्यादी) जीवनाचा परिपाक असतात.

**सेवेचा गाभा :** ख्रिस्ती माणसांद्वारे उपलब्ध सेवा केवळ समाजसेवा नसते, ती सेवा असते निर्मात्याच्या स्तुती-सन्मान-गौरवार्थ वाहिलेली अर्पणे, ती सेवा असते पुनरुत्थित ख्रिस्तावरील श्रद्धा-निष्ठा-साक्ष, बाप्तिज्मा साक्रामेंतावेळच्या ('साक्रामेंत' म्हणजे अदृश्य परमेश्वराच्या दृश्य कृपेची खूण) अभिवचनांचा आविष्कार, पवित्र मिस्साबलिदानावेळी स्वीकारलेल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या शरीर व रक्ताद्वारे लाभलेल्या दिव्य शक्तीची मानवी कृती-कामे-कार्ये, आपल्याला शोधणाऱ्या व सापडलेल्या येशूच्या शिकवणुकीचा यथाबुद्धी-शक्ती पाठपुरावा. त्यामुळेच कितीही विरोध-टीका-अपप्रचार झाला तरीसुद्धा अहिंसक रीतीने, देशाच्या संविधानाला प्रमाण मानून नि:स्पृह, निरपेक्ष सेवाकार्य सुरूच राहते.

**बाप्तिज्मामुळे होणारे परिवर्तन धर्मांतर नसते. :** बाप्तिज्मा घेणे म्हणजे परमेश्वराचे ऐकणे, त्याला शरण जाणे, त्याचा स्वीकार करणे; बाप्तिज्मा स्वीकारण्यासाठी 'प्रौढ ख्रिस्ती कृपासंस्कार विधी' (Rite of Christian Initiation of Adults) ह्या कार्यक्रमाद्वारे तयारी करावी लागते, भारतीय संविधानाच्या (कलम १९,२१ व २५) तरतुदीनुसार हमीपत्र करावे लागते, सेवेचा मंत्र आजूबाजूच्या विविध धर्मीय लोकांमध्ये कार्यान्वित करण्याची इच्छा असावी लागते तेव्हाच कॅथलिक चर्चतर्फे बाप्तिज्मा हा कृपासंस्कार (साक्रामेंत) विशेषत: 'पुनरुत्थान जागरण उपासने'त विधिवत संपन्न होतो. बाप्तिज्मामुळे चांगले सुसंस्कृत, सुसंस्कारित 'अस्सल भारतीय' निपजतात. परिवर्तनामुळे बाप्तिज्मा होतो व बाप्तिज्मामुळे परिवर्तन होते. धर्मात अंतर येत नाही, देशांतर घडत नाही. तसेच 'धर्मांतर' का होते ह्यापेक्षा 'परिवर्तन' होण्यामागील कारणांचासुद्धा मागोवा घ्यायला हवा.

आपल्या भारत देशात आदर्श संविधान आहे. ह्या देशात अध्यात्म आहे. सर्व धर्मांचा नि श्रद्धांचा आदर केला जातो. ख्रिस्ती धर्मसुद्धा सर्व देशवासीयांना 'आपले' असे मानतो. सर्व सेवा सर्वांना उपलब्ध असतात. सक्तीने कुणाला बाप्तिज्मा देत नाहीत (संदर्भ कॅनन ८६५.१). त्यामुळेच ख्रिस्ती लोकसंख्या २.४% वरून २.२%वर आलीय. देशातील २०% संस्था सेवाभावी ख्रिस्ती आस्थापने वर्षानुवर्षे चालवतात. पण बहुसंख्याक असलेल्या आपल्या देशातील काही राज्यात (अरुणाचल प्रदेश, ओडिसा, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, गुजरात, हिमाचल प्रदेश, झारखंड, उत्तर प्रदेश) अशीच एकांगी विधेयके पारित झाली आहेत. त्याबद्दलचे प्रकरण सुप्रिम कोर्टात आहेत. सुनावणी झालीय. निकाल अपेक्षित आहे...

'धर्मस्वातंत्र्य कायदा २०२६'च्या परिणामांचा, नीट अभ्यास करून दुरूस्ती व्हायला हवी.

**- फादर जोएल डिकुना**

## उपासना वर्ष दिनदर्शिका : एप्रिल २०२६

**वाचनग्रंथ : रवि., सोहळे, सण - पहिले वर्ष; सप्ताह - दुसरे वर्ष**

१. यशया ५०:४-९
स्तोत्र ६९:८-१०,२१-२२,
३१, ३३-३४
मत्तय २६:१४-२५

२. **आज्ञा गुरुवार**
**(पवित्र त्रिदिनाला सुरुवात)**
निर्गम १२:१-८,११-१४
स्तोत्र ११६:१२-१३,
१५-१६,१७-१८
१करिंथ ११:२३-२६
योहान १३:१-१५

३. **शुभ शुक्रवार**
यशया ५२:१३-५३:१२
स्तोत्र ३१:२,६,१२-१३,
१५-१७,२५
इब्री ४:१४-१६; ५:७-९
योहान १८:१-१९:४२

४. **पुनरुत्थानपूर्व जागरणविधी**
१ले वाचन : उत्पत्ती १:१-२:२
२रे वाचन : उत्पत्ती २२:१-१८
३रे वाचन : निर्गम १४:१५-
१५:१
४थे वाचन :यशया ५४:५-१४
५वे वाचन :यशया ५५:१-११
६वे वाचन : बारुख ३:९-१५,
३२-४:४
७वे वाचन : यहे. ३६:१६-२८
रोम ६:३-११
मत्तय २८:१-१०

५. **पुनरुत्थान रविवार**
**ईस्टर संडे**
सकाळची मिस्सा :-
प्रे.कृ. १०:३४,३७-४३
स्तोत्र ११८:१-२,१५-१७,
२२-२३
कलस्से ३:१-४
योहान २०:१-९

६. प्रे.कृ. २:१४,२२-२३
स्तोत्र १६:१-२,५,७-११
मत्तय २८:८-१५

७. प्रे.कृ. २:३६-४१
स्तोत्र ३३:४-५,१८-२०,२२
योहान २०:११-१८

८. प्रे.कृ. ३:१-१०
स्तोत्र १०५:१-४,६-९
लूक २४:१३-२५

९. प्रे.कृ. ३:११-२६
स्तोत्र ८:२,५-९
लूक २४:३५-४८

१०. प्रे.कृ. ४:१-१२
स्तोत्र ११८:१-२,४,२२-२७
योहान २१:१-४

११. प्रे.कृ ४:१३-२१
स्तोत्र ११८:१,१४-२१
मार्क १६:९-१५

१२. **पुनरुत्थानकाळ २रा रविवार**
प्रे.कृ ४२-४७
स्तोत्र ११८:२-४,१३-१५,
२२-२४
१पेत्र १:३-९
योहान २०:१९-३१

१३. प्रे.कृ. ४:२३-३१
स्तोत्र २:१-९
योहान ३:१-८

१४. प्रे.कृ. ३२-३७
स्तोत्र ९३:१-५
योहान ३:७-१५

१५. प्रे.कृ. ५:१७-२६
स्तोत्र ३४:२-९
योहान ३:१६-२१

१६. प्रे.कृ. ५:२७-३३
स्तोत्र ३४:२,९,१७-२०
योहान ३:३१-३६

१७. प्रे.कृ. ५:३४-४२
स्तोत्र २७:१,४,१३-१४
योहान ६:१-१५

१८. प्रे.कृ. ६:१-७
स्तोत्र ३३:१-२,४-५,१८-१९
योहान ६:१६-२१

१९. **पुनरुत्थानकाळ ३रा रविवार**
प्रे.कृ. २:१४,२२-२३
स्तोत्र १६:१-२,५,७-११
१पेत्र १:१७-२१
लूक २४:१३-३५

२०. प्रे.कृ. ६:८-१५
स्तोत्र ११९:२३-२४,
२६-२७, २९-३०
योहान ६:२२-२९

२१. प्रे.कृ. ७:५१-८:१
स्तोत्र ३१:३-४,६-८,१७,२१
योहान ६:३०-३५

२२. प्रे.कृ. ८:१-८
स्तोत्र ६६:१-७
योहान ६:३५-४०

२३. प्रे.कृ. ८:२६-४०
स्तोत्र ६६:८-९,१६-१७,२०
योहान ६:४४-५१

२४. प्रे.कृ. ९:१-२०
स्तोत्र ११७:१,२
योहान ६:५२-५९

२५. **संत मार्क-सुवार्तिक-सण**
१पेत्र ५:५-१४
स्तोत्र ८९:२-३,६-७,१६-१७
मार्क १६:१५-२०

२६. **पुनरुत्थानकाळ ४था रविवार**
प्रे.कृ. २:१४,३६-४१
स्तोत्र २३:१-६
१पेत्र २:२०-२५
योहान १०:१-१०

२७. प्रे.कृ. ११:१-१८
स्तोत्र ४२:२-३;४३:३-४
योहान १०:११-१८

२८. प्रे.कृ. ११:१९-२६
स्तोत्र ८७:१-७
योहान १०:२२-३०

२९. **सिएन्राची संत कॅथरीन-स्मृती**
प्रे.कृ. १२:२४-१३:५
स्तोत्र ६७:२-३,५-६,८
योहान १२:४४-५०

३०. प्रे.कृ. १३:१३-२५
स्तोत्र ८९:२-३,२१-२२,
२५, २७
योहान १३:१६-२०

### मे २०२६

१. **संत जोसेफ, कामगारदिन**
उत्पत्ती १:२६-२:३
स्तोत्र ९०:२,३-४,१२-१६
मत्तय १३:५४-५८

२. **संत अथनेसियुस - स्मृती**
प्रे.कृ. १३:४४-५२
स्तोत्र ९८:१-४
योहान १४:७-१४

३. **पुनरुत्थानकाळ ५वा रविवार**
प्रे.कृ. ६:१-७
स्तोत्र ३३:१-२,४-५,१८-१९
१पेत्र २:४-९
योहान १४:१-१२

४. प्रे.कृ. १४:५-१८
स्तोत्र ११५:१-४,१५-१६
योहान १४:२१-२६


५. प्रे.कृ. १४:१९-२८
स्तोत्र १४५:१०-१३,२१
योहान १४:२७-३१

६. प्रे.कृ. १५:१-६
स्तोत्र १२२:१-५
योहान १५:१-८

७. प्रे.कृ. १५:७-२१
स्तोत्र ९६:१-३,१०
योहान १५:९-११

८. प्रे.कृ. १५:२२-३१
स्तोत्र ५७:८-१२
योहान १५:१२-१७

९. प्रे.कृ. १६:१-१०
स्तोत्र १००:१-५
योहान १५:१८-२१





JEWEL OF CHIRABAZAR
MK JEWELLERS
Shah & Co.™
528, Chira Bazar, Mumbai - 400 002.
Tel. 2205 6380, 2205 1124 | Fax : 022 - 2206 5421
Email : mkshahjewellers@gmail.com
HALLMARK JEWELLERY 100%
परंपरेची शान आणि
आधुनिकतेची ओळख
आमचा गोल्ड आणि
डायमंड कलेक्शन!
HAPPY Easter
OUR NEW LANDMARK
New Facing Kalbadevi Metro Station
Dear Customer Please Save Our Mob No 7718019981 to your Contact List & get Daily updates of New Collection & Prices
WE HAVE NO BRANCH AT VIRAR, VASAI & MUMBAI
Our Showroom is Very Nearby Marine Lines Station (Mumbai)
Valet Parking Available

RNI MAHMAR - 11692 / 1960


# CLC STUDY ABROAD

## AUSTRALIA

Monash University | The University of Adelaide | The University of Melbourne | The University of Queensland | The University of Sydney

RMIT University | Deakin University | James Cook University Australia | Griffith University | UNSW

The University of Newcastle Australia | La Trobe University | Swinburne | Macquarie University | UOW Australia

and many more...

## NEW ZEALAND

AUT University | Victoria University of Wellington | Whitecliffe | University of Otago | Whitireia New Zealand

Massey University | The University of Auckland | Manukau Institute of Technology | Lincoln University | UC University of Canterbury

and many more...

## MORE COUNTRIES

UK | USA | EUROPE | UAE | DENMARK | CANADA | IRELAND | FRANCE | GERMANY

**MR.SWAPNIL CORREIA**
CLC ABROAD

**MR.STEPHEN RODRIGUES**
SUPPORT AMBASSADOR – AUSTRALIA

+91- 70300 00125 | +91- 96739 62097 www.clcabroad.in

VASAI | NALLASOPARA | BOISAR | PUNE | NAVI MUMBAI


हे मासिक, मालक, मुद्रक, सुवार्ता ट्रस्ट ह्यांनी मॅन्युएल प्रिन्ट, वालीव फाटा, सातिवली, ता. वसई, जि. पालघर -४०१ २०८ महाराष्ट्र येथून छापून सुवार्ता कार्यालय, जीवन दर्शन केंद्र, गिरीज, ता. वसई, जि. पालघर, जि. ४०१ २०१ येथून प्रकाशित केले. संपादक : फा. डॉ. जोएल डिकुना.